Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २७८ * * नागपूर * | रविवार, दिनांक ५ जानेवारी २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

श्रीकृष्ण ज्वेलर्स

● आभुषणांची विशेष शृंखला ९१.६ के सुवर्ण ग्राहकांच्या विश्वासामुळे अल्पावधीतच प्रसिद्ध
● नेकलेस, बांगड्या, कंगन, बोरमाळ, मंगळसूत्र व महाराष्ट्रीयन दागिन्यांचे विक्रेते
कॉफी हाऊस बिल्डिंग, गोकूळपेठ, नागपूर 2557429, 2542486

## भाजपच्या पहिल्या यादीत २९ उमेदवार

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :**
दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यादीत २९ नावे आहेत. प्रवेश वर्मा नवी दिल्लीतून अरविंद केजरीवाल यांच्याविरोधात निवडणूक लढवणार आहेत.

दिल्लीतील विधानसभा निवडणुकीच्या तारखा लवकरच जाहीर होणार आहेत. आम आदमी पक्षाने सर्व ७० जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. काँग्रेसनेही आतापर्यंत तीन यादीत ४८ उमेदवार उभे केले आहेत.

आम आदमी पार्टीने १५ डिसेंबर रोजी दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी सर्व उमेदवारांची घोषणा केली होती. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल नवी दिल्लीतून निवडणूक लढवणार आहेत.

# सुदर्शन घुले, सुधीर सांगळेला अटक

## संतोष देशमुख हत्याकांड : न्यायालयाने सुनावली १४ दिवसांची कोठडी

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. ४ :**
बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात फरार आरोपींपैकी दोन आरोपींना बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आले आहे. सुदर्शन घुले, सुधीर सांगळेला पुण्यातून पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

दरम्यान फरार तिसरा आरोपी कृष्णा आंधळे अजून पोलिसांना सापडलेला नाही. प्रयत्न करून सुद्धा तिसरा आरोपीला पोलिसांना ताब्यात घेता आले नाही.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अपहरण करून निर्घृणपणे हत्या केल्याची घटना ९ डिसेंबर रोजी घडली होती. याप्रकरणी केज पोलिस ठाण्यात सुदर्शन चंद्रभान घुले, कृष्णा शामराव आंधळे, सुधीर ज्ञानोबा सांगळे, महेश सखाराम केदार, जयराम माणिक चाटे, प्रतिक भीमराव घुले, विष्णू महादेव चाटे या सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



आरोपी सुदर्शन घुले, सुधीर सांगळे आणि सिद्धार्थ सोनवणे यांना आज केज न्यायालयात हजर करण्यात आले होते. या आरोपींनी केज न्यायालयाने १४ दिवसांची कोठडी सुनावली आहे. सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांना आज पहाटे पुण्यातून अटक केली. सीआयडी आणि एसआयटीच्या पथकाने संयुक्तरित्या ही कारवाई केली. या आरोपींवर मोक्का लागण्याची दाट शक्यता आहे.

### आरोपींचे एन्काऊंटर करा - खोत

सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील गुन्हेगारांना न्यायालयातून फाशीची शिक्षा होईपर्यंत वाट पाहण्यात थांबण्यापेक्षा अशा या फाळकुट दादांना भर चौकात गोळ्या घालून त्यांचे एन्काऊंटर करायला हवे. म्हणजे राज्यांमध्ये अशा प्रकारचे गुन्हेगारी डोके वर काढणार नाही. अशी मागणी शेतकरी नेते आमदार सदाभाऊ खोत यांनी केज तालुक्यातील मस्साजोग येथे केली.

दुसरीकडे, देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड याने न्यायालयात आपल्याला २४ तास मदतनीस मिळावा यासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र, त्याची ही मागणी न्यायालयाने फेटाळली आहे.

### आश्विनी देशमुख यांना १० लाखाची शासकीय मदत

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर कुटूंबीयांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहायता निधीतून विशेष बाब म्हणून १० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती. १० लाख रुपयांच्या आर्थिक मदतीचा धनादेश केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी अश्विनी देशमुख यांच्याकडे सुपूर्द केला.

### माहिती देणाऱ्यास बक्षीस

संतोष देशमुख हत्याकांडातील फरार तीन आरोपींची माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवून योग्य बक्षीस देण्याचे पोलिस विभागाने दोन दिवसांपूर्वी प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर केले.

दरम्यान, या प्रकरणात रोज नवनवीन खुलासे होत आहेत.

### सर्वपक्षीय मूकमोर्चा

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी विविध मागण्यासाठी परभणी शहरामध्ये सर्व पक्षीय मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये सर्वपक्षीय, सर्व जाती - धर्मीय नागरिक सहभागी झाले. नूतन महाविद्यालय येथून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये राज्यभरातील प्रमुख नेत्यांनी सहभाग घेतला.

धनंजय देशमुख हे पोलिस ठाण्यात गेले असता त्यांना धमकी देण्यात आली. धनंजय देशमुखांना धक्का लागला तर धनंजय मुंडेला रस्त्याने देखील फिरु देणार नसल्याचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

आमदार सुरेश धस यांनी अजित पवार यांच्यावरही टीका केली. धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळात का घेतले?




असा प्रश्न उपस्थित करत प्रकरणात सर्व आरोपींना मकोका लागायला हवा, अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली.

गुन्हेगारांना फाशी झालीच पाहिजे, अशी मागणी परभणीचे खासदार संजय जाधव यांनी केली. पैशाच्या लालसे पोटी माणुसकी हरवून बसलेल्यांना त्यांची जागा दाखवून देण्याचे आपले कर्तव्य असल्याचे संजय जाधव म्हणाले.

दुसरीकडे, धनंजय मुंडे यांनी राजीनामा देण्यापेक्षा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना मंत्रिमंडळातून काढायला हवे, अशी मागणी नरेंद्र पाटील यांनी केली आहे. मूकमोर्चानंतर विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आपापली मते मांडली.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या विजयाला न्यायालयात आव्हान

■ **महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :**
विधानसभा निवडणुकीत निवडणुकीत घोळ झाल्याची शंका काँग्रेसच्या पराभूत उमेदवारांना आहे. या निवडणुकीत मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून हस्तक्षेप करण्यात आल्याचा आरोप करून काँग्रेसच्या विदर्भातील आठ विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे.



निवडणूक रद्द करून ती नव्याने घेण्याची मागणी या याचिकेतून करण्यात आली आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवडणुकीला आव्हानसुद्धा देण्यात आले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्याविरोधात दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघातून लढलेले काँग्रेसचे उमेदवार प्रफुल्ल गुडधे, दक्षिण नागपूरचे उमेदवार गिरीश पांडव, माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी मंत्री राजेंद्र शिंगणे, सुभाष धोटे, शेखर शेंडे, संतोषसिंग रावत, सतीश वारजूरकर यांनी ही याचिका सादर केली आहे.

राज्यात पुन्हा महाविकास आघाडीची सत्ता येईल, असे दावेही काँग्रेसच्या नेत्यांमार्फत केले जात होते. मात्र निवडणुकीच्या निकालात महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला. काँग्रेसचे फक्त १६ आमदार निवडून आले होते. पहिल्या निवडणुकीपासून कधीच पराभूत झाले नसलेले बाळासाहेब थोरात, यशोमती ठाकूर यांचा यात समावेश आहे. त्यामुळे अनेकांना निकालावर शंका आहे.

ईव्हीएमने निवडणूक घेण्यापूर्वी या कायदेशीर प्रक्रियेची पूर्तता निवडणूक आयोगाने केली नाही. ईव्हीएमने निवडणूक घ्यायची असल्यास काही निकष देण्यात आले होते. तेसुद्धा केले नाही. ईव्हीएमने निवडणूक घेण्यासाठी नोटिफिकेशनसुद्धा निवडणूक आयोगाने काढले नसल्याचे गुडधे यांनी सांगितले. पराभूत उमेदवारांनी मागणी केल्यानंतरही सीसीटीव्हीचे फुटेज, फॉर्म नंबर १७ दिले जात नाही. पाच व्हीव्हीपॅटची फेरमोजणी करण्यास मान्यता आहे. अनेकांनी याकरिता पैसे भरले आहेत. मात्र, व्हीव्हीपॅटची मोजणीसुद्धा केली जात नाही. आरटीआय अंतर्गत ही माहिती देणे बंधनकारक आहे. असे असतानाही आमचे हक्क डावलल्या जात असल्याचे गुडधे यांनी सांगितले. या सर्वांचा समावेश याचिकेत करण्यात आला आहे.

## लष्कराचा ट्रक दरीत कोसळला
# ४ जवान शहीद

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ४ :**
जम्मू-काश्मीरमधील बांदीपोरा जिल्ह्यात शनिवारी दुपारी लष्कराचा एक ट्रक दरीत कोसळला. या अपघातात ४ जवान शहीद झाले. तर २ जवान गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील एसके पायीन भागात हा अपघात झाला. येथे ट्रक रस्त्यावरून घसरला आणि दरीत कोसळला. बचावकार्य सुरू आहे. या घटनेचा तपशील काही वेळानंतर लष्कराच्या प्रवक्त्यांकडून जाहीर केला जाऊ शकतो.


यापूर्वी २४ डिसेंबर रोजी पुंछ जिल्ह्यात लष्कराची व्हॅन ३५० फूट खोल दरीत पडली होती. व्हॅनमध्ये १८ सैनिक होते. यापैकी ५ जणांचा मृत्यू झाला होता. अपघातात सहभागी झालेले सर्व जवान ११ मराठा रेजिमेंटचे होते. यापूर्वी नोव्हेंबरमध्ये दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये ५ जवान शहीद झाले होते. ४ नोव्हेंबर रोजी राजौरी येथे झालेल्या अपघातात दोन जवानांना प्राण गमवावे लागले होते. त्याच वेळी, २ नोव्हेंबर रोजी रियासी जिल्ह्यात तीन जवानांची कार दरीत कोसळल्याने त्यांचा मृत्यू झाला होता.

## अजमेर दर्ग्यावर चढवली पीएम मोदींची चादर

■ **वृत्तसंस्था, अजमेर, दि. ४ :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाठवलेली चादर ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांच्या दर्ग्यावर अर्पण करण्यात आली.

अजमेर दर्गा वादाच्या पार्श्वभूमीवर शनिवारी केंद्रीय अल्पसंख्याक कार्य मंत्री मंत्री किरेन रिजिजू पंतप्रधानांनी पाठवलेली चादर घेऊन दर्ग्यावर पोहोचले होते. येथे त्यांनी देशात शांतता आणि बंधुभावासाठी प्रार्थना केली. मोदींच्या वतीने चादर अर्पण करणे म्हणजे संपूर्ण देशाच्या वतीने चादर अर्पण करण्यासारखे असल्याचे रिजिजू म्हणाले.

Government of Maharashtra
Ministry of Railways
-महा रेल-
MRIDC


श्री. नरेंद्र मोदी
मा. पंतप्रधान, भारत सरकार

लोकार्पण सोहळा
वेळ : रविवार, दिनांक ०५ जानेवारी २०२५, सायंकाळी ०५:०० वाजता
स्थळ : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालय क्रीडा मैदान, पी जी हॉस्टेल परिसर, सेंट्रल बाजार रोड, नवी रामदासपेठ, नागपूर
महाराष्ट्रातील रु. ३७३ कोटींच्या सात (०७) रेल्वे उड्डाणपूलांचे लोकार्पण


श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य


श्री. एकनाथ शिंदे
मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य


श्री. अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्रातील सात जिल्ह्यांमधील सात उड्डाणपूलांचे लोकार्पण राज्यातील वाहतूकीच्या पायाभूत सुविधा अधिक सक्षम बनविण्याच्या दिशेने वाटचाल

- गोधनी रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक क्र. २९३ येथील उड्डाणपूल, नागपुर जिल्हा
- सिंदी रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक क्र. १०३ येथील उड्डाणपूल, वर्धा जिल्हा
- चांदुर रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक क्र. ७० येथील उड्डाणपूल, अमरावती जिल्हा
- चंद्रपूर शहरातील बाबूपेठ येथील रेल्वे फाटक क्र. ४३ए/१४३ए येथील उड्डाणपूल, चंद्रपुर जिल्हा
- दोंडाईचा शहरातील रेल्वे फाटक क्र. १०५ येथील उड्डाणपूल, धुळे जिल्हा
- जळगांव रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक क्र. १४९ येथील उड्डाणपूल, जळगांव जिल्हा
- वाशिम रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक क्र. ११५ येथील उड्डाणपूल, वाशिम जिल्हा

❖ विशेष उपस्थिती ❖

श्रीमती रक्षा खडसे – मा. केंद्रीय राज्यमंत्री, युवक कल्याण व क्रीडा, भारत सरकार
श्री. चंद्रशेखर बावनकुळे – मा. मंत्री, महसूल, महाराष्ट्र राज्य
श्री. गिरीश महाजन – मा. मंत्री, जलसंपदा, (विदर्भ तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य
श्री. गुलाबराव पाटील – मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र राज्य
श्री. जयकुमार रावल – मा. मंत्री, पणन, राजशिष्टाचार, महाराष्ट्र राज्य
श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोंसले – मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून), महाराष्ट्र राज्य
श्री. संजय सावकारे – मा. मंत्री, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य
श्री. प्रताप सरनाईक – मा. मंत्री, परिवहन, महाराष्ट्र राज्य
ॲड आशिष जयस्वाल – मा. राज्यमंत्री, वित्त व नियोजन, कृषी मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार महाराष्ट्र राज्य
श्रीमती माधुरी मिसाळ – मा. राज्यमंत्री, नगर विकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ, महाराष्ट्र राज्य
डॉ. पंकज भोयर – मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म, महाराष्ट्र राज्य

❖ सन्माननीय उपस्थिती ❖

श्री. श्यामकुमार बर्वे – लोकसभा सदस्य, रामटेक
सौ. प्रतिभा धानोरकर – लोकसभा सदस्य, चंद्रपूर
श्री. संजय देशमुख – लोकसभा सदस्य, वाशिम
श्रीमती स्मिता वाघ – लोकसभा सदस्य, जळगाव
श्री. अमर काळे – लोकसभा सदस्य, वर्धा
डॉ. शोभा बच्छाव – लोकसभा सदस्य, धुळे
श्री. एकनाथ खडसे – विधान परिषद सदस्य
श्री. किशोर दराडे – विधान परिषद सदस्य
श्री. सत्यजित तांबे – विधान परिषद सदस्य
श्री. सुधाकर अडबाले – विधानपरिषद सदस्य, नागपूर विभाग
श्री. अभिजित वंजारी – विधानपरिषद सदस्य, नागपूर विभाग
डॉ. परिणय फुके – विधानपरिषद सदस्य, नागपूर विभाग
श्री. कृपाल तुमाने – विधान परिषद सदस्य
श्रीमती भावना गवळी – विधान परिषद सदस्य, वाशिम
श्री. धीरज लिंगाडे – विधान परिषद, अमरावती
श्री. वसंत खंडेलवाल – विधान परिषद सदस्य, अमरावती
श्री. किरण सरनाईक – विधान परिषद सदस्य, अमरावती
श्री. अमरिशभाई पटेल – विधान परिषद सदस्य, धुळे
डॉ. नितिन राऊत – विधानसभा सदस्य, उत्तर नागपूर
श्री. कृष्णा खोपडे – विधानसभा सदस्य, पूर्व नागपूर
श्री. प्रविण दटके – विधानसभा सदस्य, मध्य नागपूर
श्री. मोहन मते – विधानसभा सदस्य, दक्षिण नागपूर
श्री. विकास ठाकरे – विधानसभा सदस्य, पश्चिम नागपूर
श्री. समीर मेघे – विधानसभा सदस्य, हिंगणा, नागपूर
श्री. चरणसिंग ठाकूर – विधानसभा सदस्य, काटोल, नागपूर
श्री. संजय मेश्राम – विधानसभा सदस्य, उमरेड
श्री. सुरेश भोळे – विधानसभा सदस्य, जळगाव
श्री. प्रताप अडसड – विधानसभा सदस्य, धामणगाव रेल्वे
श्री. किशोर जोरगेवार – विधानसभा सदस्य, चंद्रपूर
श्री. समीर कुणावार – विधानसभा सदस्य, हिंगणघाट
श्री. श्याम खोडे – विधानसभा सदस्य, वाशिम
सौ. मुक्ता कोक्कडे – अध्यक्षा, जिल्हा परिषद, नागपूर

आणि संबंधित क्षेत्राचे इतर सर्व मा. राज्यसभा व लोकसभा सदस्य, मा. विधान परिषद व विधानसभा सदस्य

२ रा मजला, हेक्स्ट हाऊस, नरीमन पॉइंट, मुंबई ४०००२१
info@maharail.com +९१ २२ ६८५१७४१०/६७४७७५१० www.maharail.com
https://www.facebook.com/maharailmridc/ https://www.twitter.com/Maharail_Corp
https://www.linkedin.com/mridc-mumbai-97ab27194/

विनित
राजेश कुमार जायसवाल
व्यवस्थापकीय संचालक, महारेल

## म्हाडाकडून ५५५ सदनिकांचे वितरण



■ **नाशिक :** भूखंडाचे तुकडे करणाऱ्या प्रकल्पांच्या चौकशीचा विषय ऐरणीवर आल्यापासून म्हाडाला आतापर्यंत शहरातील १४८५ सदनिका उपलब्ध झाल्या. यातील १५७ प्रकल्पातील १३२८ सदनिका वितरित केल्या गेल्या असून लवकरच आणखी नऊ प्रकल्पातील ५५५ सदनिका अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात येणार आहेत.

गोरगरीबांना परवडणाऱ्या दरात हक्काची घरे मिळावीत, यासाठी राज्य सरकारने आणलेल्या २० टक्के सर्वसमावेशक गृह योजनेला शहरातील विकासकांनी बगल देण्यासाठी सलग भूखंडाचे तुकडे पाडून प्रकल्प रेटल्याचा विषय काही वर्षांपासून गाजत आहे.

या संपूर्ण प्रकाराची चौकशी सुरू झाल्यानंतर म्हाडा आणि महापालिकेत विविध मुद्यावरून बेबनाव झाला. शहरात उपरोक्त योजनेंतर्गत ३३ प्रकल्प पूर्ण झाले. यातील २० टक्के सदनिका राखीव आहेत. म्हाडाला आतापर्यंत १४८४ सदनिका उपलब्ध झाल्या असून त्यातील १३२८ सदनिकांचे वितरण झाल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. अल्प आर्थिक उत्पन्न गटाला दिलेल्या या सदनिका १५७ प्रकल्पातील आहेत. आठवडाभरात आणखी नऊ प्रकल्पातील ५५५ सदनिका सोडत पद्धतीने वितरित केल्या जातील. त्याची जाहिरात लवकरच काढली जाणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

## वर्षभरात १२ कोटींचा मुद्देमाल हस्तगत

■ **नाशिक :** २०२४ या वर्षभरात नाशिक ग्रामीण पोलिसांनी अवैध व्यवसायांविरोधात सहा हजार ८५२ कारवाया केल्या. त्यामाध्यमातून १२ कोटींचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध व्यवसायाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मोहीम राबवण्यात आली. लोकसभा, विधानसभा निवडणुकांवेळी ग्रामीण पोलिसानी अवैध व्यवसायांचा बिमोड करत सराईत गुन्हेगार व समाजविघातक कृत्य करणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक कारवाया केल्या. वर्षभरात ग्रामीण पोलिसांनी सहा हजार ८५२ छापे टाकून ८११० जणांविरुद्ध कारवाई केली. १२ कोटी, सात लाख, ९२ हजार ८९२ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. तसेच अवैधरित्या अग्नीशस्त्रे बाळगणाऱ्या २७३ जणांविरुद्ध २०७ गुन्हे दाखल केले. त्यात ५२ देशी बंदुका, ११५ जिवंत काडतुसे, ११२ तलवारी, ३२ कोयते आणि ३५ चाकू हस्तगत करण्यात आले.

२०२४ मध्ये जिल्ह्यात ८७ हत्यांची नोंद झाली असून ८५ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. १८ दरोडे पडले. दरोड्याचे सर्व १८ गुन्हे उघडकीस आणले. ८६ गुन्हेगारांविरुद्ध हद्दपारीचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यापैकी सद्यस्थितीत १८ गुन्हेगार हद्दपार करण्यात आले असून एमपीडीए कायद्यान्वये पाच गुन्हेगारांना स्थानबद्ध करण्यात आले आहे.

## पाच वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार

■ **मुंबई :** घराबाहेर खेळणाऱ्या एका पाच वर्षीय मुलीला निर्जन ठिकाणी नेऊन शेजाऱ्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली. पीडित मुलीच्या आईने केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी ५५ वर्षीय व्यक्तीला अटक केली.

ही पीडित मुलगी आई-वडिलांसोबत राहते. दुपारी ती घराबाहेर खेळत असताना शेजारी राहणाऱ्या व्यक्तीने पीडित मुलीला खाऊचे आमिष दाखवून एका निर्जन ठिकाणी नेले. तेथे त्याने पीडित मुलीवर लैंगिक अत्याचार केले. घरी परतल्यानंतर मुलीने घडलेला प्रकार आई-वडिलांना सांगितला. मुलीच्या आईने याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली.

## साडेचार लाखाचा गुटखा जप्त



■ **नाशिक :** राज्यात प्रतिबंधित असलेल्या सुंगधित तंबाखूचा (गुटखा) साठा अन्न व औषध प्रशासनाच्या विभागाने पेठ तालुक्यातील कोटंबी घाटात वाहनातून जप्त केला. सुमारे चार लाख ८७ हजार ५०० रुपयांचा गुटखा आणि वाहन असा मुद्देमाल जप्त केला.

अन्न व औषध प्रशासनाने गुटख्याविरूध्द मोहीम सुरू केली असून त्याचाच भाग म्हणून अन्न सुरक्षा अधिकारी योगेश देशमुख यांच्या पथकाने जिल्ह्यातीत सीमावर्ती भाग असलेल्या पेठ तालुक्यात पाळत ठेवली होती. यासंदर्भात पोलिसांशीही समन्वय साधण्यात आला होता. कोटंबी घाटात एक वाहन संशयास्पदरित्या फिरत असल्याचे लक्षात आल्यावर पथकाने पोलिसांना माहिती दिली. पेठ पोलिसांनी संशयास्पद वाहन थांबवून तपासणी केली असता इतर मालाबरोबर तंबाखुच्या गोण्या आढळल्या. वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये राज्यात प्रतिबंधित असलेल्या तंबाखुच्या गोण्या आढळल्या. वाहन चालकाने जयप्रित सिंह (रा. हरियाणा) असे त्याचे नाव सांगितले. वाहनातून १३ गोण्या आणि ५०० ग्रॅम वजनाची पाकिटे असा चार लाख ८७,५०० रुपयांचा साठा जप्त केला. यातील काही नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले. तसेच वाहनही ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शेतकरी हितासाठी वेगवेगळे उपक्रम

### कृषी संवाद कार्यक्रमात केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांचे प्रतिपादन



■ **महासागर प्रतिनिधी**
**नाशिक, दि. ४:**
शेतकऱ्यांना पीक विम्याचे पैसे मिळण्यात येणाऱ्या आडकाठी दूर केल्या, उपग्रहाव्दारे छायाचित्र घेऊन नुकसानीची माहिती घेण्याची व्यवस्था केली, यासारख्या कृषिविषयक निर्णयांची माहिती देत केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले.

येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील कृषी विज्ञान केंद्रातर्फे आयोजित कृषी संवाद कार्यक्रमात केंद्रीय मंत्री चौहान यांनी संवाद साधला. शेतकऱ्यांना पैसे न देता व्यापारी निघून जातात. अशा फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांना आम्ही न्याय दिल्याशिवाय राहणार नाही. नवनव्या पिकांचे उत्पादन घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

कृषिविषयक यंत्र घेण्यासाठी अनुदान देण्यापेक्षा थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे दिल्यास हवे ते यंत्र ते घेऊ शकतील. अशा सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी तुम्ही तुमचे सहकारी घेऊन दिल्लीत या, असे आमंत्रण चौहान यांनी राज्याचे कृषिमंत्री कोकाटे यांना दिले. यावेळी मध्य प्रदेशात राबविण्यात आलेल्या विविध सरकारी योजनांची माहिती त्यांनी दिली. शेतकऱ्यांमध्ये देव दिसतो. त्यांच्या भल्यासाठी जे करता येईल ते आम्ही करू, असेही त्यांनी सांगितले.

राज्याचे कृषिमंत्री कोकाटे यांनी, नाशिक येथील शेतकरी प्रयोगशील असून नाविन्याचा शोध घेतात, असे सांगितले. शेतकऱ्यांच्या पाठीवरील फवारणी यंत्राऐवजी आता ड्रोनच्या माध्यमातून फवारणी करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

राज्य सरकारतर्फे ऑनलाईन पोर्टल तयार करून ते महसूल विभागाशी जोडून शेतकऱ्यांना मिळणारी अनुदानाची प्रक्रिया सुलभ आणि सुटसुटीत करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी खासदार भास्कर भगरे, खासदार डॉ. शोभा बच्छाव, आ. हिरामण खोसकर, कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे आदी उपस्थित होते. यावेळी केंद्रीय कृषिमंत्र्यांनी मुक्त विद्यापीठाच्या आवारात बचत गट, कृषी उत्पादक गट, उमेद अभियानातील गट यांनी उत्पादित केलेल्या वस्तुंच्या प्रदर्शनाची पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधतांना उत्पादनासाठी असणारा खर्च, येणारे उत्पन्न व नफा किंवा तोटा याची माहिती घेतली.

कार्यक्रमात चौहान यांनी उपस्थित राज्याचे कृषिमंत्री माणिक कोकाटे यांच्यासह भास्कर भगरे आणि डॉ. शोभा बच्छाव हे दोन्ही खासदार, आमदार हिरामण खोसकर यांचा आपल्या विशेष शैलीत उल्लेख केला.

कृषिमंत्री शेतकऱ्यांसाठी माणिक झाले. भास्कर तर सूर्याचे नाव, शोभाही आहे. आमदार तर हिरा आहेत, असे चौहान म्हणाले. माणिकराव तुम्ही माझ्यासाठी, मी तुमच्यासाठी, आणि आपण दोघे शेतकऱ्यांसाठी, असे त्यांनी नमूद केले.

## उड्डाणपुलावर भीषण अपघात ; टँकर मधून रसायन गळती



■ **महासागर प्रतिनिधी**
**पालघर, दि. ४:**
मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर विवळवेढे उड्डाणपुलावर सोमवार ३० डिसेंबर रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास रसायन वाहतूक करणाऱ्या टँकरने सिमेंट पाईप घेऊन जाणाऱ्या ट्रेलरला धडक दिल्यामुळे भीषण अपघात झाला.

अपघातात टँकर फुटून मोठ्या प्रमाणात रसायनाची गळती झाली असून चालक टँकर मध्ये अडकला आहे. तर सिमेंट पाईप वाहून नेणाऱ्या वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे.

अपघातामुळे महामार्गावरील मुंबई वाहिनीवरील वाहतूक काही काळ थांबवण्यात आली होती. दरम्यान स्थानिकांनी टँकर मध्ये अडकलेल्या चालकाला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला.

पोलीस यंत्रणेला माहिती मिळाल्यानंतर काही वेळात पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून चालकाला बाहेर काढण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. वाहनांमधून मोठ्या प्रमाणात रसायन गळती झाल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. रसायन ज्वलनशील नसल्याची खात्री पटल्यानंतर नागरिकांनी वाहनजवळ जाऊन मदतकार्य सुरू केले आहे.

## फेब्रुवारी अखेरपर्यंत रवींद्र नाट्य मंदिर खुले करा

### सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांचे निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४:**
पु. ल. देशपांडे अकादमीच्या नूतनीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन नाट्य, चित्रपट कलावंत आणि प्रेक्षकांना रवींद्र नाट्य मंदिर फेब्रुवारी अखेर पर्यंत खुले करु देण्याच्या दृ?टीने कामाचे नियोजन करा, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी अधिकाऱ्यांना दिले.

अकादमीच्या नूतनीकरणाचे काम वेगाने सुरू असून या कामाची पाहणी शेलार यांनी केली. यावेळी अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबधित अधिकारी उपस्थित होते. हे नूतनीकरण करीत असताना कलावंत व प्रेक्षकांना अद्ययावत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असून रवींद्र नाट्य मंदिरात नाटक अथवा चित्रपट सुध्दा पाहता येणार आहे. त्यासाठी मोठी एलईडी स्क्रिन व सिनेमासाठी आवश्यक असणारा डॉल्बी साऊंड सिस्टीम सुध्दा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

तर नाटकांसाठी लागणारी ध्वनिमुद्रण सुविधा अद्ययावत करण्यात आली असून आसन व्यवस्था सुध्दा आरामदायी करण्यात आली आहे. तसेच मिनी थिअटरमध्ये सुध्दा नाटक, सांस्कृतिक कार्यक्रम यासह सिनेमासाठी सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

## पाच कंपन्यांचा निविदेला प्रतिसाद

### ठाणे भाईंदर प्रकल्प लवकरच मार्गी



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४:**
ठाणे-भाईंदरदरम्यानचा अतिवेगवान प्रवास आणि वाहतूक कोंडीमुक्तीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) दोन महत्त्वाकांक्षी गायमुख-फाऊंटन हॉटेल नाका बोगदा आणि फाऊंटन हॉटेल नाका-भाईंदर उन्नत रस्ता हे दोन प्रकल्प हाती घेतले आहेत.

त्यासाठी एमएमआरडीएने काही महिन्यांपूर्वी एकत्रित निविदा प्रसिद्ध केल्या होत्या. नुकत्याच त्या खुल्या करण्यात आल्या असून त्याला पाच कंपन्यांनी प्रतिसाद दिला.

निवडणूक रोखे खरेदीतील चर्चित मेघा इंजिनीअरिंग आणि नवयुग इंजिनीअरिंगसह अन्य दोन कंपन्यांच्या निविदांचा यात समावेश आहे.

निविदांची छाननी करून आर्थिक निविदा खुल्या केल्या जातील. निविदा प्रक्रियेअंती नियुक्त करण्यात येणाऱ्या कंत्राटदारावर प्रकल्पाचे आरेखन तयार करण्यासह बांधकामाची जबाबदारी असेल.

मात्र निविदेची संपूर्ण प्रक्रिया, प्रकल्पासंबंधीची पुढील कार्यवाही पूर्ण करून प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यासाठी आणखी काही महिने प्रतीक्षा करावी लागेल.

## कांदा व्यापाऱ्याचे ११ लाख रुपये हिसकावले

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ४:**
एखाद्या चित्रपटाला साजेशा पद्धतीने टोळक्याने मेळा बस स्थानकात उभ्या असलेल्या बसमध्ये कांदा व्यापाऱ्यास लुटले. धक्काबुक्की करुन व्यापाऱ्याच्या ताब्यातील ११ लाख ६६ हजार रुपये असणारी पिशवी हिसकावून नेली. यावेळी व्यापाऱ्याने आरडाओरड केल्यामुळे एक परप्रांतीय चोरटा हाती लागला. त्याचे तीन साथीदार रोकड घेऊन पसार झाले.

याबाबत विष्णू पाचोरे (शिवाजीनगर, सिन्नर) यांनी तक्रार दिली. प्रवाशांच्या मदतीने अन्वर मनियार (४८, कुआ, बुलंद, उत्तर प्रदेश) या संशयित चोरट्यास पकडण्यात आले. पाचोरे हे कांदा व्यापारी आहेत. ते मालेगाव तालुक्यातील उमराणे येथे कांदा खरेदीसाठी निघाले होते. सकाळी मेळा बस स्थानकात आले.

साडे सातच्या सुमारास नाशिक-धुळे बसमध्ये बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेवून चोरट्यांनी त्यांना धक्काबुक्की केली आणि मनियार यांच्याकडील ११ लाख रूपये असलेली पिशवी हिसकावून पसार झाले. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू आहे.

# पालघरकरांनी रिचवले अकराशे कोटींचे मद्य



**अकरा महिन्यांत ३ कोटी १७ लीटर मद्याची विक्री**

■ **महासागर प्रतिनिधी, पालघर, दि. ४:**
पालघर जिल्ह्यात मद्य पिण्याचे प्रमाण वाढले आहे. अकरा महिन्यात देशी विदेशी, बिअर व वाईन अशी सुमारे ३ कोटी १७ लीटर मद्य मद्यप्रेमींनी मनसोक्त रिचवली आहेत. सर्वाधिक २ कोटी लीटर बिअर रिचवली आहे. या मद्याविक्रीतून अकराशे कोटींचा महसूल राज्य उत्पादन शुल्क विभागाला प्राप्त झाला आहे.

पालघर जिल्ह्यात देशी दारू विक्रीचे ९७ आस्थापने, विदेशी मद्य विक्रीची (वाईन शॉप) ३५ दुकाने तर ५२१ बिअर विक्रीची दुकाने आहेत. याशिवाय ३९८ परमिट रुम (बार ॲण्ड रेस्टॉरंट) आहेत. तेथून मद्यविक्री होत असते. या मद्यविक्रीची नोंद राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे असते. देशी मद्य, विदेशी मद्य (व्हिस्की, व्होडका, रम) बिअर आणि वाईन असे मद्याचे प्रकार आहे.

मागील काही वर्षांपासून पालघर वसई विरार मध्ये मद्य पिण्याचे प्रमाणात वाढ होत आहे. यंदाच्या वर्षात पालघर जिल्ह्यात ४९ लाख ६६ हजार ८५२ लीटर देशी मद्याची विक्री झाली आहे. तर ६४ लाख ५४ हजार१७ लीटर, ३ लाख ८४ हजार ६३० लीटर वाईन आणि १ कोटी ९८ लाख ९६ हजार ४७७ लीटर इतक्या बिअरची विक्री झाली आहे. या अकरा महिन्यात पालघरकरांनी जवळपास अकराशे बारा कोटीं रुपयांचे मद्य खरेदी करून ते मनसोक्त रिचवले आहे.

आता वाढती रिसॉर्ट संख्या, पार्ट्यांचे आयोजन यासह विविध कार्यक्रम यामुळे ही मद्यपान होण्याचे प्रमाण वाढीस लागत आहे.

मद्य पिण्याचे प्रमाण वाढल्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या तिजोरीत अकराशे कोटींचा महसूल मिळाला आहे असे पालघर राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक सुधाकर कदम यांनी सांगितले आहे. जे बेकायदेशीर मार्गाने मद्य विक्री व वाहतूक करीत आहेत त्याच्यावर कारवाया केल्या जात आहेत असेही त्यांनी सांगितले आहे.

**कारवाईत ६ कोटींचे मद्य जप्त**

बेकायदेशीर मार्गाने मद्याची विक्री व वाहतूक यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाई केली जाते. मागील अकरा महिन्यात उत्पादन शुल्क विभागाच्या पथकांनी १ हजार १०० इतक्या कारवाया करून गुन्हे दाखल केले आहेत. यात ५९ लाख ९३ हजार ७६ लीटर असे ६ कोटी ९ लाख ८६ हजार ९२७ रुपयांचे मद्य जप्त केले आहेत. यात ९२१ आरोपींना ही अटक करण्यात आल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिली आहे.

**बेकायदेशीर मद्याची आकडेवारी नाही**

अधिकृत परवानाधाकर मद्यदुकानांतून मद्य विक्रीची आकडेवारी उपलब्ध असली तर बाहेरील राज्यातून चोरट्या मद्यविक्रीची नोंद होत नसते. दिवदमण, सिल्वासा आदी भागातून उत्पादनशुल्क चुकवून मद्य आणले जाते आणि त्याची बेकायदेशीररित्या विक्री होते असते. त्यामुळे मद्य पिणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.

### गंगापूर धरणातून थेट जलवाहिनीचे काम प्रारंभ

# तीन दशकांचा प्रश्न मार्गी लागणार



■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ४:**
गंगापूर धरण ते बारा बंगला जलशुध्दीकरण केंद्र या दरम्यान ४२५ दशलक्ष लिटर क्षमतेची साडेबारा किलोमीटर नवीन लोखंडी जलवाहिनी टाकण्याच्या कामास सुरुवात झाली आहे.

सध्या लोखंडी पाईपवर गंज प्रतिबंधक प्रक्रिया केली जात आहे. लवकरच खोदकाम होऊन प्रत्यक्ष पाईप टाकले जातील. या जलवाहिनीद्वारे पुढील ३० वर्षातील संभाव्य लोकसंख्येचा पाणी पुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

गंगापूर धरणातून सध्या बारा बंगला जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत सिमेंटच्या वाहिनीद्वारे पाणी आणले जाते. साधारणतः अडीच दशकांपूर्वी केलेली ही सिमेंटची जलवाहिनी जीर्ण झाली आहे. गळतीमुळे पाणी पुरवठ्यात अडथळे येतात. या पार्श्वभूमीवर, महापालिकेने १५ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून १८०० मिलीमीटर व्यासाची मुख्य लोखंडी जलवाहिनी टाकण्याचे निश्चित केले होते. प्रारंभी या कामासाठी २१० कोटींचा खर्च गृहीत धरण्यात आला होता.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यता घेऊन निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. हे काम जिंदाल कंपनीला मिळाले. विविध कारणांस्तव रखडलेल्या या कामाचा श्रीगणेशा झाला आहे.

नव्या जलवाहिनीचे काम नऊ महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित आहे. गंगापूर धरणातून शहरात येणा?या उजवा तट कालव्याची जागा पाटबंधारे विभागाकडून यापूर्वीच महापालिकेकडे हस्तांतरीत झाली आहे. त्या जागेत जुन्या वाहिनीला समांतर ही नवीन जल वाहिनी टाकण्यात येईल.

या कामासाठी अवाढव्य लोखंडी पाईप नियोजित मार्गात आणण्यात आले आहेत. सध्या लोखंडी पाईपवर गंज प्रतिबंधक प्रक्रिया सुरू असून आठवडाभरात खोदकाम होऊन प्रत्यक्ष पाईप टाकण्याचे काम सुरू होईल, असे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता रवींद्र धारणकर यांनी सांगितले.

नाशिक शहरातील पाणी पुरवठ्यासाठी ७५ टक्के पाणी गंगापूर तर २५ टक्के पाणी मुकणे धरणातून घेण्यात येते. सद्यस्थितीत एकूण ५५५ दशलक्ष लिटर पाणी धरणातून घेतले जाते. यातील गंगापूर धरणातून अस्तित्वातील वाहिन्यांची क्षमता सुमारे ३०० दशलक्ष लिटर आहे. हे सर्व पाणी शहरातील सात केंद्रात शुद्धीकरण करून ११९ जलकुंभ आणि सुमारे अडीच हजार किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्यांमधून वितरित केले जाते.

गंगापूर धरण ते बारा बंगला ही नवीन जलवाहिनी जुन्या वाहिनीला समांतर असणार आहे. नवीन जलवाहिनीची क्षमता २२ तासात ४२५ दशलक्ष लिटर पाणी वहनाची आहे. ती २४ तास कार्यरत राहिल्यास ही क्षमता ४६० दशलक्ष लिटरपर्यंत जाऊ शकते. शहराची २०५५ पर्यंतची लोकसंख्या गृहीत धरून जलवाहिनीचे नियोजन झाल्याचे अधिकारी सांगतात.

## क्राईम कॉर्नर

### क्रेनची दुचाकीला धडक ; १ ठार, १ जखमी

**नागपूर,दि. ०४ जानेवारी :** क्रेन चालकाच्या निष्काळजीपणामुळे दुचाकीस्वार एका व्यक्तीचा जीव गेला तर दुसरा गंभीर जखमी झाला. अपघाताची ही घटना शुक्रवारी नवीन कामठी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. सुधीर केशव मानवटकर (५४) रा. मिसाळ लेआऊट, जरीपटका असे मृताचे नाव आहे. जखमी इंद्रकुमार श्यामलाल मगनानी (४८) रा. जनता हॉस्टपीटलजवळ जरीपटका यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

इंद्रकुमार आणि सुधीर हे मित्र असून त्यांच्या दुसऱ्या एका मित्राकडे लग्न समारंभ होते. शुक्रवारी सायंकाळी कामठी रोडवरील भाटिया लॉनमध्ये समारंभ आयोजित करण्यात आला होता. दोघेही मित्र एमएच-४९/झेड-५९०७ क्रमांकाच्या दुचाकीने लग्नाला भाटिया लॉन येथे गेले होते. लग्न समारंभ आटोपून दोघेही रात्री ८.३० वाजताच्या सुमारास घराकडे निघाले. काही अंतरावर जात नाही तोच रस्त्यावर मोठी वाहनकोंडी असल्याचे दिसून आले. त्यांनी आपले वाहन रस्त्यावर एका बाजूला उभे केले आणि वाहतूक सुरळीत होण्याची प्रतीक्षा करीत होते. त्याच दरम्यान मागून आलेल्या क्रेन क्र. एमएच-३२/एएस-९८९४च्या चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून दुचाकीला जबर धडक दिली. दोघेही मित्र वाहनासह खाली पडून गंभीर जखमी झाले. आसपासचे लोक मदतीला धावले. दोघांनाही उपचारार्थ कामठीच्या उपजिल्हा रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून सुधीर यांना मृत घोषित केले, तर इंद्रकुमार यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी इंद्रकुमार यांच्या तक्रारीवरून आरोपी क्रेन चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### घरफोडीत अल्पवयीन पोलिसांच्या जाळ्यात

**२४ तासांच्या आत गुन्ह्याचा लावला छडा**

**नागपूर,दि. ०४ जानेवारी :** पाचपावली पोलिसांनी ठाण्यात नोंद घरफोडीच्या गुन्ह्याचा २४ तासांच्या आत भंडाफोड करून एका अल्पवयीनला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून दागिन्यांसह एकूण ४५ हजारांचा माल जप्त केला. सूचनापत्र देऊन त्याला सोडण्यात आले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गत १ जानेवारीच्या सायंकाळी ८.३० वाजताच्या सुमारास बाबा बुद्धाजीनगर परिसरात राहणाऱ्या फिर्यादी पुष्पांजली शशांक नागदिवे (३३) मुलीसोबत घराला कुलूप लावून वाढदिवसाच्या कार्यक्रमाला गेल्या होत्या. या दरम्यान अज्ञात आरोपीने मागच्या दाराचा कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून सोन्याचांदीचे दागिने व रोख ६८ हजार असा एकूण ८२ हजारांचा माल चोरी करून पसार झाला. घरी परतल्यावर ही घटना उघडकीस आली आणि त्यांनी पाचपावली ठाण्यात तक्रार दाखल केली.

पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. खबऱ्यांना कामावर लावण्यात आले. तांत्रिक तपास आणि खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीवरून आरोपीचा सुगावा लागला. गुरूवारी सायंकाळी अल्पवयीनला ताब्यात घेण्यात आले. पालकांच्या उपस्थितीत विचारपूस केली असता त्याने गुन्हा कबूल केला. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीतील ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई वपोनि बाबुराव राऊत व पोनि हरेश काळसेकर यांच्या मार्गदर्शनात पोहवा पवन भटकर, राजेश कोकाटे, पोशि शाहनवाज मिर्झा, ओमप्रकाश बुरडे, शंकर आगळे, मनोज चौधरी यांनी केली.

### तडीपार गुंडास अटक

**नागपूर,दि. ०४ जानेवारी :** शांतीनगर पोलिसांनी ठाण्यांतर्गत गस्तीदरम्यान एका तडीपार गुंडाला राजरोजपणे फिरताना अटक केली. सिराजूल हक अब्दुल हक (५०) रा लालनगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

सिराज हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध अनेक गंभीर स्वरुपाचे गुन्हे नोंद आहेत. त्याच्या गुन्हेगारीची लगाम कसण्यासाठी गत १२ नोव्हेंबर रोजी झोन तीनच्या डीसीपींनी त्याला ३ महिन्यांसाठी जिल्ह्यातून तडीपार केले होते. शुक्रवारी सायंकाळी ठाण्याचे पथक परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान सिराज परिसरातील नरेश पानठेल्याजवळ फिरत असल्याची माहिती मिळाली. पोलिस नरेश पानठेल्याजवळ पोहोचले असता सिराजने तेथून पळ काढला. पोलिसांनी घेराबंदी करून सिराजला पकडले. ठाण्यात आणून त्याचा अभिलेख तपासला असता तो तडीपार असून विना परवानगी शहरात फिरत असल्याचे समजले. पोलिसांनी कलम १४२ अन्वये गुन्हा नोंदवून त्याला अटक केली.

### ४.२० लाखांच्या मालावर डल्ला

**नागपूर,दि. ०४ जानेवारी :** अज्ञात आरोपीने एका बंद घराचे कुलूप तोडून दागिने व रोकड असा एकूण ४ लाख २० हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना जरीपटका पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी सरस्वती बाबुलाल विश्वकर्मा (६०) रा. ईडब्ल्यूएस क्वॉर्टर, हाऊसिंग बोर्ड कॉलनीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

गत गुरूवारी दुपारच्या सुमारास सरस्वती घराला कुलूप लावून मुलीकडे गेल्या होत्या. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील रोख २० हजार आणि सोन्याचांदीचे दागिने असा एकूण ४,२०,५०० रुपयांचा माल चोरी करून पसार झाला. शुक्रवारी सायंकाळी सरस्वती घरी परतल्या असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### ५.७२ लाखांच्या औषधांची अफरातफर

**नागपूर,दि. ०४ जानेवारी :** रुग्णालयाच्या फार्मसीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी ५.७२ लाख रुपये किंमतीच्या औषधांची अफरातफर करून त्यांची परस्पर बाजारात विक्री केली. ऑडिटमध्ये ही अफरातफर पुढे आली आणि पोलिसात तक्रार करण्यात आली. पोलिसांनी लखन राजेंद्र देविकर (३४) रा. कुंभारपुरा, जुनी मंगळवारीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. आकिब जमील शेख (२६) रा. सेवासदन बिल्डींग, गांधीबाग असे आरोपीचे नाव आहे.

फियार्दी लखन हे छत्रपती चौकातील न्यू ईरा फार्मसीत आयटी प्रमुख आहेत. आरोपी आकिब गत ४ वर्षांपासून प्रतिनिधी म्हणून फार्मसीत काम करीत होता. गत २६ डिसेंबर २०२४ रोजी फार्मसीतील औषधांचे ऑडिट केले असता ५.७२ लाख रुपयांचा माल कमी असल्याचे समजले. व्यवस्थापनाने याचा तपास सुरू केला. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता आरोपी आकिब १ नोव्हेंबर ते २६ डिसेंबर दरम्यान वेळोवेळी फार्मसीतून औषध चोरी करताना दिसला. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. पोलिसांनी हेराफेरीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### आत्मविश्वासाने आयुष्याचा प्रवास सुगम होतो

**पोलिस आयुक्त डॉ. सिंगल यांचा ज्येष्ठ नागरिकांना सल्ला**

**नागपूर,दि. ०४ जानेवारी :** जीवनात मागे बघाल तर अनुभव मिळेल, पुढे बघाल तर आशा. आजूबाजूला बघाल तर सत्य आणि अंतर्मनात बघाल तर आत्मविश्वास मिळेल. आत्मविश्वासाच्या बळावर आयुष्याच्या संघर्षमय प्रवास सुगम करता येतो. सर्वच समस्यांवर मार्ग काढता येतो. त्यामुळे आत्मविश्वास सोडू नका. सर्वच सुना नकारात्मक विचारांच्या नसतात, सर्वच मुले एकसारखी राहू शकत नाही. त्यांना समजून घ्या. असा मोलाचा सल्ला पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल यांनी ज्येष्ठ नागरिकांना दिला.

पोलिस आयुक्तालयातर्फे आई वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ संबधी तक्रारी व समस्यांचे निवारण आणि तज्ज्ञामार्फत मार्गदर्शन कार्यक्रम पोलिस भवनात आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी डॉ. सिंगल बोलत होते. या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती होती. तरुण पीढी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या विचारात बरेच अंतर आहे.

# महारेल निर्मित राज्यातील सात उड्डाणपूलांचे लोकार्पण

## महारेलची उल्लेखनीय कामगिरी, आणखी सात उड्डाणपूलांचे लोकार्पण

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. ०४ जानेवारी :**

महाराष्ट्र रेल इनफ्रास्ट्रक्चर डेवलपमेंट कार्पोरेशन (एमआरआयडीसी) की जे महारेल या नावाने सर्वत्र प्रसिद्ध आहे, अशा महारेलनिर्मित महाराष्ट्रातील सात (०७) नव्याने बांधलेल्या रेल्वे उड्डाणपूलांचे (रोड ओव्हर ब्रिजेस) नागपूर येथून लोकार्पण होत आहे. महारेल राज्याच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी आणि येथील जनतेचे जीवनमान सुधारण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधांचे महत्त्व ओळखते.

महारेलनिर्मित उड्डाणपूल हे राज्याच्या रेल्वे आणि रस्ते पायाभूत सुविधा अधिक सक्षम बनविण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, ज्याचा उद्देश कनेक्टिव्हिटी सुधारणे आणि वाहतूक कोंडी कमी करणे आहे. हे प्रकल्प महाराष्ट्र शासन व महारेलच्या महाराष्ट्राला रेल्वे फाटकमुक्त राज्य बनविण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या वचनबद्धतेचा एक भाग आहे. महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांच्या विकासाच्या प्रवासात महारेल राज्यभरात रेल्वे उड्डाणपूल, भुयारी मार्ग (आरओबीएस, आरयुबीएस, एलएचएस) आणि नवीन रेल्वे लाईन प्रकल्पांची उभारणी करून महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

महारेलनिर्मित महाराष्ट्रातील सात उड्डाणपूलांचा हा उद्घाटन समारंभ दिनांक ०५ जानेवारी २०२५ रोजी सायं. ५:०० वाजता डॉ. पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालय क्रीडा मैदान, सेंट्रल बाजार रोड, नवी रामदासपेठ, नागपूर येथे महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न होत आहे.

यापैकी काही उड्डाणपूल लोकप्रतिनिधी व स्थानिकांच्या मागणी प्रमाणे वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहेत; तथापि, या सर्व उड्डाणपूलांचे आज आपण औपचारिकपणे लोकार्पण करत आहोत.

या समारंभाला संबंधित जिल्ह्यांचे सन्माननीय मंत्री, राज्यसभा तसेच लोकसभा सदस्य, माननीय विधान परिषद व विधानसभा सदस्य आणि नागपूर येथील रेल्वे, सार्वजनिक बांधकाम विभाग, महानगरपालिका, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांसह महारेलचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राजेश कुमार जायसवाल यावेळी उपस्थित राहणार आहेत.

महारेल हा महाराष्ट्र शासन आणि रेल्वे मंत्रालयाचा संयुक्त उपक्रम आहे. महारेलने विविध रेल्वे लाइन आणि रेल्वे व रस्ते उड्डाणपूल प्रकल्पांना विकसित करण्यात लक्षणीय प्रगती केली आहे. नव्याने बांधलेले रोड ओव्हर ब्रिज (रेल्वे उड्डाणपूल) हे सुरक्षित प्रवासासाठी आणि रेल्वे क्रॉसिंगवरील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यामुळे राज्यातील वाहतूकीच्या पायाभूत सुविधांचा सर्वांगीण विकास होत आहे तसेच उत्तम कनेक्टिव्हिटी देणे, प्रवास सुलभ व सुरक्षित करणे आणि राज्यातील वाहतुकीच्या शाश्वत उपायांना प्रोत्साहन देणे हे महामंडळाचे उद्दिष्ट आहे.

या प्रसंगी महारेतचे व्यवस्थापकीय संचालक राजेश कुमार जायासवाल म्हणाले, महारेल महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधाऱ्या प्रगतीसाठी समर्पित आहे आणि आमचे नवीनतम रेल्वे उड्डाणपूल (आरओबी/आरयुबीएस) प्रकल्प आमच्या वचनबद्धतेचा पुरावा आहेत. हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे कारण आज आम्ही राज्यभरात आणखी सात उड्डाणपूलांचे (०७ आरओबी) लोकार्पण करत आहोत.

उद्घाटन होणारे सर्व उड्डाणपूल परिसरातील वाहतूक सुरळीत व सुरक्षित करतील आणि यामुळे वाहतूक कोंडी दूर होऊन प्रवाशांचा वेळ देखील वाचणार आहे महारेल संपूर्ण महाराष्ट्रात २०० हून अधिक रोड ओव्हर ब्रिज (आरओबी/आरयुबीएस) बांधत आहे आणि आतापर्यंत २५ उड्डाणपूल (आरओबीएस) कार्यान्वित केले आहेत. महारेल महाराष्ट्राच्या रेल्वे आणि रस्ते पायाभूत सुविधाच्या विकासामध्ये एक मेलाचा दगड प्रस्थापित करण्याच्या मार्गावर आहे.

महारेलला विविध प्रकल्प सोपविल्याबद्दल मी रेल्वे मंत्रालय, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय (एमओआरटीएच) महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) तसेच एमसीजीएम, एमएमआरडीए, केडीएमसी आणि महाराष्ट्रातील इतर विकास प्राधिकरणांचे मन:पूर्वक आभार मानू इच्छितो. हे प्रकल्प सदर परिसराच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील.

### राष्ट्रीय आदर्श विद्यालयात बालिका दिन साजरा

**रामटेक ०४ जानेवारी:** राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ कला महाविद्यालय नवेगाव खैरी येथे दिनांक ३ जानेवारीला संस्था सचिव मयंक देशमुख यांच्या मार्गदर्शनात थोर समाजसेविका व भारतातील प्रथम शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त स्त्री मुक्ती दिन व बालिका दिन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र चन्ने व ज्येष्ठ शिक्षक साक्षोधन कडबे यांनी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांना अभिवादन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन शिक्षक रितेश मैंद यांनी केले. यावेळी सर्वश्री शिक्षक अनिल कोल्हे, प्रशांत पोकळे, दिलीप पवार, सतीश जुननकर, शैलेंद्र देशमुख, प्रा. अरविंद दुनेदार, प्रा. मोहना वाघ, करीना धोटे कार्यालयीन कर्मचारी गोविंद कोठेकर, लीलाधर तांदुळकर, राशिद शेख, मोरेश्वर दुनेदार हे प्रामुख्याने उपस्थित होते.

# मनपा आयुक्तांनी केली 'टाऊन हॉल' व बुधवार बाजारच्या कामाची पाहणी

## अडचणी सोडवून लवकरात लवकर काम पूर्ण करण्याचे निर्देश

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. ०४ जानेवारी :**



नागपूर महानगरपालिकेद्वारे महाल येथे श्रीमंत राजे रघूजीराव भोसले सभागृह (टाऊन हॉल) नवीन इमारतीचे बांधकाम तसेच मनपा बुधवार बाजार व्यापारी संकुलाचे बांधकाम करण्यात येत आहे. या दोन्ही कामाची पाहणी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी शनिवारी केली.

यावेळी कार्यकारी अभियंता अश्विनी येलचटवार, राजेंद्र राठोड, अनिल गेडाम, सचिन रक्षमवार, उपअभियंता राजीव गौतम, कनिष्ठ अभियंता देवचंद काकडे, कनिष्ठ अभियंता पुरुषोत्तम फाळके, 'टाऊन हॉल' प्रकल्पाचे सल्लागार आर्किटेक्ट रमाकांत भुतडा, कंत्राटदार प्रफुलवेद इन्फ्रा चे प्रफुल्ल देशमुख, बुधवार बाजार प्रकल्पाचे स्ट्रक्चरल इंजिनिअर पी.एस. पाटणकर, आर्कीटेक्ट अनुराग पशिने उपस्थित होते.

आयुक्तांनी सर्वप्रथम मनपा श्रीमंत राजे रघूजीराव भोसले सभागृह अर्थात 'टाऊन हॉल' च्या कामाचे निरीक्षण केले. ६८०८.१३ चौरस मीटर भूखंडामध्ये नवीन टाऊन हॉल चे बांधकाम केले जात आहे. या कामाकरिता प्रफुलवेद इन्फ्रा यांना कार्यादेश देण्यात आले असून त्यांचेकडून काम प्रगतीपथावर आहे. इमारतीमध्ये दोन तळमजले अधिक चार मजले असणार आहेत. खालच्या तळमजल्यावर अतिविशेष व्यक्ती, मा. महापौर यांचे वाहनांकरिता प्रवेश आणि पार्कींग असेल. दुसऱ्या तळमजल्यावर मनपा सभागृहाचे मा. सदस्य आणि अधिकारी यांचे प्रवेश, कार्यालय परिसर आणि पार्कींग असेल. पहिल्या मजल्यावर १५५ क्षमतेचे सभागृह असेल. दुसऱ्या मजल्यावर २८८ सदस्य आणि ५० अधिकारी यांची आसन व्यवस्था असलेले मुख्य सभागृह, मा. महापौर, मा. आयुक्त, मा. उपमहापौर, मा. विरोधी पक्षनेते यांचे कार्यालय असेल. तिसऱ्या मजल्यावर अभ्यागत, पत्रकार यांच्यासह २१० व्यक्ती आसन क्षमतेची गॅलरी असेल आणि चौथ्या मजल्यावर कार्यालये, कॅन्टीन आणि मोकळे छप्पर असेल. या सर्व कामातील बारकावे आयुक्तांनी जाणून घेतले.

टाऊन हॉल च्या बांधकामाशेजारी हेरिटेज इमारत असून या इमारतीचे बळकटीकरण देखील करण्यात येणार आहे. हेरिटेज इमारतीवर प्रक्रिया करण्यापूर्वी हेरिटेज तज्ञांचा सल्ला घेणे व हेरिटेज समितीपुढे विषय सादर करण्याचे निर्देश यावेळी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले. त्यांनी बांधकामामध्ये काही महत्वाच्या सूचना देखील नोंदविल्या.

### दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचे नवीन व्यवस्थापक (डीआरएम) दीपककुमार गुप्तांनी पदभार स्वीकारला



■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. ०४ जानेवारी :**

नागपूर : दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचे नवीन व्यवस्थापक (डीआरएम) दीपककुमार गुप्ता यांनी ३० डिसेंबरला आपल्या पदाची सूत्रे स्वीकारली. आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या भांडवलावर ते नागपूर विभागातील रेल्वे सेवा अधिक चांगली करतील, अशी अपेक्षा आहे. गुप्ता भारतीय रेल्वेत १९९६ पासून सेवा देत आहेत. ते एम.एस्सी. ग्रीकल्चर असून त्यांनी एलएलबीचीही पदवी मिळवली आहे.

त्यांनी रेल्वेत सहायक कार्मिक अधिकाऱ्याच्या रूपात जबलपूरमध्ये सेवेला प्रारंभ केला होता. त्यानंतर त्यांनी रेल्वे भर्ती बोर्ड भोपाळचे सचिव, जबलपूरचे वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी आणि मुख्य कार्मिक अधिकारी बिलासपूरसह रेल्वेच्या विविध ठिकाणी वेगवेगळ्या महत्त्वपूर्ण पदावर कार्य केले आहे.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या रेंगाळलेल्या सेवांना गती देऊन गुप्ता प्रवाशांना अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी आपला अनुभव वापरतील, असा विश्वास त्यांच्या बदूल व्यक्त केला जात आहे.

# तरुण प्रकाश यांनी दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक म्हणून पदभार स्वीकारला

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. ०४ जानेवारी :**



०१ जानेवारी २०२५ रोजी, श्री तरुण प्रकाश यांनी दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक म्हणून पदभार स्वीकारला. या नियुक्तीपूर्वी, ते मुख्य कार्यकारी संचालक (सिग्नल आणि दूरसंचार)/रेल्वे बोर्डात विकास या पदावर कार्यरत होते.

श्री तरुण प्रकाश हे भारतीय रेल्वे सिग्नल अभियांत्रिकी सेवा चे १९८८ च्या बॅचचे अधिकारी आहेत. त्यांनी आयआयटी रुरकी येथून इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन मध्ये बीटेक केले. आणि आयआयटी दिल्लीतून कॉम्प्युटर सायन्समध्ये एम.टेक पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी बिकोनी मेलॉन आणि आयएसबी हैदराबाद येथून व्यवस्थापन क्षेत्रातील विशेष प्रशिक्षण घेतले आहे. त्यांनी मलेशिया आणि सिंगापूरसारख्या देशांतील नामवंत संस्थांमधून अभ्यास करून प्रशिक्षण घेतले आहे. श्री तरुण प्रकाश, महाव्यवस्थापक यांनी यापूर्वी दक्षिण पूर्व मध्य रेल्वेमध्ये मुख्य मुख्य सिग्नल आणि दूरसंचार अभियंता म्हणून काम केले आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे आणि तांत्रिक कार्यक्षमतेमुळे रेल्वेला त्यावेळी मोठ्या प्रमाणात फायदा झाला.

त्यांनी उत्तर रेल्वेमध्ये सहाय्यक सिग्नल आणि दूरसंचार अभियंता म्हणून आपली रेल्वे सेवा सुरू केली आणि त्यानंतर त्यांनी उत्तर रेल्वेमध्ये मुख्य संप्रेषण अभियंता, मुरादाबाद विभागात विभागीय रेल्वे व्यवस्थापक आणि दक्षिण पूर्व मध्य रेल्वेमध्ये प्रमुख मुख्य सिग्नल आणि दूरसंचार अभियंता अशी महत्त्वाची पदे भूषवली दूरसंचार अभियंता म्हणून काम केले.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे सध्या अमृत भारत स्टेशन योजने अंतर्गत प्रमुख स्थानकांच्या पुनर्विकासाला आणि स्थानकांच्या अपग्रेडेशनला गती देत आहे. याशिवाय रेल्वेच्या पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी दुहेरीकरण, तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गाचे बांधकाम सुरू असून सर्व महत्त्वाच्या रेल्वे विभागात स्वयंचलित सिग्नलिंगचे कामही वेगाने सुरू आहे. महाव्यवस्थापक म्हणून श्री तरुण प्रकाश यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या पायाभूत सुविधा आणि प्रवासी सुविधांच्या कामांना अधिक गती मिळू शकेल.

# दोन मोटारसायकलच्या धडकेत पोलीस कर्मचाऱ्या सह तरुणाचा मुत्यु

■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक,दि. ०४ जानेवारी :**





देवलापार पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या पवनी ते हिवरा बाजार हिवरा रोडवर गुरुवारी २ जानेवारी ला सायंकाळी ७.१५ च्या सुमारास दोन मोटारसायकलच्या समोरासमोर झालेल्या धडकेत पोलीस कर्मचारी आणि एका तरुणाचा मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, देवलापार पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस शिपाई क्रांतीचंद हराळ (३४) हे त्यांच्या मोटारसायकल क्रमांक एमएच-४० बिझेड-७६१८ने गस्त घालायला जात असतांना. दरम्यान, पवनीहून हिवरा बाजाराच्या दिशेने येणाऱ्या एमएच-४०, सीआर ०६१३ क्रमांकाच्या दुचाकीवरील चालक शुभम जयदेव उईके (३०, रा. अकोला, हिवरा बाजार) याचे गाडी वरुण नियंत्रण सुटले.वरघाटाजवळ विरुद्ध दिशेकडून येणारे पोलीस कर्मचारी क्रांतीचंद हराळ हे संजय बावीसताले यांच्या मोटार सायकले जात असतांना त्यांच्या मोटारसायकलला धडक झाली. घटनेची माहिती मिळताच देवलापार पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दोन्ही जखमींना देवलापरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर दोघांना नागपूरच्या वैद्यकीय महाविद्यालयात रेफर करण्यात आले. जिथे उपचारादरम्यान दि.२ जानेवारी ला शुभम उईकेचा मृत्यू झाला. पोलीस शिपाई क्रांतीचंद हराळ यांच्यावर नागपुरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असतांना दि.४ जानेवारी ला पहाटे ५ वा. दरम्यान मुत्यु झाला. पुढील तपास देवलापार पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक नारायण तुरकुंडे यांच्या मार्गदर्शनात देवलापार पोलीस करीत आहेत.

# भाजपा वाडी मंडळ महीला आघाडीच्या वतीने सावित्रीच्या लेकीचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी,दि. ०४ जानेवारी :**

भाजपा वाडी मंडळ महिला आघाडीच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधत ग्वालियर येथे पार पडलेल्या आठव्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत गोल्ड मेडल प्राप्त श्रुती राजेश मेंढे हिचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सर्वप्रथम दीप प्रज्वलित करून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली देण्यात आली. भाजपा वाडी मंडळ महिला आघाडी अध्यक्ष कल्पना सगदेव यांनी सावित्रीबाईंचे कार्य या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी मंडळ अध्यक्ष आनंद बाबू कदम,पुरुषोत्तम रागीट,राजुताई भोले,विधानसभा समन्वयक प्रमुख नरेश चरडे, महिला आघाडी जिल्हा महामंत्री सरिता यादव, शहराध्यक्ष कैलास मंथापुरवार, माजी नगरसेवक दिनेश कोचे, माजी नगरसेवक केशव बांदरे ,युवा मोर्चा अध्यक्ष ईशांत राऊत, ओबीसी आघाडी अध्यक्ष ज्योती भोरकर , अभिजीत जोशी, अक्षय तिडके, प्रकाश डवरे, ज्ञानेश्वर गावंडे, दत्ता बाबर, लिलाधर भोयर, सुधीरसिंह राणा, प्रशांत श्रीवास्तव,नाना पारधी, राहुल तायडे, लक्ष्मीनारायण केसरवानी, विशाल डोंगरे, रामप्रसाद पटले, गणेश राठोड,बिरेंद्र ठाकुर, पिंकी कर्ण,स्नेहल बंडावार,दिलीप रूद्रकार, मौसमी गुप्ता, हेमलता गौपाले, शोभा नेवाईत, प्रवीण जनबंधु, अशोक जाजु,आप्पाजी बडे उपस्थित होते.


### वाडी न.प. कार्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी



■ महासागर प्रतिनिधी
**वाडी,दि. ०४ जानेवारी :**

येथील नगर परिषद कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती साजरी करण्यात आली. यानिमीत्ताने मिठाईचे वितरण करण्यात आले. सर्वप्रथम वाडी नगर परिषदचे मुख्याधिकारी संदीप बोरकर , नगररचना विभाग प्रमुख किर्तना केंगार यांच्या हस्ते दिप प्रज्वलित करून सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले.यावेळी उपमुख्याधिकारी गौरव गाडगे,कर अधिकारी दिनेश बुधे,स्वच्छता अभियंता सुषमा भालेकर,अतुल सरदार,अमोल सोनसरे यांनी पुष्पार्पण करून अभिवादन केले. संचालन योगेश जहागीरदार यांनी केले.यावेळी बांधकाम अभियंता मोहिनी वैद्य,नितेश घोरमाडे,सिद्धार्थ शार्दूल, अभियंता नंदन गेडाम, स्वच्छता निरीक्षक धनंजय गोतमारे, स्वच्छता ब्रॅण्ड एम्बेसिडर नरेशकुमार चव्हाण, संदीप एडवे, अभिजित तराडे, माधवी भिलावेकर,मनोहर वानखेडे,भारत ढोके, भिमराव जासुतकर,आशिष गुंडूकवार,रमेश कोकाटे,गणेश कोहळे, उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलांचे सोशल मीडिया अकाउंट




आता 18 वर्षांखालील मुलांना सोशल मीडियावर खाते उघडण्यासाठी त्यांच्या पालकांची संमती घ्यावी लागणार आहे. यासाठी केंद्र सरकारने डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट (DPDP), 2023 अंतर्गत मसुदा नियम तयार केला आहे. हा मसुदा शुक्रवारी (3 जानेवारी) जनतेसाठी प्रसिद्ध करण्यात आला. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने अधिसूचनेत म्हटले आहे की, Mygov.in वर जाऊन लोक त्यांच्या हरकती नोंदवू शकतात आणि या मसुद्याबाबत सूचनाही देऊ शकतात. 18 फेब्रुवारीपासून लोकांच्या हरकती आणि सूचनांचा विचार केला जाईल.

------------------

सुमारे दीड वर्षांपूर्वी या विधेयकाला संसदेने मंजुरी दिली होती. मसुद्यासाठी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा, 2023 च्या कलम 40 च्या उप-कलम 1 आणि 2 अंतर्गत केंद्राला दिलेल्या अधिकारांच्या आधारावर नियमांचा मसुदा जारी करण्यात आला आहे.

पालकांची संमती मिळविण्याची प्रणाली देखील नियमांमध्ये नमूद केली आहे. मुलांनी त्यांचा डेटा कोणत्याही स्वरूपात वापरण्यासाठी पालकांची संमती अनिवार्य असल्याचेही म्हटले आहे. या कायद्यात वैयक्तिक डेटा गोळा करणाऱ्या आणि वापरणाऱ्या कंपन्यांना 'डेटा फिड्युशियरी' म्हणतात.

मसुद्यानुसार, डेटा फिड्युशियरी कंपन्यांना मुलांच्या कोणत्याही वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यापूर्वी पालकांची संमती घेतली जाईल याची खात्री करावी लागेल. यासाठी कंपनीला योग्य तांत्रिक आणि संघटनात्मक उपाययोजना कराव्या लागतील.

**मसुद्यातील प्रमुख मुद्दे :**

- कायद्यात वैयक्तिक डेटा गोळा करणाऱ्या आणि वापरणाऱ्या कंपन्यांना 'डेटा फिड्युशियरी' असे संबोधण्यात आले आहे.
- डेटा फिड्युशियरी कंपन्यांना मुलांच्या वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यापूर्वी पालकांची संमती मिळण्याची खात्री करावी लागेल.
- मुलाचे पालक असल्याचा दावा करणारी व्यक्ती स्वतः प्रौढ आहे की नाही हे या कंपन्यांना तपासावे लागेल.
- ई-कॉमर्स, सोशल मीडिया आणि गेमिंग प्लॅटफॉर्म डेटासाठी जबाबदार असलेल्या कंपन्यांच्या श्रेणीत येतील.
- जोपर्यंत लोकांनी संमती दिली असेल तोपर्यंत कंपनी डेटा ठेवण्यास सक्षम असेल. मसुद्यानुसार, डेटासाठी जबाबदार असलेल्या कंपन्यांना हे तपासावे लागेल की मुलाचे पालक असल्याचा दावा करणारी व्यक्ती प्रौढ आहे आणि कोणत्याही कायद्याचे पालन करणे आवश्यक असल्यास, त्याची ओळख पटवू शकते.
- मसुद्यानुसार, या डेटा कंपन्या हा डेटा केवळ त्या कालावधीसाठी ठेवू शकतील ज्यासाठी लोकांनी त्यांना संमती दिली आहे. यानंतर त्यांना हा डेटा हटवावा लागेल. ई-कॉमर्स, सोशल मीडिया आणि गेमिंग प्लॅटफॉर्म डेटासाठी जबाबदार असलेल्या कंपन्यांच्या श्रेणीत येतील.

**नियम लागू झाल्यानंतर हे अधिकार उपलब्ध होतील**

- तुमचा डेटा ॲक्सेस करण्याचा आणि वेळोवेळी अपडेट करण्याचा अधिकार.
- डेटा मालक डेटा प्रक्रियेसाठी संमती मागे घेण्यास सक्षम असतील. डेटा मिटवण्यास देखील सक्षम असेल.
- सर्व संमतींच्या नोंदी मशीन वाचनीय स्वरूपात ठेवल्या जातील.
- तुम्ही डेटा फिड्युशियरी म्हणजेच डिजिटल कंपनीच्या वेबसाइटवर तक्रार करू शकाल.
- कंपनीच्या प्लॅटफॉर्मवर तोडगा निघाला नाही, तर कडक यंत्रणेखाली तक्रार घेतली जाईल.
- वैयक्तिक डेटाचे उल्लंघन झाल्यास कंपनी सूचित करेल.

**डिजिटल कंपन्यांची जबाबदारी काय असेल?**

- डेटा प्रोसेसिंगमध्ये वैयक्तिक डेटा संरक्षण नियमांचे उल्लंघन होणार नाही याची खात्री करावी लागेल.
- डेटा प्रोसेसिंगच्या सर्व श्रेणी सार्वजनिक कराव्या लागतील. प्रक्रियेचा उद्देशही सांगावा लागेल.
- प्रक्रियेची संमती मागे घेण्यासाठी प्रक्रिया अवलंबावी लागेल. कायद्यात दिलेल्या अधिकारांचे रक्षण करावे लागेल.
- डेटा एन्क्रिप्शन आणि मास्किंग उपाय करावे लागतील. संवर्धन उपायांचे नियमित ऑडिट करावे लागेल.
- नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या संमती व्यवस्थापकांची नोंदणी निलंबित किंवा रद्द करण्याचीही तरतूद आहे.

कंपन्या नागरिकांचा वैयक्तिक डेटा भारताबाहेर नेऊ शकणार नाहीत. काही कायदेशीररित्या स्वीकार्य प्रकरणांमध्येच डेटा देशाबाहेर नेण्याची परवानगी दिली जाईल. डेटावरील ही मर्यादा केंद्राच्या डेटा स्थानिकीकरण धोरणानुसार आहे.

डेटा भंग झाल्यास तक्रारींचे निवारण करण्यासाठी मसुद्यात ठोस यंत्रणा आहे. या फ्रेमवर्क अंतर्गत, डिजिटल कंपन्यांना सार्वजनिक संप्रेषण तपशील जसे की डेटा संरक्षण अधिकाऱ्याचे ईमेल तयार करावे लागतील.

ते तक्रारीचे निराकरण करण्यात अक्षम असल्यास, डेटा मालकास डेटा संरक्षण मंडळाकडे जाण्याचा अधिकार असेल. बोर्डाच्या निर्णयाला डेटा अपील प्राधिकरणातही आव्हान दिले जाऊ शकते.

डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन कायदा ऑक्टोबर 2023 मध्ये संसदेने मंजूर केला. या कायद्याच्या अंमलबजावणीनंतर, लोकांना त्यांच्या डेटाचे संकलन, साठवण आणि प्रक्रिया याबद्दल तपशील विचारण्याचा अधिकार मिळाला.

कंपन्या कोणता डेटा घेत आहेत आणि कशासाठी डेटा वापरत आहेत हे सांगणे आवश्यक झाले आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर 250 कोटी रुपयांपर्यंत दंड आकारण्याची तरतूद होती. जुन्या बिलात ते 500 कोटी रुपयांपर्यंत होते.

राज्यसभेतून ते मंजूर झाल्यानंतर, आयटी मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले होते, 'या विधेयकाचा उद्देश वैयक्तिक डिजिटल डेटाच्या प्रक्रियेचे नियमन करणे आहे, जेणेकरून लोकांच्या गोपनीयतेचे संरक्षण केले जाऊ शकते.

●●●●



## अनाथांची आई' सिंधुताई सपकाळ

शिक्षण तुझं चौथा वर्ग
लग्न झाले नऊ व्या वर्षी
सुखाला लागली नजर, जणू
दुःख आलं तुज्या भोवती

महाराष्ट्रातील वर्धा जिल्हा
हीच तुझी जन्मभूमी
सासरवास सहन करत
हिम्मत होऊ दिली नाही कमी

आधार दिला अनाथ मुलांना
स्वावलंबी जीवन दिलं
शिक्षणाची सोय करून
त्यांचं लग्न ही तूच केल

ममता बाळ सदन ...
संस्थेची स्थपना केलीस,
बेवारस मुलांची झाली तू आई
दुःखाचा डोंगरास घाबरली नाहीस

आई तुझ्या कार्याची दखल घेत
तुला पुरस्कार ही बरेच मिळाले
साऱ्यांची झाली तू आई, अन
अनाथ मुलांना तू जीवनदान दिले

अनाथ मुलांच्या पाठीवर होता
तुझ्या आधाराचा हात
आई तुझ्या ममतेच्या
दिव्याची तेजोमय राहो सतत वात

अनाथ मुलांचा सांभाळ करत
झाली त्यांची तू आई
नवीन जिवनदान दिलं
सारे लोक म्हणतात तुला माई

तू निर्भीड एक व्यक्तिमत्व
केला सांभाळ मुलांचा
नाही केला विचार तू
या जुलमी समाजाचा

बालपनापासून तू किती
दुःख सहन केले...
मरणाच्या दारातून ही तुला
परमेश्वराने जीवनदान दिले

नव्हता तुला आधार कसला
नव्हतं तुज्या डोक्यावर छप्पर
घरदार नव्हतं, तुला
झोपली मशानात जणू हेच घर


जीव दयावा वाटला तुला
सोडून दयावं हे जगं
पोटात होत बाळ तुझ्या
सावरत स्वतःत झाली दंग

●●●●

सौ. चैताली संगोपाल वरघट
मूर्तिजापूर, जि अकोला.
9834583685

# सामाजिक नाटकांची दहा पुस्तके

## नव्या वर्षात चपराक प्रकाशनचा साहित्यिक धमाका




मराठी साहित्य सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पुस्तके प्रकाशित होत असली तरी नाट्य प्रकारामध्ये मात्र पुस्तकांची मोठ्या प्रमाणात वानवा आहे. नाट्यलेखन प्रवासात मराठी साहित्यात फारसे प्रयत्न झालेले नाही. या पार्श्वभूमीवर ह्यचपराक प्रकाशनह्च्या वतीने डॉ. सोमनाथ मुटकुळे यांची दहा नाटकांची पुस्तके एकाचवेळी प्रकाशित होत आहेत, ही नाट्य चळवळीसाठी आणि प्रकाशन क्षेत्रासाठी सुद्धा अभिमानाची गोष्ट आहे.

अलीकडच्या कालखंडात नाट्य चवळीत फारसे दखलपात्र घडताना दिसत नाही. ग्रामीण भागातील नाट्य चळवळी नव्याने पुढे येत नाहीत. अशावेळी संगमनेरसारख्या शहरातून गेली 40 वर्षे नाट्य चळवळीमध्ये योगदान देणारे डॉ. सोमनाथ मुटकुळे यांची निवडुंग व इतर नाटके, चक्र व इतर नाटके आणि राजर्षी व इतर नाटके अशा एकूण दहा नाटकांची तीन पुस्तके प्रकाशित होत आहेत.

डॉ. मुटकुळे यांची नाटके केवळ माणसांचे मनोरंजन करणारी नाहीत तर त्यापलीकडे माणसाला चिंतन, मनन करायला भाग पाडणारी आणि भविष्याकडे पाहण्यास प्रेरित करणारी आहेत.

माणसांचे जगण्याचे प्रश्न आणि महापुरुषांच्या विचारांची कास धरून पुढे जाताना त्यांच्याच विचाराकडे झालेले दुर्लक्ष, महापुरुषांच्या स्वप्नातील समाज व्यवस्थेचे वाजलेले तीन तेरा यासंदभार्तील अत्यंत मनोवेधक वेध या पुस्तकात घेण्यात आला आहे. समाजामध्ये निर्माण होणारे प्रश्न आणि त्या प्रश्नांच्या मुळाशी असणारे मूलभूत प्रश्न यांचा विचार करून नाटकातून माणसाला चिंतन करायला भाग पाडले आहे. त्यामुळे ही दहा नाटके एकाच वेळी मराठी साहित्य क्षेत्रात प्रकाशित होत आहेत हा विक्रम म्हणायला हवा.

चपराक प्रकाशनाने सुद्धा एकाच वेळी दहा नाटकांची ३ पुस्तके प्रकाशित करून प्रकाशन व्यवसायात विक्रम प्रस्थापित केला आहे.

या पुस्तकांचे लोकार्पण ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक संजय सोनवणी यांच्या हस्ते होत आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाशक घनश्याम पाटील, विधान परिषदेचे माजी सदस्य डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे उपस्थित राहणार आहेत.







संदीप वाकचौरे
संगमनेर

**नाटकांचे वेगळेपण...**

सध्या सर्वत्र साहित्याचा प्रवास मनोरंजनासाठी होतो आहे की काय? असा प्रश्न पडावा अशी स्थिती आहे. मात्र डॉ. मुटकुळे यांनी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, संत तुकाराम यांची विचारधारा समोर ठेवून समाजातील आरोग्याचे प्रश्न, जाती-धर्माचे प्रश्न नेमकेपणाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

जातीअंताची लढाई लढण्याची गरज असताना समाजात वाढत जाणारा जातीयतेचा विचार या निमित्ताने अधोरेखित करण्याचा प्रयत्न झाला आहे.

महाराष्ट्रात सहकार वाढला, फुलला आणि बहरला मात्र त्या पार्श्वभूमीवर सहकारात सर्वच काही चांगले घडते आहेत असे नाही. सहकारातील वाईट गोष्टीवर अत्यंत टोकदारपणे प्रहार करत मुटकुळे यांनी समाजाला जागृत करत भविष्याकडे पाहण्याची दृष्टी प्रदान केली आहे. या नाटकांमधून ते समाजाला काही इशारा देऊ पाहत आहेत.

●●●●●●

# बगिच्यात हरवू लागले बालपण

डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर.
९४२२१२५६५६

लहान मुलांचे हास्य गुंजले पाहिजे अशी बालोद्याने आता अश्लील कृत्ये आणि अनुशासनहीनतेचे केंद्र बनत आहे. शहरात अनेक उद्याने आहेत. शहरातील उद्यानांवर महापालिका, एनआयटी, वनविभागाचे नियंत्रण आहे. तरीही उद्यानांमध्ये अस्ताव्यस्त स्थिती कायम आहे.

लहान मुलांसाठी झूले, स्लाईड्स आणि इतर खेळण्याची साधने तयार करण्यात आली होती. परंतु आज ती महाविद्यालयीन मुला-मुलींनी व्यापलेली आहेत. ते झुल्यांचा गैरवापर करतात आणि मुलांना खेळण्यापासून रोखतात.

झुल्यांवर खेळण्यासाठी उत्साही असलेली निरागस मुले निराश होऊन पालकांकडे परत जातात. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केल्यास वाद निर्माण होत आहेत. तरुण जोडपे बागेत असभ्य वर्तन करत असल्याचे अनेकदा दिसून येते. बाल उद्यानासारख्या ठिकाणी हे प्रकार कोणत्याही बंधनाशिवाय सुरू आहेत.

उद्यानात कोणत्याही प्रकारची सुरक्षा व्यवस्था नसणे ही सर्वात मोठी समस्या आहे. तेथे ना कोणी सुरक्षारक्षक आहे ना कोणत्याही प्रकारची पाळत ठेवली जाते. मुलांची बाग मुलांच्या निरागसतेचे आणि आनंदाचे प्रतीक आहे. ते वाचवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाला पुढे यावे लागेल. वेळीच पावले उचलली नाहीत तर मुलांचा आनंद हिरावून घेतला जाईल आणि बाल उद्यानाचा उद्देशच फसला जाईल,

1. रक्षकांची नियुक्तीः बागेत वेगवेगळ्या झोनमध्ये रक्षकांची व्यवस्था असावी, ज्यामुळे शिस्त राखण्यास मदत होईल.
2. नियमांची अंमलबजावणीः लहान मुले आणि तरुणांसाठी विहित केलेले नियम काटेकोरपणे पाळले पाहिजेत.
3. सीसीटीव्ही कॅमेरेः बागेच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी कॅमेऱ्यांची व्यवस्था करावी.
4. जागरूकता मोहीमः मुलांची बाग हा मुलांचा हक्क आहे हे पालक आणि तरुणांना समजावून देण्यासाठी मोहीम राबवली पाहिजे.
5. मुलांच्या बागेत फक्त त्यांच्या पालकांसोबत असलेल्या मुलांनाच प्रवेश द्यावा. तरुणांना नाही.

सकाळची ताजी हवा, किलबिलाट करणारे पक्षी आणि हिरव्यागार गवतावरील दव थेंब - बालपणीचे हे क्षण आता फक्त पुस्तकात आणि कवितांमध्ये उरले आहेत.

आजकालची सकाळ बागांमध्ये इतकी चैतन्यशील नसून एका विचित्र शांततेत गुंफलेली असते. मुले गवतावर नव्हे तर बाकावर बसलेली दिसतात, बॅट किंवा फुटबॉल ऐवजी मोबाईल हातात धरतात. सकाळी उद्यानांमध्ये हे दृश्य सर्रास पाहायला मिळत आहे. तसेच सकाळी दयानंद पार्कच्या बागेचे हे दृश्य मन विचलित करून गेले.

**पडद्याच्या जगात हरवलेली मुलं**

ज्या उद्यानांमध्ये एकेकाळी हशा आणि हशा गुंजत होता, तिथे आता डोके टेकलेली मुलं पडद्यांच्या दुनियेत हरवलेली आहेत. चेहऱ्यावर हसू नव्हते, उत्साह नव्हता - डोळ्यात फक्त मोबाईलची चमक होती. खेळाच्या मैदानाची जागा ऑनलाइन गेमने घेतली आहे. कबड्डी, पिठू आणि लपाछपीसारखे खेळ ढवइऋ आणि फ्री फायरने घेतले आहेत.

**पालक हे बालपणाचे गुन्हेगार**

या बदलत्या बालपणाला पालकही दोषी आहेत. मुलांना मोबाईल फोन देणे म्हणजे त्यांच्या जबाबदारीतून क्षणिक सुटका. मुल शांत बसले आहे, स्क्रीनकडे पाहत आहे,असा विचार करून पालक स्वतः त्यांच्या स्क्रीनमध्ये व्यस्त होतात. पण हा पडदा त्यांच्या मुलाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य खाऊन टाकत आहे हे त्यांना समजते का?

**मानसिक थकवा ग्रस्त मुले**

आजकाल उद्यानात बसलेली मुले ना फुलपाखरे पकडण्याचा प्रयत्न करतात ना झाडावर चढण्याचे धाडस दाखवतात. त्यांना ना दव-भिजलेल्या गवतावर अनवाणी चालण्याचा आनंद माहीत आहे, ना त्यांच्या मित्रांसोबत हसण्यातला आनंद. एकेकाळी बालपणाचा अविभाज्य भाग असलेला खेळ आता त्यांच्या आयुष्यातून नाहीसा होत आहे.

ही परिस्थिती केवळ शारीरिक आळस आणत नाही तर मानसिक थकवा देखील आणते. मोबाईलच्या चमकदार स्क्रीनचा परिणाम मुलांच्या डोळ्यांवर आणि मेंदूवर होत आहे. एक काळ असा होता की मुलांनी कथांमधून प्रेरणा घेतली; आज ते मोबाईल हिंसाचार आणि आभासी जगाच्या प्रभावाखाली जगत आहेत. त्यांना रोखण्याचे धाडस कोणात नाही

मोबाईल गेममधून मुलांमधील बेधडकपणा थांबवण्याचे धाडस अनेकांमध्ये नाही. त्यांना कोणी समजवण्याचा प्रयत्न केला तर त्याला पराभवाला सामोरे जावे लागते. तू तुझं काम कर, मला बाहेर भेट तुला दाखवतो असं उत्तर आहे.

**समाजाचे नुकसान**

हा बदल मुलांचेच नव्हे तर समाजाचेही नुकसान आहे. मोबाईलवर अवलंबून असलेले हे बालपण थांबवण्यासाठी आपण पावले उचलली नाहीत, तर येणारा काळ या बागांची शांतता कायमचीच करेल. आपल्या मुलांना पुन्हा हिरवेगार गवत, मोकळे आभाळ, मित्रांच्या हास्याकडे घेऊन जायचे आहे.

**बालपण वाचवा**

बालपण हे फक्त वय नसून ती जीवनशैली आहे. असे आवाहन योग थेरपिस्ट डॉ. प्रवीण डबली यांनी केले आहे. त्यांनी प्रशासनाला देखील प्रत्येक बागेत सक्षम रक्षकांची व्यवस्था आणि सीसीटीव्ही देखील जेणेकरून मुलांवर लक्ष ठेवण्याची भीती राहील, जेणेकरून ते चुकीच्या गोष्टी करू शकत नाहीत.

●●●●●●

# पाकिस्तान - तालिबान संघर्ष वाढला

भारताशी समोरासमोर युद्ध करणे शक्य नसल्याने पाकिस्तानने दहशतवादाला खतपाणी घालून भारतात अराजकता माजवण्याचा प्रयत्न केला. विशेषतः जम्मू काश्मीर मध्ये त्यांनी दहशतवाद्यांना हाताशी धरून जम्मू काश्मीर कायम अस्थिर करण्याचा प्रयत्न केला.

भारताशी लढण्यासाठी ज्या दहशतवादाचा पाकिस्तानने शस्त्र म्हणून वापर केला तेच दहशतवादाचे शस्त्र आता त्यांच्यावर बुमरांग होत आहे. तालिबान ही दहशतवादी संघटना आहे हे सर्व जगाने मान्य केले आहे. ज्या वेळी तालिबानने अफगाणिस्तानवर कब्जा मिळवला. त्यावेळी जगातील बहुतेक देशांनी तालिबानच्या सरकारला मान्यता देण्यास नकार दिला. मात्र पाकिस्तानने तालिबानला सुरवातीपासूनच समर्थन दिले. अफगाणिस्तानातील तालिबानी सरकारला मान्यता देणारा पाकिस्तान हा जगातील पहिला देश होता. अर्थात त्यामागे त्यांचा वेगळा डाव होता.

तालिबानला मान्यता दिल्यास तालिबानला सोबत घेऊन भारतात घुसखोरी करून भारतात अस्थिरता माजवता येईल तसेच जर भविष्यात भारताविरुद्ध लढाई झाली तर त्यात तालिबानची मदत घेता येईल हा पाकिस्तानचा डाव होता. आज मात्र त्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला असून तालिबानने भारताशी पंगा न घेता पाकिस्तानशीच पंगा घेत पाकिस्तानातच घुसखोरी सुरू केली. मागील वर्षी पाकिस्तान आणि अफगाणिस्तान सीमेवर प्रचंड तणाव निर्माण झाला होता.

तालिबानने पाकिस्तानी हद्दीत प्रवेश करून पाकिस्तानच्या सीमावर्ती भागातील एका जिल्ह्यात सरकार स्थापन केले होते. याची कबुली खैबर पखतूनच्या राज्यपालांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली होती. पाकिस्तानच्या हातून हा भाग निघून गेल्याने पाकिस्तानमध्ये खळबळ माजली होती. हा होता या दोन्ही देशातील तणावाचा पहिला अंक.

श्याम ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे,
९९२२५४६२९५

आता दोन्ही देशातील तणावाचा दुसरा अंक सुरू झाला आहे. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या सीमावर्ती भागात हवाई हल्ले करून २ डझनाहून अधिक तालीबानिंना ठार केले. पाकला तालिबानने ही जशास तसे उत्तर दिले. अफगाणिस्तानने पाक अफगाण सीमेवर तैनात असलेल्या १९ पाकिस्तानी रेंजर्सला ठार केले. पाकच्या २ चौक्यांवर देखील ताबा मिळवला.

यावरून हे स्पष्ट झाले की आता पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात युद्ध सुरू झाले आहे. हा संघर्ष नजीकच्या काळात थांबेल असे वाटत नाही उलट वाढतच जाईल. पाकिस्तानने अफगाणिस्तानला कमी लेखून मोठी चूक केली आहे. पाकिस्तानकडे अत्याधुनिक शस्त्रसाठा आणि अफगाणिस्तानपेक्षा कैक पट अधिक सैन्य आहे. अफगाणिस्तानकडे आजही जुनेच शस्त्र असून त्यांची सैन्य संख्याही कमी आहे.

तालिबानी चिवट आणि लढाऊ आहेत. त्यांनी याआधी रशिया आणि अमेरिकेलाही चिवट झुंज दिली आहे त्यामुळे त्यांनी पाकिस्तानला गुडघे टेकवायला लावले तर आश्चर्य वाटायला नको. वास्तविक अफगाणिस्तानात जेंव्हा तालिबानचे सरकार आले तेंव्हा दोन्ही देशात सौहार्दाचे वातावरण होते मात्र अल कायदाचा मोठा दहशतवादी अल जवाहिरी पाकिस्तानात मारला गेला. अमेरिकेने त्याला पाकिस्तानात घुसून मारले. या सर्व कारवाईत पाकने अमेरिकेला मदत केली असा आरोप तालिबानने केला आणि तेथून या दोन्ही देशातील संबंध बिघडले.

त्यात पाकने पाकिस्तानात राहणाऱ्या अफगाणिस्तानी नागरिकांना देशातून हाकलण्यास सुरवात केल्याने हा तणाव आणखी वाढला आता तर हा तणाव पराकोटीचा वाढला आहे. भारताचा काश्मीर प्रांत बळकावण्यासाठी तालिबानचा वापर करता येईल असे पाकला वाटले होते. त्याच तालिबानने आता पाकचाच भूभाग बळकावून चांगलेच तोंडघशी पाडले आहे.

●●●●●●

# शेतीत स्वयंस्फूर्तीने आलेल्या झाडापासून मिळालेल्या उत्पन्नावर इन्कमटॅक्स लागतो का?

सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना

अनेकांच्या शेतीच्या उत्पन्नावर इन्कमटॅक्स विभागाद्वारे टॅक्स लावले जाते तेव्हा शेतकरी गोंधळतात. या लेख मालाद्वारे शेतकऱ्यांना स्पष्ट कल्पना मिळेल की कोणते उत्पन्न शेतीचे असते तथा कोणते उत्पन्न शेतीचे म्हणून मानले जात नाही.

**प्रश्न** : उत्स्फूर्त आलेल्या झाडापासून मिळालेल्या उत्पन्नावर इन्कमटॅक्स लागतो का?

■ उत्स्फूर्त आलेल्या झाडापासून आलेले उत्पन्न म्हणजे जे झाड जंगलात स्वयंस्फूर्तीने आलेले असतात. यालाच इंग्रजी मध्ये spontaneous growth असा शब्द वापरला गेला आहे. अशा झाडापासून मिळालेले उत्पन्न हे शेतीचे उत्पन्न असते की नसते असा प्रश्न आहे. राजा मुस्तफा अलीखान विरुद्ध कमीशनर ऑफ इन्कमटॅक्स (1948) 16 ITR 330 या केस मध्ये कोर्टासमोर त्या वेळी असाच प्रश्न आला. त्यावेळी कोर्टाने या विषयावर सखोल चर्चा करुन मार्गदर्शन केले.

मुस्तफा अलीखान यांनी जंगलापासून (FO REST) चे उत्पन्न 25144/- रु मालिकांना पासून 6967/- रु आणि एन्युईटी तथा व्याजापासून 1,07,000/- असे उत्पन्न इन्कमटॅक्स रिटर्न मध्ये दाखवले.

करदात्याचे म्हणणे होते की सदरील उत्पन्न हे शेतीचे उत्पन्न म्हणून धरले जावे तथा त्यावर अर्थातच इन्कमटॅक्स सरकारने लादू नये या प्रसंगी औंध च्या प्रमुख कोर्टाने मद्रास उच्च न्यायलयातील युवराजाह ऑफ पिठापुरम विरुद्ध कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स मद्रास (1946) 745 तथा अलाहाबाद हायकोर्टाच्या बेनॉय रतन बनेरयी विरुध्द कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स (1946) 15 ITR 98 याचा संदर्भ विचारात तथा चर्चेत घेतला.

कोर्टाने असा विचार केला की जंगलातील झाडे आपोआप स्वयंस्फुर्तीने उगली तथा वाढली. जर एखादे उत्पन्न शेतीचे आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी शेतीची प्रक्रिया करणे आवश्यक असते. जर करदात्याने म्हणजेच येथे शेतकऱ्याने काहीच अंग मेहनत किंवा यंत्राद्वारे मेहनत केली नसेल तर त्यास कोर्टाने शेतीचे उत्पन्न मानण्यास मान्यता दिली नाही.

यालाच सोप्या भाषेत असे म्हणता येईल की आपोआप जंगलात आले व वाढले अशा जंगली उत्पन्नास कायद्यात शेतीचे उत्पन्न मानले जाणार नाही. शेतीचे उत्पन्न न मानल्या गेल्यामुळे या उत्पन्नावर इन्कमटॅक्स शेतकऱ्यास सरकारला द्यावाच लागेल. जर शेतीचे उत्पन्न असते तर का असते तथा तसेच जर एखादे उत्पन्न शेतीचे नसते तर ते कायद्यात का नसते याची सविस्तर चर्चा करत आहोत. या पुढेही येणाऱ्या चर्चेत शेतकऱ्याने जर शेती फिल्म शुटींग किंवा टेलीविजन च्या सीरीयला च्या शुटींग साठी टेम्पररी बेस वर दिली असेल तर असे उत्पन्न शेतीचे मानले जाते की नाही. फार्म हाउस उत्पन्न, फळबाग पासूनचे उत्पन्नाबदल व्यवहारी तथा इन्कमटॅक्स कायद्या संबंधी विषयावर चर्चा करणार आहोत, जे इन्कमटॅक्स रिटर्न भरण्यासाठी करदात्यास उपयोगी ठरावे.




■ ■ ■

## अशोकायन

### आम्ही सावित्रीच्या लेकी!

पालक आहेत हतबल
महिला विश्व भयभित
दिवसा ढवळ्या होताहेत
बलात्कार अगणित....

कायद्यातील पळवाटा
शब्दांची हेराफेरी
तपास यंत्रणेची दिरंगाई
गुन्हेगारांना देई उभारी ..

महिलांना मिळेल सरंक्षण
गुन्हेगारांना कडक शासन
तर खऱ्या अर्थाने आहे
म्हणावे लोकशाही प्रशासन..



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# वेस्ट मटेरियलच्या वापरातून पर्यावरण रक्षणाचे उद्दिष्ट



**नागपूर, ४ जानेवारी :** रस्ते आणि इमारतींच्या बांधकामात वेस्ट मटेरियलचा वापर करणे काळाची गरज आहे. कारण आज बांधकामावर खूप मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे. मजबुत व चांगल्या गुणवत्तेचे रस्ते निर्माण करणे तसेच सर्वसामान्य लोकांना परवडेल अशा घरांची निर्मीती करणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांनी केले.

खामला येथील अर्जुना सेलिब्रेशन येथे ऊर्जा व पर्यावरण विषयावर आधारित ऊर्जावरण - २०२५ या परिषदेत ना. गडकरी यांनी संवाद साधला. ते म्हणाले, जल, ध्वनी आणि वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळविणे हे आज सर्वांत मोठे आव्हान आहे. दिल्ली येथे वायू प्रदूषणामुळे तेथील लोकांचे आयुष्य दहा वर्षांनी कमी होत आहे. सरकार त्यावर उपाययोजना करत आहे. पण आमच्या मंत्रालयाने पर्यावरण रक्षणाला सर्वाधिक प्राधान्य देत रस्ते बांधणीत वेस्ट मटेरियलचा वापर करून पहिले पाऊल टाकले आहे.

वातावरणातील बदलांमुळे आज जग अनेक समस्यांचा सामना करत आहे. त्यात वाहतुकीसाठी पर्यायी इंधनाचा मार्ग निवडणे गरजेचे आहे. इथेनॉल, मिथेनॉल, बायोडिझेल, इलेक्ट्रिक, सीएनजी, बायो-सीएनजीच्या वापराला सुरुवात देखील झाली आहे. आपल्या देशात आज २२ लाख कोटी रुपयांचे फॉसिल फ्युएल आयात केले जाते. हा खर्च कमी करण्यासाठी पर्यायी इंधनाचा वापर गरजेचा आहे, याचाही ना. गडकरी यांनी आवर्जून उल्लेख केला.

अनेक ठिकाणी बांबू क्रॅश बॅरियर निर्माण करून आम्ही रस्ते निर्मितीमधील खर्च तर कमी केलाच, शिवाय पर्यावरण रक्षणातही हातभार लावला आहे. स्टीलच्या ऐवजी बांबुचा वापर रस्त्यांमध्ये होऊ लागला आहे. राईस स्ट्रॉपासून (परली) बायो-सीएनजीची निर्मिती होऊ लागली आहे. देशात सीएनजी निर्मितीचे ४०० प्रकल्प कार्यरत आहेत. तुमसरमध्ये देखील एका प्रकल्पाचे काम सुरू आहे. मनसर येथे राष्ट्रीय महामार्गावरील एक टप्पा बायो-बिटुमेनचा वापर करून तयार करण्यात आला आहे, असेही ना. गडकरी म्हणाले. दिल्ली ते चंदिगड, मुंबई ते दिल्ली या महामार्गांच्या बांधकामात ८० लाख टन कचरा वापरण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदेविरुद्ध खोट्या तक्रारी करून बदनामी करणाऱ्या सिटीझन फॉर जस्टीस ॲण्ड पीसवर कारवाईची मागणी!

## अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक यांच्याकडून चौकशीचे आश्वासन!



**अहिल्यानगर, ४जानेवारी :** मंदिरांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि मंदिरांचे सुव्यवस्थापन सुनिश्चित करण्याच्या उदात्त उद्देशाने २४ ते २५ डिसेंबर २०२४ दरम्यान शिर्डीत तृतीय महाराष्ट्र मंदिर न्यास परिषद आयोजित करण्यात आली होती; मात्र तिस्ता सेटलवाड आणि फादर सेर्डिक यांच्या सिटीझन फॉर जस्टीस ॲण्ड पीस या संघटनेने या मंदिर परिषदेविरुद्ध खोट्या तक्रारी करून सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे, अशी लिखित तक्रार मंदिर महासंघाच्या कु. प्रतिक्षा कोरगांवकर, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे कोअर टीमचे सदस्य तसेच बुर्‍हानगर जगदंबा भवानी मंदिराचे प्रमुख अधिवक्ता अभिषेक भगत, स्वामी समर्थ केंद्राचे प्रतिनिधी अजिंक्य गायकवाड यांनी अहिल्यानगर येथील जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्याकडे केली. या प्रसंगी मा. अधीक्षक यांनी चौकशी करण्याचे आश्वासन तक्रारदारांना दिले. या वेळी अहिल्यानगर येथील श्री तुळजाभवानी मंदिर, सब जेल चौकचे श्री. गणेश पलंगे उपस्थित होते. अशीच तक्रार शिर्डी पोलीस ठाण्यातही दाखल करण्यात आली आहे.

महाराष्ट्र मंदिर महासंघ, विरार येथील श्री जीवदानी देवी संस्था, श्री ज्योतिर्लिंग भीमाशंकर देवस्थान, श्री साई पालखी निवारा, आणि हिंदू जनजागृती समिती यांच्या वतीने शिर्डीत शांततेत आणि यशस्वीपणे हा कार्यक्रम पार पडला. इतकेच नव्हे, तर २०२३ मध्ये जळगाव आणि २०२४ मध्ये ओझर (पुणे) येथेही यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या सर्व आयोजनांमधून कोणाही अनुचित प्रकार घडलेले नाही, तसेच धार्मिक सलोखा बिघडलेला नाही.

तरीदेखील सिटीझन फॉर जस्टीस ॲण्ड पीस या संस्थेने जाणीवपूर्वक खोट्या तक्रारी करून भारतीय संविधानाने दिलेल्या धर्मस्वातंत्र्य आणि भाषण स्वातंत्र्य या मूलभूत हक्कांवर गदा आणण्याचा प्रयत्न केला आहे. या संस्थेवर पूर्वीपासूनच भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्याविरुद्ध खोटे आरोप करणे, बेस्ट बेकरी प्रकरणात साक्षीदारांना पैसे देऊन खोट्या साक्षी देण्यास भाग पाडणे, न्यायालयात खोटे पुरावे देऊन न्यायालयाची दिशाभूल करणे, संस्थेत आर्थिक गैरव्यवहार करणे, विदेशातील फंडिंगमध्ये घोटाळे करणे इत्यादी गंभीर स्वरूपाचे आरोप झालेले आहेत. त्यामुळे सिटीझन फॉर जस्टीस ॲण्ड पीसकडून मंदिर परिषदेच्या विरुद्ध खोटी तक्रार करण्यामागे हिंदुविरोधी कटाचा भाग आहे का, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय फंडिंग घेतले आहे का, तसेच तरुणांची माथी भडकवण्याचा प्रयत्न होत आहे का, या सर्व गोष्टींची चौकशी करण्याची मागणी तक्रारदारांनी केली आहे.

सिटीझन फॉर जस्टीस ॲण्ड पीस ही संस्था पूर्वीपासूनच धार्मिक सलोखा बिघडविण्याचे काम करत असल्याचा आरोप आहे. जाणीवपूर्वक केवळ हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि हिंदुत्वनिष्ठ नेते यांच्या विरोधात तक्रारी करणे, खोट्या आरोपांची मालिका उभी करण्याचे प्रकार या संस्थेने केले आहेत. सदर तक्रारीची प्रत राज्याचे गृहमंत्री, पोलीस महासंचालक, जिल्हाधिकारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तसेच शिर्डी पोलीस ठाणे यांना पाठवण्यात आली आहे.

# सेंट पॉल स्कुल येथे वार्षिक स्नेह संम्मेलन कार्यक्रम संपन्न



**नागपूर, ४जानेवारी :** सेंट पॉल स्कुल, हुडकेश्वर, नागपूर येथे शाळेचे वार्षिक स्नेह संम्मेलन कार्यकम आयोजित करण्यात आले. दोन दिवस चालणाऱ्या कार्यक्रमात १२७ डान्स २८ नाटय, जपानी डान्स व नृत्य विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळत आहे. हे पाहण्यासाठी पालकांचा मोठा सहभाग होता. कार्यक्रमाचे उद्घाटन बिशप पॉल दुपारे सर ह्यांच्या हस्ते दिप प्रज्वलित करुण करण्यात आले. प्रमुख उपस्थिती विभागिय आयुक्त माधवी खोडे (IAS) नागपूर विभाग नागपूर समाज कल्याण आयुक्त, सिध्दार्थ गायकवाड, विलास शेंडे एक्स डायरेक्टर म्युर ममोरियल हॉस्पिटल नागपूर, डॉ. राजाभाऊ टांकसाळे संचालक विवेकशिल मित्र परिवार संस्थेचे अध्यक्ष मंदाताई टांकसाळे, सेंट पॉल कॉलेज ऑफ फार्मसी चे संचालक विपिन टांकसाळे प्राचार्य देवागणा पुंडे मुख्यध्यापक संगिता पिरके. संचालन प्रा. संगिता तानकर यांनी केले.

# काश्मीर हा भारताचा अविभाज्य अंग, होता आणि राहिल : ज्या कलमांमुळे काश्मीरला भारतापासून विभक्त करण्याचे प्रयत्न काळाने तीच कलमे हटविली: अमित शाह

**नवी दिल्ली, ४ जानेवारी :** केंद्रीय गृह, सहकार मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी 'जम्मू-काश्मीर आणि लद्दाख: सातत्य आणि संलग्नतेचे ऐतिहासिक वृत्तांत' या पुस्तकाचे प्रकाशन करताना स्पष्ट केले की, 'स्वातंत्र्यानंतर अनेक दशके काँग्रेस आणि त्यांच्या सहकारी पक्षांनी जम्मू-काश्मीरला भारतापासून विभक्त करण्याचा प्रयत्न केला. पण, अमृत कालच्या काळात कलम ३७० नावाचा कॅन्सर उध्वस्त केला. ज्याच्या आधारे जम्मू-काश्मीरला भारतापासून वेगळे करण्याचे प्रयत्न सुरू होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सक्षम नेतृत्व आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली, काश्मीरमधील दहशतवादाची पाळेमुळे नष्ट करण्यासाठी आणि शांतता आणि स्थिरता मजबूत करण्यासाठी अभूतपूर्व कार्य केले गेले आहे. कलम ३७० रद्द केल्यानंतर, काश्मीरमधील दहशतवादी घटनांमध्ये ७०% पेक्षा जास्त घट झाली आहे. त्यामुळे यावरून हे सिद्ध होते की कलम ३७० हा दहशतवादाचा स्रोत होता. २०१८ मध्ये काश्मीरमध्ये दगडफेकीच्या २,१०० घटना घडल्या, तर २०२३ मध्ये एकही घटना घडली नाही. ३३ वर्षांनंतर, काश्मीर खोऱ्यातील चित्रपट गृहांमध्ये रात्रीचे शो सुरू होऊ शकले.



ताजिया मिरवणुका सुरू असतानाच श्रीनगरच्या लाल चौकात कृष्ण जन्माष्टमीची झांकी देखील पाहिली गेली आहे.

'जम्मू-काश्मीर आणि लद्दाख: सातत्य आणि संलग्नतेचे ऐतिहासिक वृत्तांत' नावाच्या या पुस्तकाने हे सूक्ष्मपणे सिद्ध केले आहे, की देशाच्या कानाकोपऱ्यात पोचलेली आपली संस्कृती, भाषा, लिपी, अध्यात्मिक कल्पना, तीर्थक्षेत्रांच्या कला, वाणिज्य आणि व्यापाराचे अस्तित्व हजारो वर्षांपासून काश्मिरात होते. जवळपास ८ हजार वर्षे जुन्या ग्रंथातील संदर्भांच्या आधारे या पुस्तकाने हे स्पष्टपणे सिद्ध केले आहे, की काश्मीर हा पूर्वी भारताचा अविभाज्य भाग होता, आजही आहे आणि कायम राहील. देशाच्या कानाकोपऱ्यात विखुरलेला आपला समृद्ध वारसा हजारो वर्षांपासून काश्मीरमध्ये होता, हे देखील या पुस्तकातून सिद्ध होते.

काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि बंगालपासून गुजरातपर्यंत विविध संस्कृती, धर्म, खाद्य आणि वस्त्र असलेल्या या देशात अनेक दशकांपासून इतिहासकारांनी भारताच्या स्वातंत्र्याची कल्पनाच अप्रामाणिक असल्याचा समज निर्माण केला आहे. किंबहुना, इतिहासकारांनी, विशेषत: डाव्या विचारसरणीच्या इतिहासकारांनी भारताविषयी भू-राजकीय दृष्टिकोनातून पाहिले आणि लिहिले. पण भारत हा जगातील एकमेव देश आहे जो भू-संस्कृती आहे आणि ज्यांच्या सीमा संस्कृतींनी बनलेल्या आहेत.

नेपाळ ते काशी, बिहार, काश्मीर आणि अफगाणिस्तान या बौद्ध धर्माच्या प्रवासाचे संदर्भ देणारे हे पुस्तक असे दर्शवते की काश्मीर हे भगवान बुद्धांच्या नंतर परिष्कृत तत्त्वांचे जन्मस्थान होते आणि आजचे काश्मीर हे बौद्ध धर्माच्या तत्वज्ञानाचे जन्मस्थान आहे. काश्मीरचा ८ हजार वर्षांचा इतिहास या पुस्तकात असा चित्रित करण्यात आला आहे, की जणू गंगा काश्मिर खोऱ्यात सामावली आहे.

राज्यकर्त्यांना खूश करण्यासाठी जवळजवळ १५० वर्षे देशाच्या इतिहासाचा अर्थ दिल्लीचा दरबार ते बल्लीमारन आणि लुटियन्स जिमखान्यापर्यंत मर्यादित राहिला. मात्र मोदी सरकारमध्ये अंत्योदयाचे राजकारण करणाऱ्या अमित शहा यांनी इतिहासकारांना संदेश दिला की, सत्ताधाऱ्यांना खूश करण्यासाठी लिहिलेला चुकीचा इतिहास झुगारून देण्याची वेळ आता आली आहे. काश्मिरी, बाल्टी, डोगरी, लद्दाखी भाषांना शासनाची भाषा करून दीर्घायुष्य देण्याचे काम मोदी सरकारने केले आहे.

काश्मीरसाठी जीव धोक्यात घालणाऱ्या शाह यांच्या दृढनिश्चयाने कलम ३७० हटवून भारतीय इतिहासातील एक कलंकित अध्याय संपवण्याचे अभूतपूर्व काम केले आहे. भारतीय राजकारणाला नवी दिशा देणारे अखंड भारताचे सर्वात मोठे पुरस्कर्ते शाह यांच्या धोरणांमुळे आज जम्मू-काश्मीर विकासाच्या मार्गावर चालत आहे आणि नव्या भारताच्या उभारणीत आपली भूमिका बजावत आहे.

# श्रीमद् रामायण मालिका एक वर्ष पूर्ण करत असताना अभिनेता सुजय रेऊ म्हणतो, श्रीराम आपल्याला आपल्यातले वाटतात

**मुंबई, ४ जानेवारी :** सोनी सबवरील श्रीमद् रामायण मालिकेत श्रीराम (सुजय रेऊ) आणि सीता (प्राची बंसल) यांचे जीवनचरित्र उलगडले आहे. ही मालिका टेलिव्हिजनवर एक वर्ष पूर्ण करत आहे. हे यश साजरे करताना एका खास मुलाखतीत सुजय रेऊ आपल्या या प्रवासाविषयी सांगत आहे. श्रीरामाची शांत आणि धीरगंभीर मूर्ती उभी करण्यापासून ते काही सामर्थ्यशाली क्षण जगण्यापर्यंतचे अनुभव घेताना आपण या भूमिकेत किती समरसून गेलो, ते सांगत आहे, अभिनेता सुजय रेऊ.

**गेल्या एक वर्षाचा तुझा प्रवास कसा होता आणि हो मोठा टप्पा पार करताना तुला काय वाटते आहे?**

माझा विश्वासच बसत नाहीये की, ही मालिका सुरू होऊन एक वर्ष होऊन गेले! हा खरोखर एक अद्भुत अनुभव होता. इतक्या भव्य मालिकेचा एक भाग होता आले, हे मी माझे भाग्य समजतो. एक अभिनेता म्हणून श्रीरामाची भूमिका करणे ही माझ्यासाठी गौरवाची बाब होती. या भूमिकेशी निगडीत झाल्यामुळे मला प्रेक्षकांचे अपार प्रेम मिळाले आहे. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच आज हा टप्पा गाठता आला आहे.

**सिंहावलोकन केल्यास, या मलिकेतील तुझी आवडती दृश्ये किंवा क्षण कोणते आहेत?**

रामायणात असंख्य अद्भुत क्षण आहेत आणि माझ्यासाठी तर जवळजवळ प्रत्येक क्षण खूप खास आणि संस्मरणीय होता. त्यापैकी काही क्षणांची निवड करायची झाल्यास माझे आवडते सर्वात पहिले दृश्य म्हणजे माझी एंट्री झाली, ते दृश्य. या दृश्यात मी गंगा आरती केली होती, आणि पार्श्वभूमीत राम भजन वाजत होते. घाटाच्या पायऱ्या उतरून जाऊन आरती करण्याचा तो अनुभव स्वप्नवत होता. आणि जेव्हा मी फायनल शॉट पाहिला, तेव्हा पडद्यावर मीच आहे, यावर माझा विश्वासच बसत नव्हता. आणखी एक आवडते दृश्य म्हणजे स्वयंवराचे दृश्य. जे खूप छान चित्रित झाले होते. सीता हरणाचा प्रसंग देखील माझा आवडता आहे. सीतेचे अपहरण झाल्याचे श्रीरामाला समजते आणि तो शोकाकुल होतो हा प्रसंग खूप सुंदर मांडला होता. त्यातील बारकावे छान टिपले होते. त्यावेळचे चित्रण नेत्रसुखद होते आणि संगीत भावुक करणारे होते. त्यामुळे ते दृश्य फारच परिणामकारक उतरले होते.

**पडद्यावर श्रीराम साकारताना तुझ्यापुढे काही मोठी आव्हाने होती का? तू त्यांच्यावर कशी मात केलीस?**

यावर्षी जानेवारीत राम लल्लाची प्राण प्रतिष्ठा होणार होती, आणि त्याच महिन्याच्या सुरुवातीला ही मालिका सुरू होत होती. त्यामुळे ही मालिका कशी असेल आणि श्रीरामाची भूमिका कोण करणार याबद्दल विविध अंदाज बांधले जात होते. प्रत्येक दृश्यात श्रीरामाचे धीरगंभीर, करुणामय, संयमी स्वरूप उभे करणे हे सर्वात मोठे आव्हान होते. चेहऱ्यावरील हावभाव, देह बोली, डोळे यांमधून ते व्यक्त करण्यासाठी प्रचंड एकाग्रता आवश्यक होती. प्रत्येक क्षणात श्रीरामाची आभा प्रकट होण्यासाठी निरंतर कष्ट आणि निष्ठा आवश्यक होती. हवामान ही एक दुसरी अडचण होती. आम्ही कित्येकदा कडक उन्हात समुद्रकिनारी, त्या तापलेल्या वाळूत अनवाणी पायांनी चित्रण केले आहे. ते खूप आव्हानात्मक होते. हे सगळे असले तरी एका अभिनेत्यांसाठी श्रीरामाची भूमिका करायला मिळणे ही एक दुर्मिळ आणि खास संधी असते. त्यामध्ये जबाबदारी आणि मान दोन्ही आहे. त्यामुळे प्रत्येक अडचणीवर मात करताना खूप आनंद मिळत होता.

**इतर सह-कलाकारांशी तुझे संबंध कसे आहेत? खास करून लव आणि कुशची भूमिका करणाऱ्या बाल कलाकारांशी?**

लव आणि कुश साकारणाऱ्या शौर्य आणि अथर्व या दोघांशी माझे विशेष सख्य आहे. आम्ही जेव्हा एकत्र शूटिंग करतो, तेव्हा सेट्सवरील क्लिप्स पोस्ट करत असतो. ती दोन्ही फार गोड मुले आहेत. नेहमी हसत, खेळत असतात. काम खूप धकाधकीचे असूनही ती मुले कधीच मरगळलेली, दमलेली दिसत नाहीत. दोघेही खूप प्रतिभावान आहेत. त्यांच्यामुळे सेटवर एक चैतन्य असते, ज्यामुळे त्यांच्यासोबत काम करताना नेहमीच मजा येते. पॅक-अप झाल्यानंतर आम्ही बऱ्याचदा एकत्र बॅडमिंटन खेळतो आणि क्रिकेटची मॅचही खेळतो. आमची मस्तच गट्टी जमली आहे आणि त्यांच्यासोबत शूटिंग करताना, गप्पा-टप्पा करताना आणि कामानंतर दंगा करताना खरोखर मजा येते.

**श्रीरामाची भूमिका करताना तू काय काय शिकलास?**

धैर्य, करुणा, नाती जोडणे, ती निभावणे आणि सगळ्यांना समजून घेणे या गोष्टी मी श्रीराम चारित्रातून शिकलो. संकटांचा सामना कसा करावा हे या कथेमधून शिकता आले. समोर कितीही संकटं आली, तरी श्रीरामाचा तोल कधीच ढळत नाही. तसेच आपल्या तत्त्वांशी तो कधीच तडजोड करत नाही. यामधून आपल्याला शिकवण मिळते की, कठीण प्रसंगी शांत राहणे, आपल्या तत्त्वांशी एकनिष्ठ राहणे आणि योग्य निवड करणे महत्त्वपूर्ण असते.


**आजही लोकांना रामायण इतके आवडते याचे तुझ्या मते कारण काय?**

श्रीरामाची आपण एक देवता म्हणून पूजा करतो आणि त्याला देव मानतो पण त्याचवेळी तो आपण त्याच्याशी तादात्म्य पावू शकतो, कारण श्रीराम स्वतः एका माणसासारखे आयुष्य जगले आणि आपल्यातील दैवी शक्ती फार क्वचित त्यांनी प्रकट केल्या. स्वतःमध्ये प्रचंड क्षमता असून देखील त्यांनी मानवी जीवन जगण्याचे निवडले, आपल्या आसपासच्या लोकांची उन्नती केली आणि आपल्या कृतीमधून त्यांना मार्गदर्शन केले. श्रीरामांना त्यांच्या जीवनात ज्या अडचणीना तोंड द्यावे लागले, त्या अडचणी आज देखील आपल्याला आसपास दिसतात. सीतेपासून विभक्त होणे असो किंवा वारसा हक्कावरून कुटुंबात होणारे वाद असो हे संघर्ष आजच्या समाजात आणि कुटुंबांत देखील आपल्याला दिसतात. त्यावेळी श्रीरामाने रावणाचा सामना केला त्याप्रमाणे आज देखील वेगवेगळ्या रूपातील रावण आपल्याला सामोरे येताना दिसतात.

**यापुढे मालिकेच्या कथानकातील कोणत्या गोष्टी प्रेक्षकांना आकर्षित करतील?**

श्रीराम आणि सीता हे पुन्हा एकत्र येतील, त्या क्षणासाठी मी उत्सुक आहे. जेव्हा लव आणि कुश श्रीरामाला भेटतील आणि रामाला हे समजेल की, ही दोन्ही त्याचीच मुले आहेत आणि त्यांच्या उल्लेखात येणारी स्त्री म्हणजे प्रत्यक्ष सीता आहे, तो क्षण किती हृदयस्पर्शी असेल! श्रीराम आणि सीता यांचे मीलन हा नक्कीच अविस्मरणीय क्षण असणार आहे. हे दृश्य पडद्यावर कसे साकारते हे बघण्यास मी खूप उत्सुक आहे.

# शब्दकोडे क्रमांक २००७



**आडवे शब्द :-**
१) अमर्याद, पुष्कळ
३) पातक
५) पायापासून डोक्यापर्यंत
११) फळातील खाद्यभाग
१३) खरकट्याची प्रचंड रास
१४) नवरा मुलगा
१६) शहराचा कारभार पाहणारी सार्वजनिक संस्था
१८) शुभ्र, पांढरा
२०) बाण
२१) वेदनेची उसळी
२२) वेदना
२४) अवयव असलेला
२७) कर्णेंद्रिय
३०) झाळकामातील हातोड्यासारखे हत्यार
३१) एक श्वासरोग
३४) जाणता अजाणता
३५) चोख, शुद्ध सोने
३८) सक्षम स्त्री
३९) पोपट
४०) भीती
४१) अंमलदार, ऑफिसर
४३) निर्धन
४५) दारू
४६) युद्ध
४८) प्रजा, कुळावरचा सरकारी कर
५०) लज्जित होणे
५२) आरोप
५४) होडी
५५) सर्व
५६) चानी
५७) पळसाचा डिंक
५८) नष्ट, दाणादाण
५९) रात्रभर
६१) गद्यच्या विरुद्ध
६२) उपस्थित
६३) नभ
६५) जिवलग मित्र
६६) परीक्षा घेणारा
६८) तारुण्य
७०) पहारेकरी
७२) एक संगीत नाटक
७४) मुलायम (कापड)
७५) रत्न
७८) फुलाची पहिली स्थिती
७७) हिस्सा

**उभे शब्द :-**
१) अकस्मात
२) बिनावासाचे पांढरे फूल
४) दुसऱ्याचे शरीर
७) उपासना, प्रार्थना
८) स्तुत्य
९) हस्त
१०) साहित्यातील नऊ भावना
१२) धपाटा
१५) राष्ट्र
१७) ठिबकणारा, पाझरणारा
१९) गणितातील लघुत्तम साधारण विभाजक
२३) छोटी ताटली
२५) गणितातील उणे प्रकार
२६) मुख
२८) नकला करणारा
२९) पत्रकार
३०) एक आदिवासीजमात
३२) मर्कट
३३) अफूचे बी
३५) शरमणे
३७) धमनी
४२) प्रजा
४३) रानरेडा
४४) अचानक आलेले संकट, त्रासदायक मनुष्य
४७) मधमाशी
४९) सतार, संतूर, वीणा इ वाद्यांचा प्रकार
५१) एक मिश्रधातू
५२) दर्पण
५३) कमळ
५५) बरोबरीने काम करणारा
५६) खात्री
५९) गवंडी
६०) रात्र
६१) गवंड्याकडची पाण्याची पिशवी
६२) नाहक
६३) लांबट चौकोन
६४) लाज
६५) प्रश्न
६६) पुन्हा
६७) माफ
६९) उणीव, चणचण
७१) दरवाजा
७३) पूजेचा खोलगट चमचा

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# एमसीए विभाग, व्ही. एम. व्ही. कॉलेज येथे बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे यशस्वी आयोजन



**नागपूर, ४जानेवारी :** एमसीए विभाग, व्हीएमव्ही कॉलेज, वर्धमान नगर, नागपूर यांच्या वतीने ३१ डिसेंबर २०२४ ते ४ जानेवारी २०२५ या कालावधीत बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन श्री नागपूर गुजराती मंडळाचे सरचिटणीस ॲड. संजय ठाकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अभय मुदगल, एम.सी.ए. विभागप्रमुख डॉ. वैभव भेदी उपस्थित होते. या स्पर्धेत एकूण १४ मुले व ०६ मुलींचे संघ सहभागी झाले होते. याशिवाय विजेत्या संघाला रोख पारितोषिकासह आकर्षक ट्रॉफी देण्यात आली. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी समन्वयक प्रा. मृणाल मानमोडे, प्रा. रोहिणी ढगे, प्रा. अस्मिता डोणगावकर, प्रा. रेश्मा चन्ने, प्रा.प्रगती रासेकर, प्रा. गायत्री वाघुळकर, प्रा. राहुल ठवकर यांनी अथक परिश्रम घेतले. तसेच सोनाली घोटेकर, महेश ताकोटे, अतुल बोपचे, पंकज धुर्वे, पंकज नानकाटे, हुसेन खान यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगदान देणाऱ्या स्वयंसेवकांना आणि सर्व सहभागींना विशेष आभार.

# पतंग उडवा; पण जरा जपून

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. ०४जानेवारी :**
मकर संक्रात म्हणजे आनंदाचा आणि उत्साहाचा सण. हा सण जसा जवळ येऊ लागतो तसे बालगोपालांना आणि मोठ्यानाही वेध लागतात ते पतंगाचे. रंगीबेरंगी, विविध आकारातील पतंग उडविणे हा एक वेगळाच आनंद असतो. मात्र या आनंदाच्या भरात आपण सुरक्षीततेकडे दुर्लक्ष करतो. पतंगोत्सव साजरा करताना उत्साहाच्या भरात निष्काळजीपणामुळे आपणास प्रसंगी जीव ही गमवावा लागू शकतो. याचे भान राहत नाही. त्यामुळेच पतंग उडविताना काही दुर्घटना होणार नाही याची सावधगिरी बाळगावी आणि सुरक्षित ठिकाणी व वीज यंत्रणेपासून दूर राहूनच पतंग उडवावेत.



**वीजयंत्रणेत मांजा अडकण्याची शक्यता**

शहरी व ग्रामीण भागात महावितरणच्या उच्च व लघुदाबाच्या वीजवाहिन्या, रोहित्र, फिडर पिलर्स तसेच इतर वीजयंत्रणा सार्वजनिक ठिकाणी आहेत. मकरसंक्रांतीनिमित्त पतंग उडविताना पतंग किंवा मांजा वीजयंत्रणेत अडकण्याची शक्यता आहे. मात्र, कोणत्याही परिस्थितीत नागरिक किंवा लहान मुलांनी लोखंडी सळई, काठीच्या साहाय्याने वीजयंत्रणेमध्ये अडकलेला मांजा किवा पतंग काढण्याचा प्रयत्न करू नये. वीज यंत्रणेमध्ये वीजप्रवाह सुरू असताना वीजतारा, रोहित्र किंवा वीजयंत्रणेत अडकलेले पतंग काढण्याच्या प्रयत्नात वीजयंत्रणेला स्पर्श होण्याचा किंवा त्यावर चढून जाण्याचा जाणते- अजाणतेपणी धोका पत्करला जातो. त्यामुळे विजेचा धक्का लागून अपघात होण्याची मोठी शक्यता असते.

**धातूमिश्रित मांजा ठरु शकतो घातक**

सध्या बाजारात धातूमिश्रित मांजा मिळतो. या मांजावर धातूमिश्रित रसायनाचे कोटिंग केलेले असते असा मांजा वीजेच्या तारेत अडकल्यास त्यामधून वीज प्रवाह पतंग उडविणाऱ्या व्यक्ती पर्यंत पोहचून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत काळजी घेऊन सर्वांनी सुरक्षितपणे पतंगोत्सव साजरा करण्यचे आवाहन देखील महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

**पालकांनी दक्ष राहावे**

नागरिकांनी व विशेषतः लहान मुले व तरुणांनी महावितरणची विविध वीजयंत्रणा असलेल्या परिसराऐवजी सुरक्षित व मोकळ्या मैदानात पतंगोत्सव साजरा करावा. पालकांनी याबाबत दक्ष राहून लहान मुलांना सुरक्षितपणे पतंग उडविण्याबाबत मार्गदर्शन करावे. कोणत्याही परिस्थितीत वीजयंत्रणेमध्ये अडकलेले पतंग किंवा मांजा काढण्याचा प्रयल करू नये, मागिल वर्षी पतंगीमुळे महान मुलांच्या अपघाताच्या पाच घटना सामोरे आल्या होत्या, त्यापैकी जरिप्टका ठाण्यांतर्गत समतानगर येथे वीज तारांमधील अडकलेला पतंग लोखंडी सळाखीच्या मदतीने काढण्याच्या प्रयत्नात एका दहा वर्षीय मुलाला वीजेचा शॉक लागून तो ४५ टक्के भाजला होता, यात या बालकाचा पाय कापावा लागला होता, सोबतच हात आणि पाय निकामी झाले होते, अशा घटना टाळण्यासाठी पालकांनी विशेष कबरदारी घेणे आवश्यक आहे.

**हे लक्षात ठेवा**
- वीजतारांवर अडकलेला पतंग काढणे जीवावर बेतू शकते.
- तारेत अडकलेला पतंग काढण्याचा अट्टहास करू नये.
- वीजवाहिन्या असलेल्या परिसरात पतंग उडवू नये.
- अडकलेला पतंग किंवा मांजा काढायला रोहीत्रावर चढू नये.
- धातूमिश्रित मांजाचा वापर कटाक्षाने टाळा.
- दगडाला दोरा बांधून तारांवर फेकू नका.
- पतंग उडविणाएया पाल्यांकडे पालकांनी लक्ष दयावे.

# वाडीतील राकाँच्या पदाधिकाऱ्यांनी तुतारी टाकुन बांधले घड्याळ हाताला

## राकाँचे जिल्हाध्यक्ष संतोष नरवाडे , अमीत हुसनापूरे यांचा पक्ष प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी,दि. ०४जानेवारी :**
राष्ट्रवादी अजित पवार गटात घर वापसीचे प्रमाण वाढले असुन तुतारी सोडण्याची प्रक्रिया वाडीत सुरू झाली आहे. तुतारी नव्हे आता मनगटाला घड्याळच अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष संतोष नरवाडे यांनी दिली. लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार ) गटाला मिळालेल्या यशानंतर अजित पवार गटातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वीच पक्ष सोडले. मात्र विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मिळालेल्या एकतर्फी यशानंतर आता शरद पवारांची तुतारी बाजूला सारून अजित पवारांचे घड्याळ घालणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे.

नागपूर ग्रामीण भागातील अनेक बडे स्थानिक नेते तसेच कार्यकर्ते अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल होऊ लागले आहेत. विधानसभा निवडणुकीत सलील देशमुख, रमेश बंग, दुनेश्वर पेठे यांचा पराभव झाल्यानंतर पक्षपरिवर्तनाला वेग आल्याचे चित्र आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी


संतोष नरवाडे


अमीत हुसनापूरे

सामाजिक न्याय विभागाचे नागपूर जिलाध्यक्ष संतोष नरवडे, हिंगणा विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष अमित हुसनापुरे यांच्या शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देऊन अजित पवार गटात प्रवेश केला. जिल्हाध्यक्ष बाबा गुजर, शहराध्यक्ष प्रशांत पवार यांनी त्यांचे स्वागत केले. माजी मंत्री रमेशचंद्र बंग यांचे अत्यंत जवळचे असलेले संतोष नरवाडे , अमीत हुसनापूरे यांनी बंग यांची साथ सोडल्यामुळे अजुन बरेच पदाधिकारी घडयाळ बांधण्याच्या तयारीत आहे. वाडीतील वंचित बहूजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष अतुल शेंडे यांच्यासह अनेक सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीचे घड्याळ घातले आणि घरवापसी करवून घेतली. येत्या काही दिवसांत जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी राष्ट्रवादी अजित पवार गटात सामील होणार असुन हिंगणा मतदारसंघात महाविकास आघाडीला सुरंग लागणार असल्याचे संतोष नरवाडे यांनी सांगीतले.

# तेजस्वी विद्यामंदीर शाळेचे स्नेहसंमेलन साजरे




■ महासागर प्रतिनिधी
**हिंगणा,दि. ०४जानेवारी :**
हिंगणा वानाडोंगरी नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या महाजनवाडी परिसरातील तेजस्वी विद्यामंदीर व कनिष्ठ महाविद्यालय या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन विविध सांस्कृतिक कार्यक्रमासह वानाडोंगरी येथील महाराजा सेलिब्रेशन सभागृहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाडी शहर काँग्रेसचे अध्यक्ष शैलेश थोराने होते.तर रातुम विद्यापीठाचे सिनेट सदस्य डा.नितीन कोंगरे,नागपूर मेडिकल अधिक्षक डा.अविनाश गावंडे , एल. जी. डेव्हलपर्स व बिल्डर्सचे संचालक तथा महाराजा सेलिब्रेशन सभागृहाचे संचालक प्रकाश बाबडे ,संत साईबाबा शिक्षण संस्थेचे सचिव तथा राधाबाई धनवटे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देवराव कोकाटे,संत साईबाबा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा एल.जी.डेव्हलपर्स व बिल्डर्सचे संचालक धनराज बाबडे ,संत साईबाबा शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अर्पीत कोकाटे ,वाडी शहर काँग्रेसचे सचिव योगेश कुमकुमवार, सि.ए.सचिन काळे,पत्रकार गजानन ढाकुलकर, सौ. किरण बाबडे, प्राचार्या सौ.मनिषा मेने, सौ. हर्षा बाबडे व शेखर बाबडे व सामाजिक कार्यकर्ते विनायक इंगळे गुरुजी उपस्थित होते. सर्वप्रथम शालेय विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम ,बहारदार नृत्य तसेच झाडे लावा, झाडे जगवा व जल है तो कल है.अशाप्रकारे संदेश देणारे अतिशय उत्तम ,आकर्षक , मनोरंजनात्मक व उद्बोधक कार्यक्रम सादर केले. तेजस्वी विद्यामंदीर शाळेला पंचविस वर्ष पुर्ण झाल्याचा केक कापून आनंद साजरा करण्यात आला.यानंतर डा.नितीन कोंगरे ,डा.अविनाश गावंडे ,पत्रकार इंगळे गुरुजी व कार्यक्रमाचे अध्यक्ष शैलेश थोराने यांनी मार्गदर्शन केले. प्रास्तविक सौ.मनिषा मेने यांनी तर कविता शेंडे व मनिषा खवसे यांनी सुरेख सुत्रसंचालन तर आभार सौ. अर्चना पडघम यांनी मानले. यशस्वीतेसाठी अर्चना झुंजुरकर, अर्चना ढोणे, आरती हिवरे, सरला विश्वकर्मा , शितल डाखळे,चंदा गांजरे, पुनम काळे, विजय डोबके, अमित लिल्हारे,मिनल कोरे,साहील टेकाम व प्रितम बोरकुटे यांनी सहकार्य केले.

# नबीरा महाविद्यालयात वाणिज्य विभागाच्या वतीने व्यापार मेळावा आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
**काटोल,दि. ०४जानेवारी :**
नबीरा महाविद्यालय काटोल येथे वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित व्यापार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते उदघाटन सोहळा शुक्रवार ला शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष निरंजन राऊत, कोशाध्यक्ष प्रकाश चांडक,सदस्य पुरुषोत्तम मानकर, प्राचार्य डॉ. सुनीलकुमार नवीन यांच्या शुभहस्ते पार पडला यावेळी अतिथीनां माहिती देतांना त्या बोलत होत्या.

विद्यार्थी जीवनात व्यावहारीक कौशल्य निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे यातुन भावी व्यावसायिक निर्माण होत असतात व्यवसाय कसा करावा, याकरिता लागणारे भांडवलं कसे उभे करावे, व्यवसाय करतांना ग्राहकांना आपलीच वस्तू कशी उत्तम आहे हे पटवून देण्याचे प्रात्यक्षिक व्यापार मेळाव्यातून मिळते व व्यापारी दृष्टीकोन तयार होतो हाच उद्देश समोर ठेवून वाणिज्य विभागाच्या वतीने व्यापार मेळाव्याचे नियोजन केले असल्याचे प्रतिपादन वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.वैशाली रुईकर यांनी केले.

आयोजित व्यापार मेळाव्यात पदवी व पदयूत्तर पदवी घेणाऱ्या वाणिज्य विभागाच्या वतीने एकूण ३४ प्रकारचे स्टॉल उभरण्यात आले होते यात विद्यार्थीनीं जनरल स्टेशनरी वस्तू ची विक्री ते गुजरात, महाराष्ट्र, मध्यप्रदेश आदी राज्यातील खाद्य पदार्थ स्वतः तयार करून विक्री केले यातून विद्यार्थीनांमध्ये प्रत्यक्षात व्यवसाय करतांना येणाऱ्या अडचणी याची जाणीव होते व आत्मविश्वास निर्माण होतो.

मेळावा आयोजन यातून विक्री आणि व्यवसाय दृष्टीकोण वाढविने हाच उद्देश नसुन व्यवसाय करतांना व्यव्हाराची मांडणी त्याचे ताळेबंद तयार करून विद्यार्थीनां लेखी स्वरूपात वाणिज्य विभागात जमा करण्यात येण्याच्या सूचना केल्या असुन यातून व्यव्हाराची मांडणी कशी करावी याबाबतचे ज्ञान सुद्धा विद्यार्थीनां मिळणार असल्याचे डॉ. पुनीत राऊत यांनी सांगितले.

आयोजनकरिता डॉ. वैशाली रुईकर, डॉ. आर. गोंगले, डॉ. पुनीत राऊत,प्रा. मुकेश जाधव,डॉ. गुणवंत खोरगडे,डॉ. कोमल नबीरा,प्रा.विनोद वंजारी, प्राध्यापक जयंत कळंबे,प्राध्यापक संदीप,प्राध्यापीका प्रियंका बागडदे,प्राध्यापिका फाल्गुनी काठोडे,प्राध्यापीका मयुरी वाळके, प्राध्यापिका श्रुती शिरपूरक,प्राध्यापिका नैना रेवतकर,प्राध्यापक सौरभ ढोरे, प्रकाश पातूरकर आदींनी परिश्रम घेतले.

# तिड़के महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक,दि. ०४जानेवारी :**
श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, रामटेक येथे ग्रंथालय आणि मराठी भाषा विभागांच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकान्वये महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत १ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत वाचन संकल्प पंधरवाडा यानिमित्ताने २ जानेवारी २०२५ रोजी वाचन कौशल्य कार्यशाळा आणि संविधान सामान्य ज्ञान परीक्षा हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पोकळे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. सुनील कठाणे आणि गजानन रेवतकर, ग्रंथपाल हे यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी संविधान सामान्य ज्ञान परीक्षेनंतर उपस्थित विद्यार्थ्यांना वाचनाकरिता ग्रंथ वितरित करण्यात आले आणि सामूहिक वाचन करण्यात आले. प्रातिनिधिक स्वरूपात काही विद्यार्थ्यांनी प्रकट वाचन केले. त्यानंतर प्रमुख मार्गदर्शक प्रा.सुनील कठाणे यांनी आपल्या भाषणात अक्षरांच्या किंवा ध्वनींच्या उच्चाराशिवाय वाचन हे वाचनच होत नाही. म्हणून ज्याला वाचायचे आहे त्यांनी ग्रंथ वाचले पाहिजेत, परंतु कोणते वाचले पाहिजेत हे देखील ठरवता आले पाहिजेत खरं तर मानवी मूल्यांचे



संवर्धन करणारे, जीवनाला उन्नत करणारे, अर्थात जीवन मूल्यांची वृद्धी होईल असेच ग्रंथ वाचले पाहिजेत. असे विचार त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. तसेच याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत आतून प्राचार्य डॉ. शरद पोकळे यांनी वाचन कृती नसून संस्कृती आहे संस्कार आहे. वाचन ही साधना आहे वाचनाने, बुद्धि पल्लवीत होते आणि जीवन संस्कारित होते यानिमित्ताने माणसाला सत्यावर आणि ज्ञानावर प्रेम करायला शिकवणाऱ्या ग्रंथाचेच वाचन करणार अशी प्रतिज्ञा आपण कराल अशा आशयाचे प्रतिपादन केले.

या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. गजानन रेवतकर यांनी केले तर आभार प्रा. संतोष जाधव यांनी मानले यावेळी बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते

# सावित्रीबाई फुले तिच्या काळाच्या खूप पुढे होत्या : डॉ.रायलू



■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. ०४जानेवारी :**
युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, प्रादेशिक कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना आज त्यांच्या जयंतीनिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. नागपूरचे सुप्रसिद्ध वक्ते व कार्यकर्ते डॉ. युगल रायलू हे प्रमुख पाहुणे होते तर कार्यालयाच्या विभागीय प्रमुख श्रीमती सरबानी हलदर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. व्यासपीठावर वरिष्ठ कार्यालय विकास कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. युगल रायलू म्हणाले की, सावित्रीबाई फुले यांना आदरांजली वाहणे म्हणजे त्यांचे अनुकरण करणे होय. ती तिच्या वेळेपेक्षा खूप पुढे होती. जेव्हा स्त्रियांना शिक्षण नाकारले गेले तेव्हा मुलींसाठी शाळा उघडण्याचे धाडस त्यांनी केले. इतकेच नाही तर त्या काळात गरोदर विधवांच्या जीवाचे रक्षण करण्याचे धाडस तिच्यात होते. तिने जवळपास शतकापूर्वी 'भ्रूणहत्या विरोधी केंद्र' उघडले होते. डॉ. रायलू यांनी लोकांना विचारात आधुनिक आणि वैज्ञानिकदृष्ट्या जीवन आणि जगाकडे वळवण्याचे आवाहन केले. आपण सर्व मानवांना समान वागणूक देऊ या आणि आपल्या तरुण पिढीला मोठे होण्यासाठी चांगली परिस्थिती निर्माण करूया, असे ते म्हणाले. भारतीय राज्यघटनेतून भारतातील सर्व महिलांनी त्यांचे हक्क मिळवले आहेत, त्यासाठी संविधानाचे महत्त्व समजून घेऊया, असे त्यांनी शेवटी सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विकास कुलकर्णी, नंदनवार, प्रदीप अवचट यांचीही भाषणे झाली. कु. वैशाली यांनी अतिशय सुरेख पद्धतीने कार्यक्रमाचे संचालन केले.

# सावित्रीबाई यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
**हिंगणा ,दि. ०४जानेवारी :**
नगर परिषद वानाडोंगरी अंतर्गत सावित्रीबाई फुले यांचा जयंती निमित्ती टीप टोप कॉन्वेंट द्वारे स्वच्छता रेलीचे आयोजन करण्यात आले. नगर परिषद वानाडोंगरीचे मुख्याधिकारी भारत नंदनवार यांचा मार्गदर्शनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्वच्छता रेली कार्यक्रमा मुख्यध्यापिका सारिका ठाकरे, नगर परिषद वानाडोंगरी चे पाणी पुरवठा व सवच्छता अभियंता निलेश नंदनवार, लिपिक कपिल डाफे, स्वच्छ्ता निरीक्षक करण चव्हाण, स्वच्छ्ता निरीक्षक विनय व्यास, सिटी कॉर्डीनेटर आचल चव्हाण टीम फीडबक फाउंडेशनकडून ब्रिजेश कुमार सिंग, उजवला, सुबोध, वैभव यांनी सक्रीय भूमिका बजावली

# लुंबिनी बुद्ध विहार येथे क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

■ महासागर प्रतिनिधी
**कळमेश्वर,दि. ०४जानेवारी :**
कळमेश्वर येथील लुंबिनी बुद्ध विहारात. दिनांक ३ जानेवारी ला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती तालुका कळमेश्वर तर्फे क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली... कार्यक्रमा चे अध्यक्ष मा.राजेशभाऊ श्रीखंडे हे होते .तर अतिथी गायक अरुणभाऊ सहारे मा.युवराज मेश्राम मा.गौतम जांभुळकर.मा. इंद्रकुमार तागडे. मा.लक्षमणदादा गायकवाड हे होते. यांनी क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

या प्रसंगी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर अतिथींनी आप आपले विचार प्रभावीपणे मांडले. यात मा. गौतम जांभुळकर आपल्या वक्तव्यात म्हणाले कि सावित्रीबाई फुले यांनी मुलींची शाळा काढली नसती तर भारतात एकही महिला सन्मानाने जगली नसती.गायक अरुणभाऊ सहारे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन संघर्षावर सुंदर गीत सादर केले.

अंधश्रद्धा निर्मूलन समिती चे महासचिव मा.अरूण वाहणे यांनी उत्कृष्ट रित्या सुत्रसंचलन केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दिपक मेश्राम यांनी मानले .सौ.कल्पना मेश्राम सौ.रूपाली मेश्राम. मां.दशरथ मेश्राम.चि.राहुल मेश्राम मा.प्रदिप पटेल यांनी परिश्रम करून कार्यक्रम यशस्वी केला.




**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MOHAMMAD ZAPHAR SIDDIQUE.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMED ZAFAR SIDDIQUE.**
**ADD :** H.BO.3177,WALNI ROAD, JIVTODE LAYOUT, OPP.RAZA MASJID, CHANKAPUR, PO. SILLEWARA, DISTT. NAGPUR 441109 MS

MY OLD NAME WAS **ZAINUL HAQUE ABDUL HAQUE.** NOW MY NEW NAME IS **ZAINUL HAQUE ABDUL HAQUE.**
**ADD :** NEAR NAMAK KARKHANA GANJAKHETH NAGPUR 440018

**जाहीरनामा**

कोर्ट विद्यमान श्री भोजराज बडवाईक, कार्यकारी दंडाधिकारी, रामटेक यांचे न्यायालय

प्र. क्र. २६ / एम आर सी-८१/२०२४
मौजा पिंडकापार (सोनपूर) तालुका रामटेक

ज्याअर्थी अर्जदार खुशबु रमेश सलैया वय ३४ वर्ष रा. नहाबी पो. मुसेवाडी तालुका रामटेक जिल्हा नागपूर यांनी त्यांचे पती रमेश लक्ष्मण सलैया यांचा जन्म दिनांक ३०.०९.१९८२ रोजी राहते घरी मौजा नहाबी तालुका रामटेक येथे झाला परंतू त्यावेळेस अर्जदाराचे कुटुंबातील कोणत्याही व्यक्तींनी रमेश लक्ष्मण सलैया यांचे जन्मची नोंद संबधीत नगर परिषद / ग्राम पंचायत कार्यालय पिंडकापार (सोनपूर) येथे केली नाही. त्या बाबत ग्रामपंचायत/नगर परिषद पिंडकापार (सोनपूर) यांनी प्रमाणपत्र दिले आहे. करीता नामे रमेश लक्ष्मण सलैया यांचा जन्माची नोंद नगर परीषद/ग्रामपंचायत पिंडकापार (सोनपुर) ता. रामटेक येथे करण्याबाबत आदेश मिळण्याकरीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त रमेश लक्ष्मण सलैया वय ३४ रा. नहाबी पो. मुसेवाडी तालुका रामटेक जिल्हा नागपूर याचा जन्म दिनांक ३०.०९.१९८२ ही नोंद ग्रामपंचायत नहाबी तालुका रामटेक जिल्हा नागपूर येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक १५.१.२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १/१/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :- रामटेक
दिनांक : १/१/२०२५

(भोजराज बडवाईक)
कार्यकारी दंडाधिकारी,
रामटेक

**सायटेशन / पब्लिक जाहीर नोटीस**

कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील एम.जे.सी.क्र. १७/२०२४

पेशी दिनांक : २०.०१ २०२५
प्रोसेस क्रं : ६०/२०२५
दिनांक : ४/१/२०२५

अर्जदार : १) यादवराव वारलु निनावे, रा. रघुजीनगर तुकडोजी चौक, भगवान नगर, नागपूर
२) पार्वताबाई माधोराव निनावे, राह मच्छीसाथ, मौदा, तह मौदा, जि नागपूर
३) गिता यादवराव बारापात्रे, राह पो कोदामेंढी तह मौदा, जि. नागपूर
---- विरुध्द ----
गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : वारलु लहानु निनावे,

सदरहू अर्जदारानी कायदेशिर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट च्या कलम VIII १८२७ अन्वये या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. मयतदार वारलु लहानु निनावे, हे मौजा-मौदा, तह मौदा, जि नागपूर येथे वास्तव्यास होते. अर्जदारांनी मयतदार वारलु लहानु निनावे यांचा कायदेशिर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. वारलु लहानु निनावे यांचा मृत्यु दि. ०९.११.१९८० रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश क. स्तर मौदा, जि नागपूर यानी दिनांक २०.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या पब्लिक / जाहीर नोटीसव्दारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टीफिकेट (कायदेशिर वारसान प्रमाणपत्र) मंजूर करण्यात येईल, याची नोद घ्यावी.

आज दि. ०४-०१-२०२५ रोजी माझया सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशान्वये
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मौदा, जि. नागपूर

**सायटेशन / पब्लिक जाहीर नोटीस**

कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील एम.जे.सी.क्र. १९/२०२४

पेशी दिनांक : २०.०१ २०२५
प्रोसेस क्रं : ६४/२०२५
दिनांक : ४/१/२०२५

अर्जदार : १) यादवराव वारलु निनावे, रा. रघुजीनगर तुकडोजी चौक, भगवान नगर, नागपूर
२) पार्वताबाई माधोराव निनावे, राह मच्छीसाथ, मौदा, तह मौदा, जि नागपूर
३) गिता यादवराव बारापात्रे, राह पो कोदामेंढी तह मौदा, जि. नागपूर
---- विरुध्द ----
गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : गोदाबाई ढिवरू कुहीकर

सदरहू अर्जदारानी कायदेशिर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट च्या कलम VIII १८२७ अन्वये या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. मयतदार गोदाबाई ढिवरू कुहीकर ही मौजा-मौदा, तह मौदा, जि नागपूर येथे वास्तव्यास होती. अर्जदारांनी मयतदार गोदाबाई ढिवरू कुहीकर यांचा कायदेशिर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. गोदाबाई ढिवरू कुहीकर यांचा मृत्यु दि. ३०.१०.२००० रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश क. स्तर मौदा, जि नागपूर यानी दिनांक २०.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या पब्लिक / जाहीर नोटीसव्दारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टीफिकेट (कायदेशिर वारसान प्रमाणपत्र) मंजूर करण्यात येईल, याची नोद घ्यावी.

आज दि. ०४-०१-२०२५ रोजी माझया सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशान्वये
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मौदा, जि. नागपूर

**सायटेशन / पब्लिक जाहीर नोटीस**

कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील एम.जे.सी.क्र. १८/२०२४

पेशी दिनांक : २०.०१ २०२५
प्रोसेस क्रं : ६५/२०२५
दिनांक : ४/१/२०२५

अर्जदार : १) यादवराव वारलु निनावे, रा. रघुजीनगर तुकडोजी चौक, भगवान नगर, नागपूर
२) पार्वताबाई माधोराव निनावे, रा. मच्छीसाथ, मौदा, तह मौदा, जि नागपूर
३) गिता यादवराव बारापात्रे, राह पो कोदामेंढी तह मौदा, जि. नागपूर
---- विरुध्द ----
गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : नीलकंठ लहानू निनावे

सदरहू अर्जदारानी कायदेशिर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट च्या कलम VIII १८२७ अन्वये या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. मयतदार नीलकंठ लहानू निनावे ही मौजा-मौदा, तह मौदा, जि नागपूर येथे वास्तव्यास होती. अर्जदारांनी मयतदार नीलकंठ लहानू निनावे यांचा कायदेशिर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. नीलकंठ लहानू निनावे यांचा मृत्यु दि. ०१/१२/१९७८ रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश क. स्तर मौदा, जि नागपूर यानी दिनांक २०.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या पब्लिक / जाहीर नोटीसव्दारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टीफिकेट (कायदेशिर वारसान प्रमाणपत्र) मंजूर करण्यात येईल, याची नोद घ्यावी.

आज दि. ०४-०१-२०२५ रोजी माझया सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशान्वये
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मौदा, जि. नागपूर

**सायटेशन / पब्लिक जाहीर नोटीस**

कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील एम.जे.सी.क्र. १८/२०२४

पेशी दिनांक : २१.०१ २०२५
प्रोसेस क्रं : ६१/२०२५
दिनांक : ४/१/२०२५

अर्जदार : भाग्यश्री सुनिल मलवे, राह पो पिपळा, तह सावनेर, जि. नागपूर.
---- विरूध्द ----
गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : पुष्पलता चंद्रकांत रोडे

सदरहू अर्जदारानी कायदेशिर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट च्या कलम VIII १८२७ अन्वये या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. मयतदार पुष्पलता चंद्रकांत रोडे ही मौजा-मौदा, तह मौदा, जि नागपूर येथे वास्तव्यास होती. अर्जदारांनी मयतदार पुष्पलता चंद्रकांत रोडे यांचा कायदेशिर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. पुष्पलता चंद्रकांत रोडे यांचा मृत्यु दि. ३०/०५/२०२० रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश क. स्तर मौदा, जि नागपूर यानी दिनांक २१.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या पब्लिक / जाहीर नोटीसव्दारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टीफिकेट (कायदेशिर वारसान प्रमाणपत्र) मंजूर करण्यात येईल, याची नोद घ्यावी.

आज दि. ०४-०१-२०२५ रोजी माझया सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशान्वये
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मौदा, जि. नागपूर

**सायटेशन / पब्लिक जाहीर नोटीस**

कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील एम.जे.सी.क्र. १८/२०२४

पेशी दिनांक : २१.०१ २०२५
प्रोसेस क्रं : ६२/२०२५
दिनांक : ४/१/२०२५

अर्जदार : भाग्यश्री सुनिल मलवे, राह पो पिपळा, तह सावनेर, जि. नागपूर.
---- विरूध्द ----
गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : उमेश चंद्रकांत रोडे

सदरहू अर्जदारानी कायदेशिर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट च्या कलम VIII १८२७ अन्वये या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. मयतदार उमेश चंद्रकांत रोडे ही मौजा-मौदा, तह मौदा, जि नागपूर येथे वास्तव्यास होती. अर्जदारांनी मयतदार उमेश चंद्रकांत रोडे यांचा कायदेशिर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. उमेश चंद्रकांत रोडे यांचा मृत्यु दि. १७.०९.२०२४ रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश क. स्तर मौदा, जि नागपूर यानी दिनांक २१.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या पब्लिक / जाहीर नोटीसव्दारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टीफिकेट (कायदेशिर वारसान प्रमाणपत्र) मंजूर करण्यात येईल, याची नोद घ्यावी.

आज दि. ०४-०१-२०२५ रोजी माझया सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशान्वये
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मौदा, जि. नागपूर

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




# अनोखी नृत्यपरंपरा

छो ट्यांनो, तुम्हाला नाचायला आवडतं का? तुम्ही वाढदिवसाच्या पार्टीत किंवा गणपती उत्सवात थिरकत असाल. नृत्याचेही विविध प्रकार आहेत. भारतातले कथक, भरतनाट्यम, मोहिनीअट्टमसारखे शास्त्रीय नृत्यप्रकार जगभरात प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणे विविध देशांमध्ये अनोखी नृत्य सादर केली जातात. अशाच काही नृत्यप्रकारांवर नजर टाकू या.

✻

ब्राझील हा फुटबॉलप्रेमी देश. पण इथे नृत्यांचीही अनोखी परंपरा पहायला मिळते. 'कॅपोइरा' हा या देशातला भन्नाट नृत्यप्रकार आहे. नृत्य आणि मार्शल आर्ट यांच्या मिश्रणातून हा डान्स तयार झाला आहे. समूहात किंवा एकट्यानेही हे नृत्य करता येतं.



✻ स्पेनमध्ये 'फंडांगो' नावाचं नृत्य केलं जातं. या नृत्याचा उगम स्पेनमध्ये झाला असला तरी ते या देशाचा शेजारी पोर्तुगालमध्ये खूप लोकप्रिय झालं. या नृत्यप्रकारात वेगवान हालचाली कराव्या लागतात. पावलं जमिनीवर आपटत नाचावं लागतं.

✻ 'यांग्को' हा चीनमधला पारंपरिक नृत्यप्रकार आहे. या नृत्याला एक हजार वर्षांची परंपरा असून विशिष्ट तालात शारीरिक हालचाली कराव्या लागतात.

✻ 'कैबुकी' हा जपानमधला नृत्यप्रकार. यातल्या कलाकारांना विशिष्ट मेक अप केला जातो. या नृत्यात खास वेशभूषाही केली जाते.


रंजक

✻ कंबोडियात 'सेलिस्टिअल' हा नृत्यप्रकार खूप प्रसिद्ध आहे. यात नृत्याच्या माध्यमातून पौराणिक कथांचं सादरीकरण होतं. यातले कलाकार खूप आकर्षक वेशभूषा करतात.

# समुद्रकिनाऱ्यांनी नटलेला 'गांबिया'

सफर देशांची

'गांबिया' या उत्तर-पश्चिम आफ्रिकेतल्या देशाच्या सीमा सेनेगलशी जोडलेल्या आहेत. गांबिया हा आफ्रिका खंडातल्या सर्वात लहान देशांपैकी एक. या देशात फार कमी प्रमाणात धान्य पिकवलं जातं. शेंगदाणे हे इथलं महत्त्वाचं पीक. गांबिया हा शेंगदाण्याची निर्यात करणारा प्रमुख देश आहे. १९६५ मध्ये गांबिया स्वतंत्र झाला. या देशावर ब्रिटिशांचं राज्य होतं. 'बँजूल' ही या देशाची राजधानी. 'सेरेकुंदा' आणि 'ब्रिकामा' ही इथली प्रमुख शहरं. ब्रिटिशांनी राज्य केल्यामुळे इंग्रजी ही गांबियाची प्रमुख भाषा बनली. इतरही काही भाषा इथे बोलल्या जातात.




गांबिया हा खूप छोटा आणि अरुंद असा देश आहे. इथून वाहणारी 'गांबिया' ही नदी आफ्रिका खंडातली प्रमुख नदी आहे. या देशात छोटी बेटंही आहेत. सुंदर समुद्रकिनारे हे गांबियातलं खास आकर्षण. या देशाला ८० किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. इथले समुद्रकिनारे कमी गर्दीचे आणि स्वच्छ असतात. गांबियात येणारे पर्यटक या समुद्रकिनाऱ्यांना भेट दिल्याशिवाय जात नाहीत. गांबियामध्ये बरीच पर्यटन स्थळं आहेत. नैसर्गिक साधनसंपत्ती तसंच वन्यजीवांचं या देशात संरक्षण करण्यात आलं आहे. खास मगरींसाठी इथे स्वतंत्र तलावाची निर्मिती करण्यात आली आहे. या देशातल्या दोन ठिकाणांना युनेस्कोने जागतिक वारसा यादीत स्थान दिलं आहे.


# संधी रूरल मॅनेजमेंटमधल्या

कोण होणार?

आ पल्या देशात ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणावर आहे. मात्र तिथे म्हणावा तितका विकास झालेला नाही. त्यामुळे तुम्ही रूरल मॅनेजमेंट करून ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रयत्न करू शकता. सध्या रूरल मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम बराच चर्चेत आहे. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी सरकारही अनेक योजना राबवत असतं. गावांना मुख्य प्रवाहाशी जोडण्याचे प्रयत्न होत असतात. रूरल मॅनेजमेंट करून तुम्ही या कामात मदत करू शकता.

रूरल मॅनेजमेंट हे खूप मोठं क्षेत्र आहे. ग्रामीण भागाचा विविध पातळीवर विकास होत असतो. त्यामुळे रूरल प्लॅनिंग अँड डेव्हलपमेंट, नॅचरल रिसोर्स डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट, रूरल मार्केटिंग अँड मॅनेजमेंट, रूरल कम्युनिटिज फॅसिलिटी अँड सर्व्हिसेस, सोशल सिक्युरिटी अँड प्रॉब्लेम्स, पॉलिसीज अँड प्रोग्राम अशा रूरल मॅनेजमेंटच्या विविध शाखा आहेत. तुम्ही तुमच्या आवडीनुसार अभ्यासक्रमाची निवड करू शकता. बारावीनंतर रूरल मॅनेजमेंटमध्ये डिप्लोमा करता येईल. सहा महिने तसंच एक वर्षाचा हा अभ्यासक्रम असतो. या विषयात पदवीही मिळवता येईल. पुढे पीएचडी करण्याचीही संधी आहे.

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सेल्स अँड बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर, रूरल डेव्हलपमेंट ऑफिसर, बिझनेस डेव्हलपमेंट एक्झिक्युटिव्ह, सेल्स ऑफिसर अशा पदांवर काम करता येईल. विविध सरकारी संस्थांमध्ये तुम्हाला संधी मिळू शकते. ग्रामीण भागात काम करणाऱ्या सेवाभावी संस्थाही रूरल मॅनेजर्सच्या शोधात असतात.




# प्लास्टिक बाटलीचं बनवा फूल

करून तर पहा

घ राबाहेर पडल्यावर शुद्ध पाणी मिळणं अवघड असतं. अशा वेळी कुठलंही पाणी पिण्याचा धोका न पत्करता बाटलीबंद पाणी विकत घेतलं जातं. पण मित्रांनो, तुम्हाला माहीत आहे, प्लास्टिक बाटल्यांच्या या कचऱ्यामुळे पर्यावरणविषयक मोठ्या समस्या जन्म घेतात. म्हणूनच या बाटल्यांटाकून न देता त्यांचा वापर करायला हवा. चला तर, आज प्लास्टिकच्या बाटल्यांपासून छानशी कलाकृती कशी साकारायची ते पाहू.

**साहित्य :** प्लास्टिकची बाटली, गम, कात्री, माती किंवा वाळू, गोट्या किंवा गुळगुळीत दगड, स्ट्रॉ इत्यादी.

**कृती :** सर्वप्रथम बाटलीवरील लेबल आणि झाकणं काढा. पण ती टाकून देऊ नका. आता ती मधोमध कापा. अर्धा भाग ठेऊन द्या. बाटलीच्या वरच्या अर्ध्या भागावर एक इंच रुंदीच्या चिरा द्या. साधारण आठ पाकळ्या होतील अशा पद्धतीने बाटली कापा. या पाकळ्या बाहेरच्या बाजूने वाकवा. बाटलीचं झाकण लावा. आता या झाकणात आतल्या बाजूला पांढरा गम लावा. यात स्ट्रॉ अडकवा. बाटलीचं झाकण घट्ट बंद करा. त्यावर लेबल गुंडाळता येईल. यामुळे स्ट्रॉ स्थिर राहील. आता बाटलीचा उरलेला अर्धा भाग घ्या. त्यात माती किंवा वाळू भरा. साधारण दीड ते दोन इंचांपर्यंत वाळू भरा. आता स्ट्रॉचा खालचा भाग या वाळूत रुतवा. वर दगड किंवा गोट्या ठेवा. यामुळे स्ट्रॉ हलणार नाही. पाकळ्या सजवण्यासाठी रंगांचा किंवा गिफ्ट पेपरचा वापर करता येईल. कात्रीने कापून पाकळ्यांना गोल आकार देता येईल. कल्पनाशक्तीला वाव देऊन पाकळ्यांना वेगवेगळे आकारही देता येतील. या पाकळ्या मनपसंत रंगात रंगवता येतील.



दोस्त हे मस्त

## सर्वात छोटा सरडा

'ब्रुकेशिया मायक्रा' नावाचा एक सरडा आहे. अवघ्या ३० मिलीमीटर लांबीचा मायक्रा जगातला सर्वात लहान सरडा आहे. मादागास्कारमधल्या एका छोट्याशा बेटावर शास्त्रज्ञांना हा सरडा सापडला. या सरड्याचे नर आणि मादी फक्त ३० मिलीमीटरपर्यंत वाढतात. हे छोटेसे सरडे तुमच्या मुठीतही आरामात सामावतील.



दोस्त हे मस्त

## कोकनट क्रॅबविषयी...

दोस्तांनो, खेकड्याच्या वेगवेगळ्या प्रजाती आहेत. त्यापैकी एक म्हणजे कोकोनट क्रॅब. हा खेकडा पॅसिफिक बेटांवर आढळतो. त्याचं दिसणं आणि खाणं-पिणं यावरून त्याला कोकोनट क्रॅब म्हटलं जातं. कोकनट क्रॅबची त्वचा राखाडी आणि हिरव्या रंगाची असते. खोबरं खाण्यासाठी तो नारळाच्या झाडावर चढतो. हे खेकडे दिवसा झोपतात आणि रात्री जागतात.



लाईफस्टाईल

## यांनाही असते एक्सपायरी डेट

अन्नपदार्थ, औषधं, मेकअप प्रोडक्ट्स आदींची एक्सपायरी डेट असते. म्हणजे विशिष्ट काळानंतर ही उत्पादनं वापरायोग्य रहात नाहीत. पण नॅपकिन टॉवेलसारख्या वस्तू आपण वर्षानुवर्षं वापरतो. हे चुकीचं आहे. लक्षात ठेवा, टूथब्रश दर तीन महिन्यांनी बदलायचा असतो. कंगवा एक वर्षापेक्षा जास्त वापरायचा नसतो. टॉवेलमध्ये बॅक्टेरियांची वाढ होते. त्यामुळे तो वारंवार धुवायला हवा. शिवाय तो कितीही चांगला असला अथवा डिझाईन तुम्हाला कितीही आवडत असलं तरी दर तीन वर्षांनी टॉवेल बदलायला हवा. आरोग्यासाठी हे नियम पाळायलाच हवेत.



योगा टाईम

## अशी आहे ज्ञानमुद्रा

मुलांनो, एकाग्रता वाढवण्यासाठी तुम्ही ज्ञानमुद्रा करू शकता. यासाठी गुडघे दुमडून बसा. हाताचं पहिलं बोट आणि करंगळी जोडून 'ओ' सारखा आकार करा आणि डोळ्यांजवळ न्या. या गोलातून तुम्हाला बाहेर बघायचं आहे. ही मुद्रा नियमित केल्यामुळे अभ्यास करताना तुमचं मन एकाग्र होईल.



# वर्ष नवे संकल्प नवे

नवीन काही

का य मित्रांनो, नववर्षाची पार्टी कशी झाली? काय काय मजा केली या पार्टीत? नवीन वर्षाचे काही संकल्पही सोडले असतील. आपण दरवर्षी एखादे चांगले काम हाती घेण्याचं ठरवतो. पण काही दिवसांतच निग्रह गळून पडतात आणि आपण नेहमीच्या रुटीनमध्ये परततो. पण मित्रांनो, या वर्षीतरी असं वागायचं नाही. नवीन वर्षात पहिला संकल्प करु या तो व्यायामाचा. आपण शाळेत, क्लासमध्ये अभ्यास करतो, घरी असल्यावर टीव्ही बघतो, गेम्स खेळतो. पण या सगळ्यात व्यायाम करणं मात्र सोयीस्कर विसरतो. पण मित्रांनो, आरोग्य राखायचं असेल आणि शरीर बळकट बनवायचं असेल तर व्यायामाला पर्याय नाही. तेव्हा आपणही लवकर उठून जॉगिंगला जाऊ या, दोरीवरच्या उड्या मारू या, लोंबकाळण्याचा व्यायाम करु या, सूर्यनमस्कार घालू या आणि एखादा खेळही खेळू या. या सर्व गोष्टी आपल्याला शारीरिक स्वास्थ्य देतीलच त्याचबरोबर संयम शिकवतील आणि स्पर्धात्मक वातावरणात खंबीरपणे उभं राहण्यासाठी तयारही करतील. दुसरा संकल्प हवा डायरी लिहिण्याचा. आपण दुसऱ्यांशी बोलतो त्यापेक्षा जास्त स्वतःचीच गप्पा मारतो. अनेक विषयांवर सखोल विचार करतो. आपल्या मनात काही शंका येतात. हे सगळे विचार डायरीत लिहून ठेवा आणि संबंधित व्यक्तीचे मार्गदर्शन घेऊन उत्तरं शोधा. यामुळेही ज्ञानात भर पडेल. सगळ्यांशी गोड बोलण्याचा आणि चांगलं वागण्याचा निश्चयही महत्त्वाचा आहे बरं... यामुळे तुम्हाला बरेच मित्र मिळतील आणि त्यांची मदतही मिळेल.



## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) पृथ्वी सूर्याभोवती फिरते हा शोध सर्वात पहिल्यांदा लावणारा शास्त्रज्ञ कोण?
२) 'असोसिएटेड' प्रेस ही कोणत्या देशातली वृत्तसंस्था आहे?
३) 'नेताजी सुभाष नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ स्पोर्ट्स' कोणत्या शहरात आहे?
४) तिरुचिरापल्ली हे शहर कोणत्या नदीकिनारी आहे?
५) टायगर वूड्स कोणता खेळ खेळतो?
६) युनेस्कोची स्थापना कधी झाली?
७) भारताचं सर्वात जुनं निमलष्करी दल कोणतं?
८) शेक्सपिअरचा जन्म कोणत्या वर्षी झाला?
९) आसाममधला प्रसिद्ध नृत्यप्रकार कोणता?
१०) राजस्थानातलं 'झवार' कशासाठी प्रसिद्ध आहे?

उत्तरं : १) कोपर्निकस २) अमेरिका ३) पटियाला ४) कावेरी ५) गोल्फ ६) १९४५ ७) आसाम रायफल्स ८) १५६४ ९) बिहू १०) झिंकच्या खाणींसाठी





# निळकंठाची निळाई

वेचक वेधक

आ ज आपण माहिती घेऊ या एका सुंदर पक्ष्याची. याचं नाव आहे निलकंठ. याला ब्लु जे किंवा इंडियन रोलर या नावानंही ओळखतात. निळकंठ उडताना तर खूपच छान दिसतो. उडताना पंखांमधली निळाई याचं रुप शतपटीनं आकर्षक बनवते. निलकंठाचा आकार कबुतराएवढा असतो. निळे पंख असल्यानं आणि कंठावरही निळी झाक असल्यानं याचं नाव पडलंय निळकंठ. याच्या पाठीवर आणि मानेवर हलका भूरा रंग असतो तर पोट आणि शेपटीपाशी पिवळसर निळा रंग असतो. उडताना पंखांमध्ये लपलेल्या या सगळ्या छटा समोर येतात. हा पक्षी एकटं राहणं जास्त पसंत करतो. संपूर्ण भारतात त्यांचं वास्तव्य आढळतं. विशेषतः शहरं आणि गावांजवळच्या विरळ जंगलात हे पक्षी मोठ्या संख्येने आढळतात. या पक्ष्याचं अन्न म्हणजे मोठे किडे, पाली आणि बेडूक. शिकार दिसताच ते एकदम झडप घालतात आणि फांदीवर बसून एकदम झटक्यात गिळून टाकतात. कीटक हे मुख्य अन्न असल्यामुळे निलकंठ शेतकऱ्यांचा मित्र आहे. विविध प्रकारचे कीटक धान्याची नासधूस करतात हे आपण जाणतोच. ते दाणे फस्त करतात, पानं खातात. पण निलकंठासारखे पक्षी हे किडे खातात आणि त्यांची संख्या मर्यादीत राहून पिकांना संरक्षण मिळतं. मग काय मंडळी, आता बाहेर पडाल तेव्हा निलकंठ दिसतोय ते पहाणार का? तीव्र आवाजात कलकलाट करत उडणारा निळ्या पंखांचा निलकंठ मित्रांनाही अवश्य दाखवा.




ठिपके जुळवा




# करू या गणिताशी दोस्ती!

स्टडी टिप्स

मि त्रांनो, परीक्षा अजून लांब आहेत म्हणून अभ्यासाला सुट्टी दिली नाहीत ना? नाहीतर शाळेत अभ्यासाचा ताण नसला म्हणून तुम्हीही अभ्यासाला सुट्टी दिली असे व्हायचे. पण हा आळस नंतर महागात पडतो ना! परीक्षा जवळ आल्यावर एकच धांदल उडते आणि पुरेसा अभ्यास न झाल्यामुळे परीक्षेत कमी गुण मिळतात. हे टाळण्यासाठी आत्तापासूनच थोडी थोडी तयारी करू या. आम्हाला माहितीये, तुमच्यापैकी अनेकांना गणिताचा अभ्यास करायला अजिबात आवडत नाही. त्यातील आकडेमोड आणि गुंतागुंत डोक्याला मुंग्या आणते. पण हा अभ्यास वाटतो तेवढा अवघड नाहीच मुळी. तुम्ही योग्य त्या पद्धतीने गणिताचा अभ्यास केला तर आपोआप गणितं सुटत जातील आणि उत्तर मिळत जातील. यासाठी शिक्षक, मोठी भावंडं आणि मित्रांची मदत घ्या. तुम्हाला माहिती आहेच गणितातले सगळे टॉपिक्स आणि चॅप्टर्स एकमेकांशी संबंधित असतात. जर तुम्ही आधीचा धडा व्यवस्थित अभ्यासला नाही तर पुढचं काहीच कळणार नाही आणि गणिताप्रती अरुची वाढत जाईल. तेव्हा पहिली पायरी म्हणजे प्रत्येक धडा काळजीपूर्वक अभ्यासा. शाळेतल्या पुस्तकांव्यतिरिक्त सरावासाठी आणखी दोन-तीन पुस्तकांची मदत घ्या. गणित हा विषय लॉजिकवर अवलंबून आहे. इथे पाठांतराचा काही उपयोग नाही. पहिली स्टेप विसरली की पुढचं सगळंच गाडं गडगडणार. तेव्हा भरपूर गणितं सोडवा. सराव करताना आकडेमोड करण्यासाठी कॅल्क्युलेटर वापरू नका. त्याऐवजी वेगवान आकडेमोड करण्याच्या काही ट्रिक्स शिकून घ्या. अलिकडे या ट्रिक्स शिकवणारे क्लासेस सगळीकडे घेतले जातात. वैदिक मॅथ्समध्ये कितीही मोठ्या संख्यांचा गुणाकार, भागाकार, बेरीज, वजाबाकी झटपट करण्याच्या टिप्स आहेत. पाढे पाठ केलेत तरी तुमचं बरचसं काम हलकं होईल. यासाठी घरामध्ये तक्ते लावून ठेवा. तुमचा सतत वावर असेल अशा ठिकाणी हे तक्ते असतील अशी खात्री करा. सतत त्यावर नजर फिरवा. शक्य तेवढं लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करा. मग बघा तुमचे गणितातले गुण वाढतात की नाही!



## निवडणुकीनंतर लादले स्मार्ट वीज मीटर

# शासनाची घोषणा ठरली फसवी!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि.४ :

विधानसभा निवडणुकीपूर्वी शासनाने सामान्य ग्राहकांकडे स्मार्ट प्रीपेड वीज मीटर लावणार नसल्याची घोषणा केली होती. परंतु महावितरणतर्फे आता नादुरुस्त मीटरला बदलून तेथे स्मार्ट प्रीपेड मीटर बसवले जात आहेत. नवीन जोडणीही स्मार्ट मीटरनेच दिली जात आहे.

वीज देयक थकवणाऱ्या, वीज चोरी करणाऱ्यांवर नियंत्रणासाठी केंद्र सरकारने स्मार्ट प्रीपेड वीज मीटर योजना आणली. महाराष्ट्रातही महावितरणने या योजनेच्या अंमलबजावणीसाठी २७ हजार कोटींचे काम विविध कंपन्यांना दिले.

परंतु, राज्यभरातील ग्राहक संघटना, वीज कामगार संघटना, राजकीय पक्षांनी या विरोधात आंदोलन पुकारले. त्यामुळे तत्कालीन सरकारने स्मार्ट मीटर सामान्य ग्राहकांकडे लागणार नाही, अशी घोषणा विधानसभेत केली. परंतु, आता प्रधानमंत्री मोफत सूर्यघर योजनेच्या ग्राहकांकडेही हे मीटर लावणे सुरू झाले आहे. सोबतच नादुरुस्त मीटर बदलताना व नवीन जोडणी देतानाही हेच मीटर दिले जात आहेत.



**अदानीला मोठे कंत्राट**

पुणे व बारामती परिमंडळात ५२ लाख ४५ हजार ९१७ मीटर्स आणि भांडुप, कल्याण व कोकण परिमंडळात सात हजार ५९४ कोटी रुपये खर्चून ६३ लाख ४४ हजार ६६ मीटर्स लावण्याचे कंत्राट महावितरणने अदानी इलेक्ट्रिकलला दिले आहे.

नाशिक, जळगाव, लातूर, नांदेड व औरंगाबाद परिमंडळात ५६ लाख स्मार्ट मीटरचे काम नॅशनल कंस्ट्रक्शन कंपनी (एनसीसी) कंपनीला, चंद्रपूर, गोंदिया व नागपूर परिमंडळात ३० लाख मीटर बसवण्याचे काम मॉटेकार्लो कंपनीला तर अकोला व अमरावती परिमंडळात २१ लाख मीटर बसवण्याचे काम जीनस पॉवर कंपनीला देण्यात आले आहे.

१० ऑगस्ट २०२३ च्या आकडेवारीनुसार, राज्यात १० लाख ९७ हजार ४५६ मीटर नादुरुस्त होते. त्यापैकी सर्वाधिक ३ लाख ६४ हजार ११२ नादुरुस्त मीटर कोकण विभागात तर छत्रपती संभाजीनगर विभागात ३ लाख ५ हजार ७४२ मीटर, नागपूर विभागात २ लाख ६६ हजार ८६१, पुणे विभागात १ लाख ६० हजार ७१३ मीटर होते. प्रत्यक्षात ही संख्या २० लाखांच्या जवळपास असल्याचे समजते.

**जनतेची फसवणूक**

विधानसभा निवडणुकीपूर्वी विधानसभेत तत्कालीन ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामान्य ग्राहकांकडे स्मार्ट प्रीपेड मीटर लागणार नसल्याची घोषणा केली होती. त्यानंतरही राज्यात नादुरुस्त मीटर, नवीन जोडणी दरम्यान स्मार्ट प्रीपेड मीटर लावले जात आहेत. त्याला आमचा तीव्र विरोध आहे. या प्रश्नावर आंदोलन केले जाईल.
**कृष्णा भोयर, सरचिटणीस**
महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन.

## अवैध रेती व सुपारी तस्करांवर आमदाराने मारला छापा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

नागपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वाळू व सडक्या सुपारीची तस्करी होत असल्याचे वारंवार प्रादेशिक परिवहन विभाग (आरटीओ), पोलीसांसह अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारवाईतून पुढे येते.

दरम्यान सावनेरचे भाजप आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी शुक्रवारी रात्री नागपूर जिल्ह्यातील केळवद परिसरात वाळू व सुपारी तस्करांच्या गाड्यांवर छापा टाकला. त्यात आढळलेल्या गोष्टीतून धक्कादायक माहिती पुढे आली.

भाजपचे सावनेरचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांना मध्य प्रदेशातून सावळी मार्गाने सातत्याने वाळू, सडक्या सुपारी, तंबाखूसह इतरही अनेक प्रतिबंधित वस्तूंची अवैध वाहतूक सातत्याने होत असल्याची तक्रार मिळाली. त्यावरून डॉ. देशमुख यांनी काही कार्यकर्त्यांसोबत मिळून शुक्रवारी रात्रीला अचानक या मार्गावरील केळवद परिसरात संशयास्पदरित्या जाणारे ट्रक अडवले.

या वाहनांची झडती घेतली असता त्यात वाळू, सडक्या सुपारीसह इतरही अनेक संशयास्पद गोष्टी आढळल्या. तातडीने पोलीस, अन्न व औषध प्रशासन विभागाला याबाबत सूचित केले गेले. त्यानंतर या विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळ गाठून कारवाई केली.

डॉ. आशिष देशमुख म्हणाले, मध्यप्रदेशमधून सावळी मार्गाने अवैध वाहतूक सातत्याने सुरू आहे. रॉयल्टी वाचवणे, ओव्हरलोड ट्रक चालवणे, टोल वाचवणे अशी अवैधरित्या कामे या सगळ्या कृत्यातून होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रस्तेसुद्धा खड्डेयुक्त झाले आहे. या अवैध कृत्यामुळे येथे अपघात वाढून स्थानिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

या टोळ्यांचे कृत्य पुढे आणण्यासाठी हा छापा मारला. या टोळ्यांची सगळी माहिती पुढे आणावी म्हणून पोलिसांना सूचना केली आहे. ज्या पद्धतीने येथून सडक्या सुपारीची वाहतूक होत आहे. ती खाऊन सर्वसामान्य नागरिकांचेही जीव धोक्यात येत आहे. सोबत राज्यात तंबाखू, गुटखासह पानमसाला प्रतिबंधित आहे. या वस्तूंचीही या मार्गाने तस्करीचीही शंका आहे. त्यामुळे पोलिसांसोबतच अन्न व औषध प्रशासन विभागालाही या प्रकरणात सखोल चौकशी करण्याची सूचना केल्याचेही डॉ. देशमुख यांनी सांगितले. हे कृत्य पुढे चालू देणार नसल्याचेही त्यांनी सांगितले.



**आमदारच ट्रकवर चढले**
केळवद परिसरात अवैध वाळू व सुपारी तस्करी करणाऱ्या ओव्हरलोड ट्रकला शुक्रवारी रात्री अडवल्यावर ट्रकमधील साहित्याची पाहणी करण्यासाठी आमदार डॉ. आशिष देशमुख स्वतःच ट्रकवर चढले. त्यांनी एका पोत्याला हात लावून बघितले. परंतु अंदाज येत नव्हता. त्यानंतर त्यांनी पोत्याला थोडासा चिरा दिला. त्यानंतर पोत्यातून सडकी सुपारी बाहेर पडली. त्यानंतर येथील आमदारांसोबत असलेल्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

## जगातील सर्वात तरुण आयरन मॅन दक्ष खंते याचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि.४ :



खेळाडूंची शारीरिक तंदुरुस्ती व सहनशक्तीचा अंत पाहणाऱ्या जागतिक पातळीच्या आयरन मॅन स्पर्धेत 3.8 किलोमीटर पोहणे, 180 किलोमीटर सायकलिंग आणि 42 किलोमीटर धावणे असे आव्हान पूर्ण करावे लागते.

हे अग्निदिव्य पार पाडण्यासाठी प्रशिक्षक डॉ. अमित समर्थ यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या कठोर सरावामध्ये शारीरिक तंदुरुस्ती सोबतच मानसिक स्थिरता ढळू न देण्याचे मोठे मनोबल आत्मसात करावे लागले. असे प्रतिपादन आयरन मॅन स्पर्धा पूर्ण करणारा जगातील सर्वात तरुण म्हणून किताब प्राप्त केलेल्या 18 वर्षीय दक्ष खंते यांनी सत्काराला उत्तर देताना केले.

मित्र परिवार व प्रेस क्लब तसेच क्रीडा विभाग नागपूरच्या वतीने पश्चिम ऑस्ट्रेलियातील बसल्टन येथे नुकतीच पार पडलेली अत्यंत प्रतिष्ठेच्या विसाव्या जागतिक पूर्ण अंतराची आयरन मॅन ही शर्यत वयाच्या 18 व्या वर्षी पूर्ण करून जगातील सर्वात तरुण आयरन मॅन ठरलेल्या दक्ष खंतेचा शनिवारी गौरव करण्यात आला.

प्रेस क्लब नागपूर येथे झालेल्या कार्यक्रमात क्रीडा उपसंचालक शेखर पाटील यांनी त्याला स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित केले. यावेळी मंचावर माहिती व जनसंपर्क विभागाचे माध्यम समन्वयक अनिल गडेकर, दक्ष खंते, स्पोर्ट्स जर्नालिस्ट असोसिएशन ऑफ नागपूरचे प्रभारी अध्यक्ष अमित संपत यांच्यासह अमोल खंते व एकता खंते उपस्थित होते.

यावेळी दक्ष म्हणाला की ऑस्ट्रेलिया येथील समुद्रात सराव करताना सर्वात मोठे चॅलेंज हे तेथील लाटांना समोरी जाणे व तोंडात जाणारे मिठाचे पाणी हे होते. पण सहा महिने केलेल्या खडतर सरावाने स्विमिंग, सायकलिंग, रनिंग यातील येणारे अडथळे पार करणार याबाबत माझा आत्मविश्वास दुणावला होता. असे असे आयरन मॅन स्पर्धेचा प्रवास उलगडताना दक्ष म्हणाला.

ठराविक वेळेत पोहणे, सायकलींग आणि रनिंग करून निश्चित अंतर पार करण्यासाठी आयरन मॅन ही अतिशय अवघड शर्यत असून दक्ष खंतेने ती वयाच्या 18 व्या वर्षी पूर्ण करून आदर्श प्रस्थापित केला आहे. साहसी क्रीडा प्रकाराचा ब्रँड अँबेसिडर असलेला दक्ष युवकांसाठी प्रेरणादायी आहे अशा शब्दात क्रीडा उपसंचालक शेखर पाटील यांनी त्याचे कौतुक केले. आई-वडिलांचा साहसी क्रीडा प्रकाराचा वारसा दक्ष पुढे चालवत असल्याचे सांगत जीवनात यश प्राप्त करायचे असेल तर खेळाशिवाय पर्याय नाही.

पुढील दहा वर्षात स्पोर्ट्स इंडस्ट्री म्हणून ओळखली जाईल आणि 2036 चे ऑलिंपिक भारतात आयोजित केले जाईल असाही आशावाद त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन राम ठाकूर यांनी केले.

## सुदर्शन घुलेला मदत डॉक्टरला अटक

■ वृत्तसंस्था, बीड, दि. ४ :

बीडच्या सरपंच हत्याकांडातील प्रमुख आरोपी सुदर्शन घुले यांना आर्थिक मदत करणाऱ्या एका डॉक्टरला त्याच्या वकील पत्नीसह विशेष तपास पथकाने नांदेड येथून अटक केली आहे. या अटकसत्रामुळे संतोष देशमुख हत्याकांडाच्या तपासाला चांगलाच वेग आला आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात आता मोठ्या घडामोडी घडत आहेत. बीड पोलिसांनी पुण्यातून या प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुले याच्यासह सुधीर सांगळेला अटक केली. त्यानंतर आता एसआयटीने नांदेड येथून सुदर्शन घुले याला अटक करणाऱ्या एका डॉक्टरला त्याच्या वकील पत्नीसह अटक केली आहे. संभाजी वायबसे असे आरोपी डॉक्टरचे नाव आहे.

## उद्धव ठाकरे पुन्हा भाजप सोबत येणार?

**आ. आशिष देशमुखांचे संकेत, खा. राऊतांचा पलटवार**

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.४ :



उद्धव ठाकरे हे पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षासोबत येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भारतीय जनता पक्षाचे नेते आशिष देशमुख यांनी याविषयी संकेत दिले आहेत.

उद्धव ठाकरे परत येत असतील तर ते त्यांच्या मूळ भूमिकेत येत आहेत. यात नवल काहीही नसल्याचे आशिष देशमुख यांनी म्हटले आहे. तर ज्यांनी स्वतः चार पक्ष बदलले त्यांनी अशा विषयावर बोलू नये, अशा शब्दात संजय राऊत यांनी देशमुख यांना प्रत्युत्तर दिले आहे.

राजकारणामध्ये काहीही शक्य आहे. उद्धव ठाकरे हे तर परत आले तर नवल नाही, असे म्हणत भारतीय जनता पक्षाचे नेते आशिष देशमुख यांनी उद्धव ठाकरे यांची परत येण्याची शक्यता वर्तवली आहे. उद्धव ठाकरे हे काँग्रेस सोबत जात होते, त्यावेळी खऱ्या अर्थाने नवल वाटत होते. मात्र आता जर ते परत येत असतील तर त्यात नवल काही नाही. ते त्यांच्या मूळ भूमिकेत येत असल्याचे देशमुख यांनी म्हटले आहे.

ते परत आल्यास स्वागत आहे का? यावर मी काहीही बोलणे योग्य नाही. मात्र महाराष्ट्रामध्ये क्लायमेट चेंज होऊ शकतो. आता तर क्लायमेट चेंजवर नवीन खाते देखील महाराष्ट्र मध्ये असल्याचे आशिष देशमुख यांनी म्हटले आहे.



ज्यांचे संपूर्ण राजकारण पक्षांतर करण्यात गेले आहे. त्यांनी स्वतः चार पक्ष बदलले आहेत. त्यांनी या विषयी बोलू नये, असे म्हणत उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आशिष देशमुख यांना प्रत्युत्तर दिले आहे. ज्यांनी स्वतःच अनेक पक्ष बदलले आहेत. त्यामुळे त्यांनी अशा विषयात बोलले योग्य नसल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. या माध्यमातून राऊत यांनी ही शक्यता फेटाळून लावली आहे.

## आरोपींना पुण्यातूनच अटक कशी?

**सुळे आणि दानवेंचा सवाल**

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि.४ :

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात बीड पोलिसांनी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे या आरोपींना पुण्यातून अटक केली आहे. त्यांच्या अटकेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणीत सर्व आरोपींना पुण्यातूनच अटक कशी? असा सवाल उपस्थित केला आहे.

खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी उशिरा का होईन सापडले. पण या प्रकरणातील सर्व आरोपींना पुण्यातून अटक कशी होते. पोलिसांनी या संदर्भात एक अधिकृत स्टेटमेंट जारी करून माहिती द्यावी. कारण आता ही महाराष्ट्राचीच बातमी राहिली नसून या हत्येबद्दल दिल्लीमध्येही प्रचंड चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारनेही समोर येऊन पारदर्शक, खरे स्टेटमेंट द्यावे, अशी मागणी सुळेंनी माध्यमांशी बोलताना केली आहे.

**अंबादास दानवेंचे ट्विट चर्चेत**

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील दोन आरोपी सुदर्शन घुले व सुधीर सांगळे यांना पोलिसांनी पुण्यातून अटक केली. सुदर्शन या प्रकरणातील मुख्य आरोपी आहे. मात्र तब्बल 22-23 दिवस गुंगारा देत फिरणारे हे आरोपी घटनस्थळापासून केवळ 250 किमी अंतरावर पुण्यात सापडतात. यांना कोणी आश्रय दिला, सुरक्षा कोणी दिली? असा संतप्त सवाल अंबादास दानवे यांनी केला आहे.

## अल्पवयीन मुलाची दगडाने ठेचून हत्या

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ४ :

शहरातील बाबुपेठ परिसरात तन्मय जावेद शेख या १७ वर्षीय अल्पवयीन मुलाची दुचाकीला कट मारला या शुल्लक कारणावरून दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना शुक्रवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी शहर पोलिसांनी एका पोलीस शिपायाच्या मुलासह तीन आरोपींना अटक केली आहे, तर एक आरोपी अद्याप पसार आहे.

मृत तन्मय हा बाबुपेठ येथील रहिवासी होता. सूत्राच्या माहितीनुसार तन्मय शेख हा रात्री नऊ वाजताच्या सुमारास घराकडे जात होता. त्याच वेळी काही तरुण तिथूनच जात होते. रस्त्यात काहींच्या दुचाकी वाहनाला तन्मयच्या वाहनाचा कट लागल्याने चार अल्पवयीन मुलांनी तन्मयला कट का मारली म्हणून जबर मारहाण केली.

त्यानंतर त्याला बाबुपेठ रेल्वे फाटकजवळील रेल्वे पटरीजवळ नेण्यात आले. तिथेही त्याला मारहाण करण्यात आली. त्यानंतर दगडाने ठेचून त्याची अतिशय निर्घृणपणे हत्या करण्यात आली. आरोपीनी अत्यंत क्रूरतेने तन्मयची हत्या केली असून त्याचा चेहराही ओळखणे कठीण झाले आहे. शहर पोलिसांनी तातडीने कारवाई करीत आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणातील फरार आरोपीचा शोध सुरू आहे. एका पोलीस शिपायाचा मुलगाही या हत्या प्रकरणात आरोपी आहे. मागील काही दिवसांत जिल्ह्यात हत्यांचे सत्र वाढले आहे. सातत्याने हत्या होत असून देशी कट्टे, तलवारी व इतर शस्त्र मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने पोलिसांच्या कामगिरीवर प्रश्न निर्माण झाले आहे.

## भ्रष्टाचार उघड करणाऱ्या तरुण पत्रकाराची हत्या

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. ४ :



छत्तीसगडमधील बस्तर विभागातील बिजापूर येथील तरुण पत्रकार मुकेश चंद्राकरच्या निर्घृण हत्येने देशात खळबळ उडाली आहे.

बस्तर जंक्शन नावाने युट्युब चॅनेलच्या माध्यमातून नक्षल प्रभावित भागात पत्रकारिता करणाऱ्या मुकेशचे देशभर फॉलोवर्स होते. मुकेश दोन दिवसांपासून बेपत्ता होता. ३ जानेवारीला बिजापूर चट्टानपारा येथील एका कंत्राटदार काँग्रेस नेत्याच्या घरामागील सांडपाण्याच्या टाकीत त्याचा मृतदेह आढळून आला.

काही महिन्यांपूर्वी बस्तरमध्ये नक्षलवाद्यांनी एका जवानाचे अपहरण केले होते. त्यावेळी पत्रकारांच्या मध्यस्थीने जवानाची सुटका करण्यात आली. या पत्रकारांमध्ये मुकेश चंद्राकर हा तरुण पत्रकार अग्रणी होता. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेऊन पत्रकारितेकडे वळलेल्या मुकेशने अल्पावधीतच आपली एक वेगळी ओळख निर्माण केली होती.

त्याचे बस्तर जंक्शन हे यूट्यूब चॅनल देशभर बघितल्या जाते. बस्तरमधील नक्षलवाद आदिवासींच्या समस्या त्याने हिरिरीने जगापुढे आणल्या. परंतु रस्ता बांधकामातील भ्रष्टाचार उघड करणे त्याच्या जीवावर बेतले.

काही दिवसांपूर्वी त्याने बिजापूरच्या दुर्गम भागातील रस्ता बांधकामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याची बातमी केली होती. त्यानंतर रस्त्याच्या कंत्राटदार आणि मुकेशमध्ये वाद झाला होता. हा कंत्राटदार काँग्रेसचा नेता आहे.

१ जानेवारीला या कंत्राटदाराच्या भावाने मुकेशला घरून काही कामासाठी नेले होते. तेव्हापासून तो बेपत्ता होता. ३ जानेवारीला दुपारच्या सुमारास बिजापूर चट्टानपारा येथे सदर कंत्राटदाराच्या घरामागील सांडपाण्याच्या टाकीत हात पाय बांधलेल्या अवस्थेत मुकेशचा मृतदेह आढळून आला. यामुळे केवळ छत्तीसगडमध्येच नव्हे तर देशभर खळबळ उडाली आहे.

एका होतकरू तरुण पत्रकाराची अशाप्रकारे हत्या झाल्याने समाजमन सुन्न झाले आहे. या घटनेनंतर छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांनी ट्वीटसद्वारा मुकेशला श्रद्धांजली अर्पण करीत दोषींना तत्काळ अटक करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. तर आज बस्तरमध्ये या हत्येविरोधात बंद पाळण्यात आला.

## धनंजय मुंडेंनी उत्तर द्यावे : वडेट्टीवारांचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि.४ :



सरपंच संतोष देशमुख अपहरण आणि हत्या प्रकरणातील संशयित वाल्मीक कराड याच्या जीवाला धोका असल्याचा दावा केला जात आहे. त्याला त्याच्या जवळच्यांकडूनच धोका असल्याचे काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, कालच कराडने सांगितले की माझ्या जीवाला धोका आहे. पोलिस तुमचे, सरकार तुमचे आणि जेलही तुमचेच, मग कराडला धोका कोणापासून आहे? खरेच त्याच्या जीवाला धोका आहे का? आणि असेल तर कोणापासून आहे? याची माहिती घेतली पाहिजे, कराडच्या जीवाला धोका हा सत्ताधाऱ्यांकडून आणि जवळच्यांकडून वाटतो. एकदाच हे पाप धुतले जावे त्यामुळे त्याला संपवून मुळासकट पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न होऊ शकतो, असेही वडेट्टीवारांनी म्हटले आहे.

## कऱ्हांडला अभयारण्यात अडवला पर्यटकांनी वाघाचा रस्ता

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

उमरेड-कऱ्हांडला अभयारण्याला खरी ओळख मिळवून दिली ती जय या वाघाने. नागझिरा अभयारण्यातून नैसर्गिक स्थलांतर करुन आलेला हा वाघ नंतर कधी उमरेड-कऱ्हांडला अभयारण्याचा झाला ते कळलेच नाही.

कधी राष्ट्रीय महामार्गावर, कधी नद्या ओलांडण्याच्या जयला पाहण्यासाठी सामान्य पर्यटकांपासून तर सेलिब्रिटी अशी सर्वांचीच गर्दी असायची. मात्र, जय गेला आणि पर्यटकांनी या अभयारण्याकडे पाठ फिरवली.

त्यानंतर फेअरी ही वाघीण आणि तिच्या पाच बछड्यांनी पर्यटकांना आकर्षित केले. त्यानंतर पुन्हा पर्यटकांनी पाठ फिरवली. आता एफ-२ नावाची वाघीणसुद्धा तिच्या पाच बछड्यांसह पर्यटकांना आकर्षित करत आहे, पण पर्यटकांनी पर्यटनाच्या अतिरेक करत चक्क वाघाचाच रस्ता अडवण्याचा प्रकार या अभयारण्यात समोर आला आहे.

उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यातील गोठणगाव प्रवेशद्वाराजवळ एफ-२ वाघीण आणि तिचे पाच बछडे पर्यटकांच्या आकर्षणाचा विषय ठरले आहेत. उमरेड कऱ्हांडला अभयारण्यातील गोठणगाव प्रवेशद्वाराजवळ ते पर्यटकांना भुरळ घालत आहेत. त्यांचे छायाचित्र घेण्यासाठी जंगल सफारीवर असलेल्या पर्यटकांच्या जिप्सीने समोरून व मागून घेरले होते. याचा व्हिडिओ समाज माध्यमावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणात जिप्सीचे चार चालक व चार पर्यटक मार्गदर्शक यांना सात दिवसांसाठी निलंबित केले आहे. तर जिप्सी चालकांवर अडीच हजार व गाईडला ४५० रुपये प्रति व्यक्ती दंड लावण्यात आला आहे.

वाघांचा रस्ता अडविण्याचे प्रकार यापूर्वीही ताडोबा आणि अन्य काही अभयारण्यात घडले आहेत. तथापि, वन्यजीव विभागाने अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर निर्बंध लावले असून, कारवाई केली जात आहे.



# एकात्म अनुभवाचा मेळा

नोंद
मधुरा कुलकर्णी

**देशामध्ये चार ठिकाणी आलटून पालटून महाकुंभ मेळा होत असतो. त्याला धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्याही महत्त्व आहे. येत्या दहा दिवसांमध्ये प्रयागराज येथे महाकुंभ मेळा सुरू होणार आहे. महाकुंभात काही तरी अघटित घडवण्याचा दहशतवादी संघटनांचा प्रयत्न असून, तिथे जाऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकाला डोळ्यात तेल घालून आपल्याभोवती देशविघातक शक्ती वावरत नाही ना, हे पाहायला हवे.**

गंगा-यमुना आणि सरस्वतीच्या संगमावर तीर्थराज प्रयाग येथे आयोजित केलेला महाकुंभ हा पृथ्वीवरील कोणत्याही एका ठिकाणी होणारा मानवांचा सर्वात मोठा मेळावा आहे. महाकुंभ हे भारताच्या एकात्मतेचे, संघटन शक्तीचे, साहचर्य आणि सौहार्दाचे अनोखे उदाहरण आहे. या महान उत्सवात कडाक्याच्या थंडीत दुर्गम ठिकाणाहून लोक संगमावर कल्पवास घालवण्यासाठी, उत्सवात स्नान करण्यासाठी, अक्षय वटाचे दर्शन घेण्यासाठी आणि या निमित्ताने विशाल रूपात प्रकट झालेल्या 'भारतपुरुषाची' भेट घेण्यासाठी येतात. हा भरतपुरुष म्हणजे अमृतपुरुष. त्याचा धर्म सनातन आहे. त्याची संस्कृती सार्वत्रिक आहे. वसुधा हे त्याचे कुटुंब आहे आणि संपूर्ण जगाचे उत्थान ही त्याची प्रतिज्ञा आहे. महाकुंभ हे या अमृतपुरुष भारताचे अनोखे स्वरूप आहे. या उत्सवाची पार्श्वभूमी पाहिली, तर इतिहास-पुराणांची अनेक प्राचीन पाने आपल्यासमोर उलगडतात. देवासूर, कद्रू-विनता यांच्यातील युद्ध आणि भगवान धन्वंतरीने दिलेल्या अमृत-कुंभाची प्राप्ती यासंबंधी अनेक रंजक कथांचे अध्याय कुंभाच्या कथांमध्ये आहेत. खरे तर महाकुंभ ही व्यक्तीच्या एकुणात एकात्मतेच्या विलक्षण अनुभवाची प्रयोगशाळा आहे. आपल्या इतिहासाच्या जाणिवेची भुते काळाच्या पूर्वगणित जाणिवेतून वाहणाऱ्या त्रिवेणीतून मुक्त होतात. अगणित पिढ्यांच्या अखंड प्रवाहाची साक्ष देणारी गंगा, तिच्या अवर्णनीय कार्य-परंपरेची यमुना आणि अदृश्य पण अखंड सरस्वती, गोत्रकार ऋषीपासून आशादायक वंशजांपर्यंत गंगासमोर एखाद्याच्या अस्तित्वाचे किंवा नसण्याचे क्षुल्लक प्रमेय शून्य होते. पूर्वजांना प्रार्थना करून आणि त्यांच्या मुला आणि नातवंडांच्या कल्याणासाठी प्रार्थना करून, पिढ्या पूर्वजांपासून वंशजांपर्यंत त्यांची चिरंतन उपस्थिती पाहतात. पुत्रांच्या रूपात उपस्थित असलेले पिता, शिष्यांच्या रूपात उपस्थित असलेले गुरू आणि हजारो वर्षांचा महाकुंभ हे अनंतकाळचे अमर स्तोत्र आहे. गंगा-यमुना-सरस्वतीचा संगम असलेल्या तीर्थक्षेत्र प्रयागराजमध्ये दर १२ वर्षांनी हा महान उत्सव होत आहे. आपल्या धार्मिक-पौराणिक भूगोलाची पवित्र भूमी असण्याबरोबरच ती आपल्या आध्यात्मिक सांस्कृतिक-काळ-चेतनेचा चिरंतन पुरावाही आहे. आपल्या सर्वात जुन्या ऋषी परंपरेने प्रेरित असलेला भारत कुंभमध्ये आपण अखंड परंपरा पाहतो. प्रख्यात आचार्य, जगद्गुरू, महामंडलेश्वर आणि सर्व परंपरांचे संत-महंत येथे जमतात. पौराणिक महानता, अध्यात्मिक अनुभव, ऐतिहासिक वैभव, सांस्कृतिक दिव्यता आणि भौगोलिक भव्यता यासोबतच २०२५ च्या महाकुंभाला आणखी एक विशेष जोड मिळत आहे. हा योग भारताच्या स्वातंत्र्याचा अमर काळ आहे. अमृताचा लाभ घेण्याच्या संकल्पाशी समन्वित असलेला हा महाकुंभ उत्सव म्हणजे आपल्या राष्ट्रीय चेतनेला संपूर्णपणे भारत-पुरुष म्हणून ओळखण्याचा एक रत्नासारखा मेळ आहे. आपल्या महान राष्ट्राची अखंडता, सार्वभौमत्व, शौर्य आणि समृद्धी अधोरेखित करण्याची ही एक संधी आहे. अयोध्येच्या राम मंदिरात रामलल्लाची प्रतिष्ठापना झाल्यानंतरचा हा पहिला महाकुंभ आहे, म्हणून त्याला विशेष महत्त्व.



महाकुंभ हे आपल्या सांस्कृतिक अस्मितेचे जिवंत स्मारक आहे. त्रिवेणी नदीच्या काठावर जिथे महाकुंभ आयोजित केला जातो, त्याच त्रेतामध्ये धर्मविग्रह रामाने लोककल्याणासाठी आपल्या वनयात्रेची सुरुवात केली. तिच्या काठावर, प्रेममूर्ती भरत यांनी पुरुषार्थ चतुष्टयाचा त्याग केला आणि भक्तीची विनंती केली. प्रयाग हे आपल्या सांस्कृतिक अस्मितेचे चिरंतन स्थान आहे. या महाकुंभाकडे पाहताना देशाच्या देवत्वाचे आणखी काही परिमाणही आपल्या लक्षात येतात. भारताच्या केंद्रीय नेतृत्वाचे स्पष्ट प्राधान्यक्रम आणि त्यातून निर्माण होणारे जागतिक परिमाण सेवा, सुरक्षा, शिक्षण, औषधोपचार आणि सुसंवादाने परिपूर्ण भारताचे दर्शन घडवत आहेत. अयोध्या, मथुरा, काशी, हरिद्वार, केदारनाथ, विंध्याचल यासह भारतातील दिव्य तीर्थक्षेत्रे त्यांच्या आध्यात्मिक वैभवात पुनर्संचयित केली जात आहेत. महाकुंभ एकात्मिक दृष्टी, समन्वित प्रयत्न आणि पूर्ण सहकार्याचा पुरावा ठरेल. हा महाकुंभ केवळ धार्मिकदृष्टीनेच चर्चेत नाही, तर आर्थिक उलाढालीचे ही ते मोठे केंद्र आहे. प्रयागराजमध्ये १३ जानेवारीपासून सुरू होणारा महाकुंभ मेळा हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि परंपरांचे जिवंत प्रतीक आहे. ५६ दिवस चालणारा हा कार्यक्रम केवळ धार्मिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर आर्थिक आणि व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातूनही एक अद्वितीय उदाहरण आहे. महाकुंभच्या आयोजनासाठी राज्य सरकारने पाच हजार ४३५ कोटी ६८ लाख रुपयांचे मोठे बजेट ठेवले आहे. २०१९ मध्ये झालेल्या कुंभमेळ्याच्या ४,२०० कोटी रुपयांच्या बजेटपेक्षा हे खूप जास्त आहे. या कार्यक्रमासाठी सुमारे ७,५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या रकमेत केंद्र सरकारच्या योगदानाचाही समावेश आहे. केंद्राने या वेळी २,१०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. महाकुंभ कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, ४२१ प्रकल्पांवर काम सुरू आहे. त्यापैकी ३,४६१.९९ कोटी रुपयांच्या योजनांना यापूर्वीच मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये पायाभूत सुविधांचा विकास, वाहतूक व्यवस्था, सुरक्षा आणि स्वच्छतेपासून भाविकांसाठीच्या सुविधांच्या व्यवस्थापनापर्यंत प्रत्येक बाबींचा समावेश आहे. महाकुंभ आयोजित करण्यासाठीचे बजेट वेळेनुसार वाढले आहे. १८८२ मध्ये महाकुंभावर फक्त २० हजार २८८ रुपये खर्च झाले होते. आजच्या मूल्यानुसार ते अंदाजे ३.६५ कोटी रुपये आहे. त्या वेळी मौनी अमावस्येला सुमारे ८ लाख लोकांनी महाकुंभात स्नान केले होते, तर भारताची एकूण लोकसंख्या २२.५ कोटी होती. १८९४ च्या कुंभात भारताची लोकसंख्या २३ कोटी झाली आणि सुमारे १० लाख भाविकांनी स्नान केले. या कार्यक्रमासाठी ६९,४२७ रुपये (आजच्या काळात सुमारे १०.५ कोटी रुपये) खर्च करण्यात आले. १९०६ मध्ये, सुमारे २५ लाख लोकांनी महाकुंभाला हजेरी लावली आणि त्यावर ९०,००० रुपये (आजच्या काळात सुमारे १३.५ कोटी रुपये) खर्च झाले. १९१८ च्या महाकुंभात संगमात स्नान करणाऱ्या भाविकांची संख्या ३० लाखांवर गेली. या कार्यक्रमाचे बजेट १.३७ लाख रुपये (आजच्या तुलनेत अंदाजे १६.४४ कोटी रुपये) होते. काळानुरूप केवळ भाविकांची संख्याच वाढली नाही, तर कार्यक्रमाचे बजेट आणि व्यवस्थेची पातळीही वाढल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होते. हा सरकारी खर्च झाला. त्यापेक्षा सुमारे वीसपट उलाढाल होत असते.

प्रयागराजच्या महाकुंभाची तयारी अभूतपूर्व आहे. महाकुंभाचा परिसर पूर्वीपेक्षा अनेक पटींनी मोठा झाला आहे. भाविकांसाठी उत्तम स्वच्छता, सुरक्षित स्नान घाट, तात्पुरती राहण्याची व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, वाहतूक व्यवस्था करण्यात येत आहे. महाकुंभाला येणाऱ्या कोट्यवधी भाविकांसाठी संगमाजवळ आधुनिक सुविधांनी सुसज्ज टेंट सिटी उभारण्यात आली आहे. वीज, पाणी आणि स्वच्छता यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. याशिवाय ड्रोन आणि सीसीटीव्हीच्या माध्यमातून मेळ्यावर लक्ष ठेवले जात आहे. महाकुंभ हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून तो प्रादेशिक आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला मोठी चालना देतो. या कार्यक्रमामुळे पर्यटन, वाहतूक, खाद्य आणि पेय व्यवसाय, हॉटेल्स आणि लॉजिंग आणि स्थानिक हस्तकला उद्योगांना प्रचंड फायदा होतो. सरकारचा अंदाज आहे, की महाकुंभ २०२५ दरम्यान कोट्यवधी लोकांच्या हालचालीमुळे स्थानिक व्यवसाय आणि रोजगारात मोठी वाढ होईल. लहान दुकानदार, टॅक्सी आणि रिक्षाचालक, मार्गदर्शक आणि स्थानिक कारागीर यांच्यासाठी हा मेळा उत्पन्नाचा मोठा स्रोत आहे. एवढ्या मोठ्या कार्यक्रमासोबत आव्हाने येतात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर गर्दीचे व्यवस्थापन करणे, स्वच्छता आणि स्वच्छता राखणे, वीज आणि पाणी पुरवठा सुनिश्चित करणे आणि भाविकांची सुरक्षा या सर्वात मोठ्या प्राधान्यक्रम आहेत. २०२५ च्या कार्यक्रमात कोणत्याही भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी विशेष लक्ष देण्यात येत आहे. यासाठी शासन आणि प्रशासनाने शेकडो पथके तयार केली आहेत. कुंभकाळात आरोग्य सेवाही मोठ्या प्रमाणात बळकट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत करता येईल. महाकुंभमध्ये ६००० खाटा, १२५ रुग्णवाहिका आणि ७ नदी रुग्णवाहिका असलेल्या हाय-टेक आरोग्य सुविधा तयार आहेत. महाकुंभ हा केवळ आर्थिक आणि प्रशासकीय दृष्टिकोनातूनच महत्त्वाचा नाही, तर भारताच्या समृद्ध सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरांचेही प्रतिबिंब त्यात आहे. संगमावर स्नान करण्यासाठी भाविक लांबचा प्रवास करतात. ऋषी-मुनींचा मेळा असतो आणि योग, ध्यान, प्रवचन अशा कार्यक्रमांमुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय होते. महाकुंभाच्या उत्सवादरम्यान, अनेक प्रमुख संत, राजकारणी आणि देश-विदेशातील सेलिब्रिटी संगमात स्नान करतात. हा उत्सव केवळ धार्मिक दृष्टिकोनापुरता मर्यादित नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्टिकोनातूनही त्याला खूप महत्त्व आहे. महाकुंभ २०२५ हा केवळ धार्मिक मेळा नाही तर भारतीय संस्कृती, परंपरा आणि आधुनिकतेचा संगम असलेला उत्सव आहे. तो आयोजित करण्यात येणारा खर्च, विस्तृत मांडणी आणि त्याच्याशी निगडीत आर्थिक घडामोडी यामुळे हा एक विलक्षण कार्यक्रम बनतो. भारत आपला सांस्कृतिक वारसा कसा जिवंत ठेवतो आणि त्याला आधुनिकतेची जोड देऊन नव्या रूपात कसा सादर करतो, याचे जगाला औत्सुक्य आहे. हा महाकुंभ केवळ भाविकांनाच नाही तर जगाला संदेश देणारा आहे.

✦✦✦

# करमहसुलात समाधानकारक वृद्धी

दृष्टिकोन
हेमंत देसाई
ज्येष्ठ पत्रकार

**करमहसूल लक्षणीयरीत्या वाढणे ही स्वागतार्ह बाब आहे. अप्रत्यक्ष करांऐवजी प्रत्यक्ष करांमधून मिळणारा महसूल वाढणे, ही अधिक चांगली बाब आहे. अलिकडेच अग्रिम करसंकलन २१ टक्क्यांनी वाढून साडेसात लाख कोटी रुपयांवर गेले. महसूल विभागाची कार्यक्षमता वाढल्याचे हे लक्षण आहे. तसेच आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचाही फायदा होत आहे. मात्र सामान्यांना वाढत्या करबोज्यातून दिलासा देण्याचे धोरण हवे.**

देशाचे निव्वळ प्रत्यक्ष करांचे संकलन १७ डिसेंबर २०२४ पर्यंत वार्षिक तुलनेत १६ टक्क्यांनी वाढून जवळपास १६ लाख कोटी रुपयांवर गेल्याची माहिती केंद्रीय अर्थखात्याने दिली आहे. करमहसूल लक्षणीयरीत्या वाढणे, ही स्वागतार्ह बाबच आहे. अप्रत्यक्ष कर हे सामान्य लोकांना झळ पोहोचवणारे असतात. त्याऐवजी प्रत्यक्ष करांमधून मिळणारा महसूल वाढणे, ही अधिक चांगली बाब आहे. प्राप्तिकराच्या अग्रिम कराचा तिसरा हप्ता भरला गेल्याने, एकूण करमहसूल वाढला आहे. १५ डिसेंबरला या तिसऱ्या हप्त्याद्वारे अग्रिम करसंकलन २१ टक्क्यांनी वाढून साडेसात लाख कोटी रुपयांवर गेले आहे. यंदा वैयक्तिक प्राप्तिकराचे असे प्रमाण जवळपास आठ लाख कोटी रुपये तर कंपन्यांकडून साडेसात लाख कोटी रुपये भरले गेले आहेत. कंपनी करात यंदा ८.६ टक्के तर वैयक्तिक प्राप्तिकर संकलनात उत्तम, म्हणजे २२ टक्क्यांची वाढ झाली आह भांडवली बाजारातील रोखे उलाढाल कराच्या माध्यमातून ४० हजार कोटी रुपयांची भर पडली आहे, ज्यात वार्षिक तुलनेत ८५ टक्के अशी सणसणीत वृद्धी नोंदवण्यात आली आहे. या कालावधीत प्राप्तिकर विभागाने तीन लाख ३९ हजार कोटी रुपयांचा परतावा दिला असून, त्यात वार्षिक ४२ टक्क्यांची वाढ झाली आहे. कंपनी कर, वैयक्तिक प्राप्तिकर आणि एसटीटी यासह एकूण प्रत्यक्ष करसंकलन १९ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. ते १ एप्रिल २०२३ ते १७ डिसेंबर २०२३ या दरम्यान झालेल्या संकलनापेक्षा २० टक्क्यांनी वाढले आहे. महसूल विभागाची कार्यक्षमता वाढल्याचे हे लक्षण आहे. तसेच आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचाही फायदा होत आहे.

केंद्र सरकारने विद्यमान आर्थिक वर्षासाठी २२ लाख कोटी रुपयांचे प्रत्यक्ष कर संकलनाचे लक्ष्य निर्धारित केले आहे. आतापर्यंत संकलनात झालेली वाढ पाहता, निर्धारित लक्ष्य निश्चितच गाठले जाईल, असे केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष रवी अग्रवाल यांनी म्हटले आहे. त्यांच्या म्हणण्यात नक्कीच तथ्य आहे. गेल्या अर्थसंकल्पात करदात्यांना मोठा दिलासा देत, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी प्रमाणित वजावटीची मर्यादा ५० हजार वरून ७५ हजार रुपये केली होती. नवीन करप्रणाली अंतर्गत हा बदल करण्यात आला. त्यामुळे सरकारला सात हजार कोटी रुपयांचा महसूल गमवावा लागला असून, चार कोटी पगारदारांना त्याचा फायदा होत आहे, अशीही माहिती त्यांनी दिली होती. अर्थसंकल्पात टॅक्स स्लॅबमध्ये बदल करण्यात आले. १५ लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असल्यास ३० टक्के कर लागू केला गेला. नवीन करपद्धतीत पगारी कर्मचाऱ्यांची १७ हजार ५०० रुपयांपर्यंत वार्षिक बचत होत आहे. मागील अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांमधून केंद्र सरकारला सर्वाधिक, म्हणजे ६३ टक्के उत्पन्न मिळाले. याशिवाय २७ टक्के रक्कम कर्ज आणि इतर दायित्वामधून येणार होती. तर नऊ टक्के रक्कम निर्गुंतवणुकीसारख्या गैरमहसुलातून आले. केंद्राला अप्रत्यक्ष करांमध्ये वस्तू आणि सेवा कर, म्हणजे जीएसटीमधून १८ टक्के उत्पन्न मिळाले. याशिवाय उत्पादन शुल्कातून पाच टक्के व सीमा शुल्क आकारणीतून चार टक्के उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले होते. कॉर्पोरेट आणि वैयक्तिक आयकरासह प्रत्यक्ष करातून एकूण ३६ टक्के उत्पन्न मिळणार आहे. त्यामध्ये आयकरातून १९ टक्के तर कॉर्पोरेट करामधून १७ टक्के उत्पन्न येईल, असे मागच्या अर्थसंकल्पात नमूद करण्यात आले होते.




धर्मादाय संस्था, परदेशी जहाज कंपन्या यासाठी नवी कररचना प्रस्तावित केल्यानंतर, कॉर्पोरेट टॅक्स कर कमी करण्यात आला आहे. कारण सरकारला अधिक गुंतवणूक आहे हवी आहे, असा युक्तिवाद करण्यात आला. परदेशी कंपन्यांवरील कॉर्पोरेट कर ४० वरून ३५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला. परंतु एवढे असूनही परदेशी गुंतवणूकदारांनी सप्टेंबरअखेरपासून भारतीय समभागांमधून अंदाजे एक लाख २० हजार कोटी रुपये काढून घेतले आहेत. केवळ नोव्हेंबर २०२४ मध्येच त्यांनी २८ हजार कोटी रुपये मूल्यांच्या समभागांची विक्री केली आहे. परकीय गुंतवणूकदारांच्या निधीचे निर्गमन हे कशामुळे झाले? एक तर डोनाल्ड ट्रम्प यांचे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी पुनरागमन झाल्याने रुपयाच्या तुलनेत अमेरिकी डॉलर अधिकाधिक मजबूत होत आहे. ट्रम्प यांच्या 'अमेरिका प्रथम' धोरणाचा परदेशी गुंतवणूक आणि व्यापारावर नेमका काय परिणाम होऊ शकतो, याबद्दल अद्याप अनिश्चितता आहे. अमेरिकी रोखे ही जगातील सर्वात सुरक्षित गुंतवणूक मानली जाते. सध्या दहा वर्षे मुदतीच्या अमेरिकी रोख्यांवरील परताव्याचा दर पाच टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे भारतासारख्या उदयोन्मुख बाजारपेठेत परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी समभाग विक्रीचा मारा सुरू ठेवला आहे. या जोडीला चीनच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी तेथील सरकारच्या नवनवीन योजनांमुळे परदेशी गुंतवणूकदार हा भारतीय भांडवल बाजारच्या तुलनेत स्वस्त असलेल्या चिनी बाजाराकडे आकर्षित होत आहे. त्यामुळे आता शेअर बाजाराची आशा देशांतर्गत म्युच्युअल फंडांवरच अवलंबून आहे.

म्युच्युअल फंड संस्थांमधील व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता सप्टेंबर २०२४ अखेर ६७ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे तर एकूण इक्विटी म्युच्युअल फंडातील मालमत्ता ३१ लाख कोटी रुपयांवर गेली आहे. देशाचा करमहसूल वाढत आहे, ही चांगलीच गोष्ट आहे. परंतु तो वाढवण्यासाठी आणखीही काही उपाय आहेत. अधिकाधिक भांडवली खर्च करण्यासाठी उत्पन्न वाढणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे देशाचे उत्पादन क्षेत्र विस्तारण्यासाठी परदेशी भांडवल गुंतवणुकीची गरज आहे. केवळ शेअर बाजारातच नाही, तर थेट कारखान्यांमध्ये भांडवल गुंतवणूक वाढणे अत्यंत आवश्यक आहे. कर गोळा करणे हा देशांसाठी सार्वजनिक महसूल मिळवण्याचा मुख्य मार्ग आहे. त्यामुळे मानवी भांडवल, पायाभूत सुविधा आणि व्यवसायांसाठी सेवांच्या तरतुदींमध्ये गुंतवणुकीसाठी वित्तपुरवठा करणे शक्य होते. तरीही अनेक संकटांमुळे विकसनशील देशांच्या महसुलात घट झाली असून अलिकडच्या वर्षांमध्ये त्यांचा खर्च वाढला आहे. सध्या जीडीपीच्या १५ टक्क्यांपेक्षा कमी कर जमा करणाऱ्या देशांमध्ये महसूल संकलन वाढवण्याची गरज आहे. कर आकारणीचा हा स्तर राज्याला व्यवहार्य बनवण्यासाठी आणि विकासाच्या मार्गावर आणण्यासाठी एक महत्त्वाचा टिपिंग पॉइंट आहे. करप्रणाली न्याय्य आहे, याची खात्री करून सरकारांनी महसूल जमा करणे, शाश्वत वाढ आणि अनुपालन खर्च कमी करणे यासारख्या उद्दिष्टांमध्ये संतुलन राखणे आवश्यक आहे.

कर आणि करेतर उत्पन्न वाढवून सार्वजनिक खर्च भागवणे आवश्यकच असते. आर्थिक मंदी वा कोरोनासारखी संकटे असोत, त्या काळात सरकारी महसूल घटतो, म्हणूनच तर कोरोनाच्या काळात हे गुणोत्तर भारतात दहा टक्क्यांपर्यंत खाली आले होते. प्रगत देशांमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचे प्रमाण अनुक्रमे ६५ टक्के आणि ३५ टक्के असे असते, तर भारतात ते आहे, अनुक्रमे ४८ टक्के आणि ५२ टक्के. याचा अर्थ भारतात तुलनेने सधन आणि उच्च मध्यमवर्गीय गटावर कमी भार असून गोरगरीब आणि निम्न मध्यमवर्गीयांवर अधिक भार आहे. गरिबांवर कमी भार आणि श्रीमंतांवर जास्त भार, हेच आर्थिक न्यायाचे तत्त्व असते. आर्थिक विषमता कमी करून अर्थव्यवस्था समतेच्या दिशेने नेण्यासाठी प्रत्यक्ष कर वाढवणे आणि अप्रत्यक्ष कर कमी करणे, हा खरा उपाय आहे. भारतातील ८३ टक्के लोक हे असंघटित किंवा अनौपचारिक क्षेत्रात काम करतात. ते प्रत्यक्ष करांच्या कक्षेत येतच नाहीत. भारतात जेमतेम तीन टक्के लोक कर भरतात. भारताच्या एकूण उत्पन्नात खालच्या ५० टक्के लोकांचा वाटा फक्त १५ टक्के आहे. यावरून देशात आर्थिक विषमता किती टोकाची आहे, हे लक्षात येते. बेहिशेबी व्यवहार, हवाला, काळा पैसा अशा मार्गाने विशिष्ट वर्ग प्रचंड श्रीमंत होत आहे. उलट वाढत्या महागाईमुळे गरिबांचा खिसा रिता होत आहे. भारतात सरासरी २० मतदारांमागे एक मतदार कर भरणारा असतो. हे प्रमाण नक्कीच वाढू शकते.

कर दर वाढवून उत्पन्न वाढवण्यापेक्षा करप्रणालीत सुगमता आणणे, संगणकीकृत पद्धतींचा वापर वाढवणे आणि करदात्यांवर अधिक विश्वास टाकणे, आवश्यभक आहे; मात्र अजूनही लाचखोरी आणि भ्रष्टाचाराची कीड नष्ट झालेली नाही. त्यासाठी ठोस प्रयत्न करण्याची गरज आहे. पूर्वीच्या काळात सर्वसामान्य करदात्यांना कर अधिकाऱ्यांच्या सतावणुकीला सामोरे जावे लागत असे. तंत्रज्ञानामुळे हे प्रमाण कमी झाले असून स्वतःदेखील रिटर्न भरणे सोपे झाले आहे; मात्र प्रत्यक्ष कराच्या कक्षेत जास्तीत जास्त करदाते येतील, हे बघणे आवश्यक असून प्रत्यक्ष करमहसूल जेवढा वाढेल, तेवढा देशाच्या अर्थव्यवस्थेला त्याचा उपयोग होऊन, विकासासाठी तो पैसा खर्च करता येईल.

✦✦✦

# संकटात अमेरिका

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेला पुन्हा एकदा महान राष्ट्र बनवण्याचे जाहीर केले आहे. याचा अर्थ सध्या अमेरिका महान राष्ट्र नाही, असाही काढला जाऊ शकतो. अर्थात ट्रम्प वीस तारखेला शपथ घेऊन अध्यक्षपदी येतील, तेव्हा त्यांच्यापुढे काय वाढून ठेवले आहे, याची चुणूक मावळत्या वर्षाला निरोप देताना आणि नववर्षाचा जल्लोष साजरा करत असतानाच्या तीन घटनांतून दिसली आहे.**

परामर्श

अजय तिवारी



डोनाल्ड ट्रम्प येत्या काही दिवसांत पुन्हा एकदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनणार आहेत. आपल्या निवडणुकीच्या प्रचारांत त्यांनी देशाला पुन्हा महान बनवण्याचे आश्वासन दिले; पण देशाचे वाढते कर्ज यामध्ये सर्वात मोठा अडथळा आहे. २०२५ हे वर्ष अमेरिकन अर्थव्यवस्थेसाठी वाईट काळ घेऊन येऊ शकते. कारण जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था मंदीत जाण्याचा धोका आहे. वाढते कर्ज आणि बाजारातील असमतोलामुळे अमेरिकन अर्थव्यवस्थेत मंदी येण्याची शक्यता बळावली असून 'स्मॉलकेस' या एक अग्रगण्य गुंतवणूक धोरण मंचाने केलेला एक अभ्यास अमेरिकनांची झोप उडवणारा आहे. या संस्थेने अमेरिकच्या अर्थव्यवस्थेबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

'स्मॉलकेस'च्या अभ्यासानुसार, सतत वाढणारे कर्ज आणि बाजारातील असंतुलन यामुळे अमेरिकेची अर्थव्यवस्था मंदीच्या गर्तेत सापडू शकते. रोखे, बिटकॉइन्स, कर्ज गुंतवणूक आणि स्टॉक्समध्ये ज्या प्रकारची वाढ दिसून आली, ती कोरोनाच्या काळातील टाळेबंदीदरम्यान दिसलेल्या वेडेपणाचे प्रतिबिंब आहे. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला मंदीचा धोका असताना सोने आणि चांदीमधील गुंतवणूक सर्वात सुरक्षित गुंतवणूक म्हणून उदयास आली आहे. अमेरिकेच्या सरकारचे कर्ज ३६ ट्रिलियन डॉलर्सच्या पुढे गेले आहे. जगातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थेवर भारताच्या दहापट कर्ज आहे. कर्जावरील व्याजाची परतफेड करण्यासाठी खर्च होणारा पैसा देशाच्या संरक्षण आणि आरोग्य बजेटपेक्षा जास्त आहे. आता फक्त सामाजिक सुरक्षा बजेट व्याजाच्या रकमेपेक्षा जास्त असून हीच परिस्थिती कायम राहिल्यास पुढील तीन वर्षांत अमेरिकन



सरकारचे सर्वात मोठे दायित्व हे व्याज असेल. या अभ्यासानुसार, अनेक आर्थिक निर्देशकांनी अमेरिकेत मंदीच्या शक्यतेबद्दल चिंता व्यक्त केली आहे. २०१० नंतर प्रथमच क्रेडिट कार्ड पेमेंट विलंब चार टक्क्यांपेक्षा जास्त असेल. वाढत्या आर्थिक संकटाच्या दबावमुळे ग्राहकांचा खर्च कमी झाला आहे. हे संकेत आर्थिक चढउतार खूप जास्त असल्याचे निदर्शक आहेत. मंदीच्या काळात सोन्याच्या गुंतवणुकीने शंभर टक्के तर, चांदीच्या गुंतवणुकीने ३०० टक्के परतावा दिला आहे. १९७३-७५, १९९९-२००० आणि २००८-०९ तसेच कोविड काळातही सोने आणि चांदीने उत्कृष्ट परतावा दिला होता. गेल्या ३१६ दिवसांत अमेरिकेच्या कर्जात ६.३ अब्ज डॉलर्स म्हणजेच सुमारे ५३१ अब्ज ९४ कोटी ८५ लाख ७८ हजार ४९० रुपये दररोज वाढ झाली आहे. याचा अर्थ प्रत्येक अमेरिकन नागरिकावर एक ६लाख आठ हजार डॉलरचे कर्ज आहे. कोरोना सुरू झाल्यापासून अमेरिकेचे कर्ज सुमारे १६ ट्रिलियन डॉलरने वाढले आहे. अमेरिकेच्या इतिहासात सरकारला इतके कर्ज घ्यावे लागण्याची ही पहिलीच वेळ आहे.

गेल्या २४ वर्षांत अमेरिकेचे कर्ज सहा पटीने वाढले आहे. २००० मध्ये अमेरिकेवर ५.७ ट्रिलियन डॉलर्सचे कर्ज होते. २०१० मध्ये ते १२.३ ट्रिलियन डॉलर आणि २०२० मध्ये २३.२ ट्रिलियन डॉलर होते. अमेरिकन काँग्रेसच्या बजेट दस्तावेजानुसार, पुढील दशकापर्यंत देशाचे कर्ज ५४ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. देशाचे कर्ज जीडीपीच्या १२५ टक्के आहे. अमेरिकेला दररोज १.८ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त व्याज भरावे लागत आहे. सरकारचे उत्पन्न घटत असून खर्च वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. कर्ज धोकादायक पातळीवर पोहोचले आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने ही चांगली बाब नाही. अमेरिकेचे कर्ज व जीडीपी गुणोत्तर पुढील काही वर्षांत २०० टक्क्यांपर्यंत पोहोचू शकते. म्हणजे देशाचे कर्ज अर्थव्यवस्थेच्या दुप्पट होईल. असे झाले तर कर्ज फ डताच अमेरिकेची अर्थव्यवस्था कोलमडून पडेल. यामुळे सरकारला संशोधन आणि विकास, पायाभूत सुविधा आणि शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चापेक्षा व्याज भरण्यासाठी जास्त पैसा खर्च करावा लागणार आहे. देशाची अर्थव्यवस्था सुस्थितीत असताना अमेरिकेचे कर्ज वाढत आहे, ही चिंतेची बाब आहे. सामान्यतः, जेव्हा अर्थव्यवस्था कमकुवत होते, तेव्हा सरकार विकासाला चालना देण्यासाठी खर्च वाढवते. वाढत्या कर्जामुळे देशात पुन्हा एकदा नोटाबंदीची परिस्थिती निर्माण होऊ शकते. कर्जाबाबत रिपब्लिकन आणि डेमोक्रॅट या दोन्ही पक्षांमध्ये अनेकदा वाद होतात; पण वस्तुस्थिती अशी आहे, की दोन्ही पक्षांच्या कार्यकाळात देशाचे कर्ज वाढले आहे. त्याचा परिणाम देशाच्या पतमानांकनावरही दिसू लागला आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये 'फिच'ने अमेरिकेच्या सार्वभौम कर्जाचे रेटिंग एए+ वरून एए केले होते. 'मूडीज'ने तर अमेरिकेला एएए कमी करण्याचा इशारा दिला होता. गेल्या वर्षी जूनमध्ये अमेरिका पहिल्यांदाच डिफॉल्टच्या उंबरठ्यावर पोहोचली होती आणि ही परिस्थिती पुन्हा एकदा निर्माण होत आहे. अमेरिकेत वाढत्या खर्चाला आळा घालण्यासाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये मोठी कपात होऊ शकते. ट्रम्प यांनी सरकारी खर्चात कपात करण्यासाठी आणि सरकारी कार्यक्षमता वाढवण्यासाठी सरकारी कार्यक्षमता विभाग हा नवीन विभाग तयार करण्याची घोषणा केली आहे. त्याची कमान जगातील सर्वात श्रीमंत एलॉन मस्क आणि विवेक रामास्वामी यांना देण्यात आली आहे. ट्रम्प यांचा प्रचार करताना मस्क यांनी सरकारच्या बजेटमधील अब्जावधी डॉलर्स वाचवू शकतात, असे म्हटले होते. त्यांनी सरकारी खर्चात कपात करण्याची भाषा केली आहे. यामध्ये सार्वजनिक प्रसारण आणि गर्भपात हक्क गटांना दिलेले पैसे समाविष्ट आहेत.

एकीकडे ही स्थिती असताना अमेरिकेत दहशतवाद पुन्हा डोके वर काढतो, की काय असे नववर्षाच्या आनंदोत्सवातील घटनेवरून वाटायला लागले आहे. एक भरधाव ट्रक गर्दीत घुसवून अनेकाना चिरडण्यात आले. त्यात दहा जणांचा मृत्यू झाला असून, ३० हून अधिक जण जखमी झाले आहेत. ही घटना मध्यरात्री सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास बोर्बन स्ट्रीट आणि इबरविले स्क्वेअर येथे घडली. हे कॉम्प्लेक्स नाईट लाईफसाठी प्रसिद्ध आहे. ट्रकचालकाने गर्दीवर गोळीबार केला. न्यू ऑर्लिन्स पोलिसांनी संशयितावर गोळीबार केला. स्थानिक पोलिस अधिकारी अपघात आणि गोळीबाराच्या घटनेचा तपास करत आहेत. सध्या तिथे आपत्कालीन सेवा दल तैनात आहे. पोलिसांकडून महत्त्वाचे पुरावे गोळा केले जात आहेत. संशयित आरोपींबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. अपघात आणि गोळीबारानंतर परिसरातील सुरक्षा वाढवण्यात आलेली आहे. अमेरिकन गुप्तचर संस्थेच्या नाकावर टिचून हा प्रकार झाला असून, दहशतवाद्यांनी तो केला असण्याची शक्यता आहे.

तिसरी घटनाही अशीच चिंता वाटायला लावणारी आहे. चीनच्या हॅकर्सनी अमेरिकेची सायबर सुरक्षा भेदली आहे. ट्रेझरी विभागाच्या संगणक सुरक्षेचा या महिन्यात भंग झाला. अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाने ही मोठी घटना असल्याचे सांगत चीनी हॅकर्सनी डॉक्युमेंट्सची चोरी केली असल्याचे म्हटले आहे. अमेरिकेतील खासदारांना पाठवलेल्या एका पत्रानुसार, हा सुरक्षेचा भंग एका थर्ड पार्टी सायबर सुरक्षा सेवा देणाऱ्या 'बियॉन्ड ट्रस्ट'च्या माध्यमातून झाला आहे. हॅकर्स 'बियॉन्ड ट्रस्ट'द्वारे वापरण्यात येत असलेल्या एक महत्वपूर्ण सुरक्षेपर्यंत पोहोचले. तिथे त्यांना अवर्गीकृत दस्तावेजांचा ॲक्सेस मिळाला. या पत्रानुसार, हॅकर्सनी ट्रेझरी डिपार्टमेंटल ऑफिसेस (डीओएस) यूजर्संच्या तांत्रिक साहाय्य प्रदान करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या क्लाउड आधारित सेवेमध्ये प्रवेश करण्यासाठी वेंडरद्वारे वापरल्या जाणाऱ्या कीमध्ये प्रवेश मिळवला. या कीमध्ये प्रवेश केल्याने हॅकर्सला सेवेची सुरक्षा ओव्हरराइड करता आली. त्यांनी काही ट्रेझरी डिओ यूजर्संच्या वर्कस्टेशन्समध्ये दूरस्थपणे प्रवेश केला आणि काही अवर्गीकृत दस्तावेजांचा ॲक्सेस मिळवला. 'यूएस सायबर सिक्युरटी अँड इन्फ्रास्ट्रक्टर सिक्युरटी एजन्सी'



आणि 'एफबीआय' च्या सहकार्याने हॅकच्या परिणामांचे मूल्यांकन करत आहेत. जॉर्जियाच्या जॉन्स क्रीक येथील असलेल्या 'बियॉन्ड ट्रस्ट'च्या प्रवक्त्याच्या म्हणण्यानुसार, कंपनीला डिसेंबर २०२४ च्या सुरुवातीस एक सुरक्षेशी संबंधित घटना निदर्शनास आली होती. त्यावर उपाययोजना करण्यात आली. त्यात 'रिमोट सपोर्ट प्रॉडक्ट'चा समावेश आहे. 'बियॉन्ड ट्रस्ट'ने मर्यादित संख्येने सहभागी असलेल्या ग्राहकांना सूचित केले. ट्रेझरी अधिकाऱ्यांनी हॅकिंगच्या घटनेबाबत अधिक तपशील दिलेला नाही. वॉशिंग्टनमधील चीनच्या दूतावासाच्या प्रवक्त्याने मात्र हॅकिंगचा दावा फेटाळून लावला असला, तरी पूर्वानुभव लक्षात घेता चीन काय करू शकतो, याची झलक त्याने ट्रम्प यांना सत्तेवर येण्याअगोदर दाखवली आहे.

✦✦✦

**माजी पंतप्रधान, ख्यातकीर्त अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन ही भारताची फार मोठी हानी करुन गेलेली दुर्दैवी घटना म्हणावी लागेल. स्वातंत्र्योत्तर भारतामधील आर्थिक व्यवस्थापनातील एक सर्वांगीण आणि परिपक्व अर्थप्रशासक असणारे हे एक महनीय व्यक्तिमत्त्व होते. अर्थकारणाशी संबंधित महत्त्वपूर्ण असणारी सगळी धोरणात्मक पदे त्यांनी भूषवली होती. देश त्यांचे नेहमीच स्मरण करेल.**

# देशाने महत्त्वाचा मोहरा गमावला!

विशेष

अभय टिळक

अर्थतज्ज्ञ



डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन हा आपल्याला बसलेला फार मोठा धक्का आहे. त्यांची प्रदीर्घ कारकीर्द देशाला एका आश्वासक वळणावर घेऊन गेली, असे आपण खात्रीपूर्वक म्हणू शकतो. त्यांच्या कारकीर्दीचे दोन टप्पे केले तर पी.व्ही. नरसिंह राव यांच्या काळातील त्यांची कारकीर्द आणि भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांनी केलेले काम यात बरीच महत्त्वपूर्व वैशिष्ट्ये बघायला मिळतील. मात्र मला जाणवणारे महत्त्वपूर्ण वैशिष्ट सांगायचे तर सिंग हे स्वातंत्र्योत्तर भारतामधील आर्थिक व्यवस्थापनातील एक सर्वांगीण आणि परिपक्व अर्थप्रशासक होते. इथे आपण हेदेखील लक्षात घ्यायला हवे की त्यांनी अर्थकारणाशी संबंधित महत्त्वपूर्ण असणारी सगळी धोरणात्मक पदे भूषवली होती. पण आधी वाणिज्य मंत्रालयामध्ये (मिनिस्ट्री ऑफ कॉमर्स) आर्थिक सल्लागार होते. त्यानंतर पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, केंद्रीय अर्थसचीव, त्यानंतर केंद्रीय नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, अर्थमंत्री, युनायटेड नेशन्सच्या ट्रेडमध्ये भारताचे प्रतिनिधी, साऊथ कमिशनचे सेक्रेटरी अशी नानाविध पदे भूषवणाऱ्या मनमोहन सिंग यांची कारकीर्द मात्र अध्यापनापासून सुरू झाली होती. खरे तर हीच एक दुर्मीळ बाब आहे. कारण अध्यापनाचे काम करणाऱ्यांची विचार करण्याची पद्धत थोडी वेगळी असते. असे असतानाही सिंग यांनी अर्थप्रशासक म्हणूनही सगळी पदे भूषवून सर्वोत्तम कामगिरी करावी हे विलक्षण आहे. अर्थातच या सगळ्यामुळे त्यांच्याकडे प्रचंड अनुभव होता. आता तो खचितच कोणाकडे बघायला मिळेल. या अनुभवानेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला प्रगल्भ आणि सर्वांगीण विचारांची चौकट दिली होती ज्याचा लाभ संपूर्ण देशाला झाला.

इथे पी.रंगराजन रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर असल्याचा काळ स्मरतो. पूर्वी राज्यांची तूट वाढली की ते रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घ्यायचे. मात्र याला काहीतरी मर्यादा असणे आवश्यक होते. हे लक्षात घेत उत्तम अर्थप्रशासक असणाऱ्या डॉ. मनमोहन सिंग आणि रंगराजन या दोघांनी एक महत्त्वपूर्ण सुधारणा केली. त्यानुसार उत्पन्नाच्या विशिष्ट टक्केवारीइतकीच उचल राज्यांना घेता येण्याची तरतूद करण्यात आले जे पुढे धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरले कारण यामुळे आपोआपच राज्यसरकारांच्या वित्तीय व्यवस्थापनाला शिस्त लागली. खर्च करताना हात सैल सोडायचा आणि रिझर्व्ह बँकेकडून हवे तेवढे कर्ज घेऊन नंतर खड्डे भरत राहण्याची चुकीची पद्धत यामुळे बंद झाली.

डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवल्या गेल्या. त्यातील पहिली महत्त्वपूर्ण अशी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना होती. त्यानंतरचा अन्न सुरक्षा कायदाही अत्यंत महत्त्वाचा होता आणि जवाहरलाल अर्बन रिन्युअल मिशनचेही वेगळे वैशिष्ट्य होते. या सगळ्या योजनांच्या माध्यमातून प्रथमच केंद्राच्या पातळीवर शहरी आणि ग्रामीण भारताचा संतुलित विचार झालेला दिसला. डॉ.मनमोहन सिंग राजकारणाच्या क्षेत्रात वावरले. मात्र हेदेखील लक्षात घ्यायला हवे की, अर्थकारणावर नेहमीच राजकीय गणितांची मात होत असते. असे असूनही डॉ. सिंग मनाविरुद्ध झालेल्या प्रत्येक निर्णयांचे वा आर्थिक धोरणांचे दूरगामी परिणाम आपल्या अत्यंत सौम्य पण स्पष्ट शब्दांमध्ये, पटेल अशा पद्धतीने मांडत राहिले. त्यांचे हे कामही महत्त्वपूर्ण म्हणावे लागेल कारण यासदेखील वेगळ्या प्रकारचे धैर्य लागते. जसे की, आपण केवळ ग्रामीण भारतातील दारिद्र्य रेषेखालील लोकांनाच अन्नसुरक्षा कायदा लागू करु, असे ते शेवटपर्यंत सांगत होते. मात्र त्यावेळी डाव्या पक्षांच्या आधारावर सरकार उभे असल्यामुळे सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या नॅशनल ॲडव्हायझरी कौन्सिलमध्ये हा कायदा रेटला गेला आणि ग्रामीण भारताबरोबरच शहरी भागही योजनेत समाविष्ट करुन घेतला गेला. मात्र ही बाब आपल्याला फार काळ तारणार नाही आणि अर्थकारणावर याचे गंभीर परिणाम काही काळातच दिसून येतील, हे सिंग यांचे मत काही काळातच सिद्ध झाले. त्यांचे असे अनेकांचा विरोध पत्करुन आपले मत मांडत राहणे, मला महत्त्वाचे वाटते. याद्वारे त्यांनी अर्थशास्त्र आणि त्यातील मूल्यांशी बांधिलकी राखण्याचे काम केलेच खेरीज आपले विचार न घाबरता राजकीय व्यासपीठांवर व्यक्त करण्याचे कामही केले. त्यामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हे वैशिष्ट्यही महत्त्वाचे म्हणावे लागेल.

पी.व्ही. नरसिंह राव यांचे सरकार आले तेव्हा अर्थमंत्री कोणाला नेमायचे हा प्रश्न होता कारण देश वित्तीय अडचणीत सापडला होता. त्यावेळी अनेकांनी या पदी अर्थशास्त्रातील तज्ज्ञ माणसाची नेमणूक करण्याचा सल्ला दिला. थोडक्यात ही राजकीय नियुक्ती होऊ नये, असे अनेकांचे मत होते. प्रश्न बिकट बनण्याचे एक कारण असेही होते की, तेव्हा आपल्याकडे केवळ तीन आठवड्यांची आयात भागवता येईल एवढेच परकीय चलन उपलब्ध होते. तातडीने पावले उचलणे गरजेचे होते. त्यातही परकीय चलनासाठी कर्ज घेणे आणि पूर्वी जागतिक बँकेसारख्या वित्तसंस्थांकडून घेतलेल्या कर्जांची थकबाकी न होऊ देणे आत्यंतिक गरजेचे होते. कारण कर्जाच्या परतफेडीचा हफ्ता दिला नसता तर आपल्यावर थकबाकीदार असल्याचा शिक्का लागला असता. त्यामुळेच सरकारची प्राथमिकता जागतिक बँकेकडून पटकन कर्ज घेण्यास होती. यामार्गाने परदेशी धनकोंचा हफ्ता भरायचा आणि थकबाकीदाराची नामुष्की टाळायची हाच विचार होता. पण यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी वा जागतिक बँक अशा जागतिक वित्तसंस्थांमध्ये प्रतिमा चांगली असणाऱ्या, वैश्विक पातळीवर आदर असणाऱ्या अर्थतज्ज्ञाची गरज होती. अशी चर्चा सुरू होताच पुढे आलेले पहिले नाव आय.जी.पटेल यांचे होते. त्यावेळी ते लंडन 'स्कूल ऑफ इकोनॉमिक्स'मध्ये अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. मात्र यासंबंधीचा प्रस्ताव दिल्यानंतर त्यांनी आपली असमर्थता दाखवली. त्यानंतर डॉ. मनमोहन सिंग यांचे नाव पुढे आले. थोडक्यात त्यांची नियुक्ती होण्यामागे उत्तम अर्थतज्ज्ञ, अर्थप्रशासकीय पातळीवरील सगळी महत्त्वाची पदे भूषवल्याचा अनुभव आणि देशी अर्थकारणाची अत्यंत बारकाईने असणारी जाण हे मुद्दे महत्त्वाचे होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांमध्ये त्यांच्या नावाला प्रतिष्ठा होती. त्यांच्यातील या सगळ्या गुणवैशिष्ट्यांचा देशाला उपयोग झाला आणि मोठ्या आर्थिक संकटातून आपण बाहेर येऊ शकलो. डॉ. मनमोहन सिंग यांच्याविषयी बोलण्यासारखे असे अनेक मुद्दे आहेत. अपूर्व योगदानासाठी देश नेहमीच त्यांचा ऋणी राहील. विनम्र आदरांजली.

✦✦✦

# भारताचे भाग्यविधाते...

– डॉ. अशोक चौसाळकर

डॉ. मनमोहन सिंग हे खऱ्या अर्थाने भारताचे भाग्य विधाते होते कारण त्यांनी सुरू केलेल्या आर्थिक सुधारणांमुळे देशात फार मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून आले. आज भारतीय अर्थव्यवस्था जगातील चौथी अर्थव्यवस्था म्हणून मान्यताप्राप्त झालेली आहे. पंतप्रधान म्हणून त्यांनी सुरू केलेल्या 'मनरेगा' आणि अन्न सुरक्षा योजना या देशातील गरिबी हटवण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाच्या योजना होत्या. त्यांनी केलेला अन्न सुरक्षा करार एक मैलाचा दगड म्हणावा लागेल. राजकारणात चांगला मनुष्य आल्यानंतर किती सकारात्मक बदल होऊ शकतात, याचे डॉ. सिंग हे उत्तम उदाहरण होते. त्यानंतरच्या काळामध्ये भ्रष्ट राजकारणामुळे त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. पण तरीही गेल्या ३०-३५ वर्षांच्या इतिहासामध्ये ते भारतातील सर्वात नेते होते, ही गोष्ट आपल्याला अमान्य करता येणार नाही कारण त्यांनी कोट्यवधी भारतीयांच्या जीवनात बदल घडवून आणला. मनमोहन सिंग यांनी प्रथम अर्थमंत्री म्हणून आणि नंतर पंतप्रधान म्हणून वेगाने आर्थिक सुधारणा घडवून आणल्या. त्यांच्या विरोधकांनाही या सुधारणा पुढे राबवाव्या लागल्या. स्वत: लोकप्रिय पुढारी नसतानाही भारतीय राजकारणाचे स्वरुप योग्यरित्या समजून घेऊन यशस्वीपणे हाताळणी करण्यामध्ये त्यांना चांगले यश मिळाले. काँग्रेसच्या अंतर्गत राजकारणामुळे आणि काही नेत्यांनी विचारसरणीचा मुद्दा पुढे आणल्यामुळे सिंग यांच्यापुढे अनेक अडचणी आल्या. म्हणूनच अभिप्रेत असणाऱ्या सगळ्या सुधारणा ते राबवू शकले नाहीत. पण सिंग यांनी भारतीय लोकशाहीच्या परंपरा समृद्ध केल्या, स्वायत्त संस्थांच्या स्वातंत्र्याची बूज राखली आणि संघर्षात्मक राजकारण असतानाही संसदेची प्रतिष्ठादेखील ढळू दिली नाही. हे त्यांचे मोठे यश होते.

✦✦✦

# डॉक्टर होते म्हणून...



मनमोहन सिंग नावाच्या तज्ज्ञ डॉक्टराने रुग्णशय्येवर निपचित पडलेल्या अर्थव्यवस्थेचे अचूक निदान केले अन् योग्य वेळी नेमके उपचार दिले, म्हणून ती खडखडीत बरी झाली. आज तिची सुधारलेली तब्येत पाहताना जसा आनंद होतो, तसा हे डॉक्टर नसते तर काय झाले असते? या विचाराने मनात काहूरही उठते. विसाव्या शतकाच्या अखेरीस रसातळाला जाऊ लागलेल्या या देशाला एकविसाव्या शतकासाठी नवी उभारी देण्यात त्यांनी दिलेले योगदान इतिहास विसरणार नाही.

------------

डॉ. नरेंद्र जाधव

डॉ. मनमोहन सिंग हे राजकारणात येण्याच्या पूर्वी, किंबहुना ते राजकारणापासून दहा हात दूर होते, तेव्हापासून माझा त्यांच्याशी संपर्क होता. ते रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर होते आणि मी स्वतः ३१ वर्षे रिझर्व्ह बँकेमध्ये काम केले आहे. तिथे त्यांची जी कारकीर्द होती, ती निश्चितच चांगली होती, मात्र उत्तुंग अशी नव्हती. डॉ. मनमोहन सिंग ख?्या अर्थाने सर्वपरिचित झाले, त्यांना अर्थतज्ज्ञ म्हणून थोरवी लाभली, ती ते अर्थमंत्री झाल्यावर!

**दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर...**

आपल्या देशावर १९९१ मध्ये एक अभूतपूर्व आरिष्ट आले होते. देशाची वित्तीय तूट वाढत जाऊन राष्ट्रीय उत्पन्नाच्या साडेसहा टक्क्यांपर्यंत पोहोचली होती. ती साडेतीन ते चार टक्के असावी असा संकेत आहे. एकीकडे सरकारी खर्चामध्ये बेसुमार वाढ आणि दुसरीकडे कर आकारणीत वाढ न होण्यामुळे ही तूट खूप वाढली होती.

आता अशी कल्पनाही करता येत नाही, पण महागाईचा दर १७-१८ टक्क्यांवर पोहोचला होता. परिणामी परकीय चलनाची गंगाजळी आटत आटत जाऊन केवळ एक अब्ज डॉलर इतकीच उरली होती. आता देशाकडे असलेल्या परकीय चलनाची गंगाजळी जास्त आहे, कमी आहे की नेमकी आवश्यक तेवढीच आहे, हे ओळखण्याचा निकष काय? तर त्यावेळी हा निकष असा होता की, किमान चार महिन्यांच्या आयातीसाठी पुरेल इतका परकीय चलनाचा साठा आपल्याकडे असला पाहिजे.

१९९१ मध्ये इतकी बिकट परिस्थिती निर्माण झाली होती की, फक्त पंधरा दिवसांच्या आयातीला पुरेल इतकाच परकीय चलनाचा मर्यादित साठा आपल्याकडे उरला होता. त्यामुळे देश दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर जाऊन पोहोचला होता.

त्या आधीचे आपल्या अर्थव्यवस्थेचे ट्रॅक रेकॉर्ड अतिशय उत्तम होते. देशावरील सगळी कर्ज आपण वेळेवर फेडत आलो होतो. कर्ज काही प्रमाणात वाढले होते, पण त्याची परतफेड नियमितपणे होत होती. पण, १९९१ च्या मे महिन्यात अशी दारुण परिस्थिती उद्भवली की, आपल्याकडे तेलाच्या आयातीलाही पैसे राहिले नव्हते आणि तेलाची आयात थांबली असती, तर काय झाले असते?

सगळे उद्योग-धंदे बंद पडले असते. म्हणजे अगदी फूटवेअरपासून ते कॉम्प्युटरच्या हार्डवेअर- सॉफ्टवेअरपर्यंत सगळ्या गोष्टींचे उत्पादन थांबले असते. अशा या अत्यंत बिकट परिस्थितीमध्ये निर्णायक स्वरुपाचे आर्थिक धोरण अत्यंत आवश्यक होते. स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात भारतीय अर्थव्यवस्था एवढी विकलांग कधीच झाली नव्हती. जगातील कोणताही देश आपल्याला मदत करायला तयार नव्हता. भारताचे नाव जगाच्या आर्थिक इतिहासातून पुसले जाईल की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी आपल्याला ४७ टन सोने गहाण ठेऊन पैसे उभे करावे लागले.

**धोरणे बदलली, स्थिती पालटली**

अशा या विदारक पार्श्वभूमीवर देशात नवे सरकार आले. त्यामध्ये डॉ. मनमोहन सिंग यांच्याकडे अर्थमंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली आणि इथूनच त्यांच्या कारकिर्दीला खऱ्या अर्थाने झळाळी आली.

त्यांनी अर्थव्यवस्थेची धुरा समर्थपणे पेलली आणि देशाच्या एकूणच अर्थकारणाला नवी दिशा दिली. त्यांनी जे धोरण स्वीकारले, त्याला ह्यखासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणह्ल (खाउजा) असे संबोधले जाते. देशातील उद्योजक - व्यावसायिक नियमांच्या बंधनात बांधले गेले होते.

भारतीय अर्थव्यवस्थेला लायसन्स आणि परमिट राज म्हटले जात होते. प्रत्येक गोष्टीसाठी कुठले तरी लायसन्स घ्यावे लागायचे, सरकारच्या कुठल्या तरी यंत्रणेचा त्रास सहन करावा लागायचा. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अत्यंत वाईट स्थितीत सापडली होती.

डॉ. मनमोहन सिंगांनी त्यांच्या पहिल्याच अर्थसंकल्पातून मोठा धक्का दिला आणि अशा सगळ्या बंधनांमधून देशातील उद्योजकांची सुटका केली. त्यामुळे भारतीय उद्योजकांची उद्यमशीलता झपाट्याने वाढत गेली. त्यातूनच अर्थव्यवस्था तर सावरलीच; पण पुढच्या प्रगतीची मजबूत पायाभरणीही झाली.

१९५१ ते १९९१ या चाळीस वर्षांत आपल्या देशाच्या आर्थिक विकासाचा दर केवळ ३.५ टक्के, तर लोकसंख्या वाढीचा दर २.२ टक्के होता. म्हणजे आपले दरडोई उत्पन्न वर्षाला फक्त १.३ टक्के इतक्या अत्यंत धीम्या गतीने वाढत होते. देशाच्या आर्थिक विकासाची गती हीच राहिली असती, तर आपले दरडोई उत्पन्न दुप्पट व्हायला जवळपास ५८ वर्षे लागली असती.

डॉ. मनमोहन सिंगांनी हे चित्र बदलले. त्यांनी जी धोरणे स्वीकारली त्यामुळे आर्थिक विकास वेगाने सुरू झाला. १९९२ ते २००२ या काळात विकासाचा दर सरासरी ६ टक्क्यांवर जाऊन पोहोचला. त्यानंतर २००२ ते २००५ मध्ये तो ८ टक्क्यांवर गेला. पुढे २००८ मध्ये तो तब्बल ९.५ टक्क्यांवर पोहोचला.

**वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि**

अत्यवस्थ स्थितीत गेलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेचे हे खऱ्या अर्थाने पुनरुज्जीवन होते. फुलासारख्या मृदू व्यक्तिमत्वाच्या डॉ. मनमोहन सिंगांनी ज्या वज्रासारख्या कणखरपणे नवी धोरणे राबवली, त्यामुळेच तिला ही संजीवनी लाभली. त्यामुळे नव्वदच्या दशकात आणि त्यानंतरच्या काळात देशाच्या जो आर्थिक विकास होत गेला, त्याचा पाया भक्कम करण्याचे श्रेय डॉ. सिंग यांच्याकडेच जाते.

आज आपण जी प्रगती अनुभवतो आहे, तिची बीजे त्यांनी १९९१ च्या विपरित परिस्थितीत रुजवली होती, हे कुणीही नाकारु शकत नाही. एका अर्थाने आधुनिक भारतीय अर्थव्यवस्थेची पायाभरणी करण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य डॉ. सिंग यांनी केले.

**ऋषितुल्य व्यक्तित्व, कमालीची ऋजुता**

डॉ. सिंग पुढे पंतप्रधान झाले. या सगळ्या कालखंडामध्ये माझा व्यक्तिगत रुपात त्यांच्याशी अत्यंत निकटचा संबंध होता. मी त्यांचा जणू मानसपुत्रच होतो. २००५ मध्ये त्यांनी माज्या सात पुस्तकांचे प्रकाशन पंतप्रधान निवासस्थानात आयोजित केले. तो सोहळा आणि पुढेही त्यांच्याकडून लाभलेला स्नेह हा माझ्यासह आमच्या कुटुंबीयांसाठी ह्यमर्मबंधातली ठेव आहे.

स्वतः पंतप्रधान हे पदसिद्ध अध्यक्ष असलेल्या नियोजन आयोगावर सदस्य म्हणून २००९ मध्ये त्यांनी माझी निवड केली. त्याचदरम्यान, श्रीमती सोनिया गांधी या अध्यक्ष असलेल्या राष्ट्रीय सल्लागार परिषदेवरही माझी नेमणूक करण्यात आली. त्यामुळे या दोन्ही नेत्यांसोबत एकाच वेळी काम करण्याची संधी मला मिळाली.

नियोजन आयोगाचा सदस्य म्हणून डॉ. सिंग यांनी माज्याकडे अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवल्या होत्या. त्यामुळे त्यांच्याशी माझा नियमित संपर्क यायचा. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे, नेतृत्वाचे, प्रशासकीय कौशल्याचे आणि दूरदृष्टीचे अनेक पैलू मला जवळून अनुभवता आले. यातून मला खूप शिकता आले, माझे ज्ञान नव्याने उजळत गेले.

या सगळ्या ३५ वर्षांच्या प्रवासात मला उमगलेले डॉ. मनमोहन सिंग हे एक अत्यंत ऋषितुल्य असे व्यक्ती होते. ते अतिशय साधे, निगर्वी आणि विनम्र होते. आणि त्यांची ही विनम्रता खरी होती.

बऱ्याच लोकांकडे खोटी विनम्रता असते, तशी ती त्यांच्याकडे नव्हती. एका सच्चा देशभक्ताची नम्रता त्यांच्या ठायी होती. विशेष म्हणजे, आपल्यावर टीका झाली, तरी ती शांतपणे ऐकत असत, त्यातून काही सुधारणा करता येईल का, याकडे लक्ष देत असत.

टीका करणाऱ्यांवरतीच टीका करायची, हे त्यांचे कधीच तंत्र नव्हते. त्यांचा मोठेपणा म्हणजे, एवढे सगळे काम करुनही त्यांची वृत्ती मात्र अत्यंत विनयी, सात्विक अशी होती. एवढ्या सर्वोच्च पदावर पोहोचलेल्या व्यक्तीकडे इतकी कमालीची ऋजुता असू शकते, याची अनुभूती त्यांच्या सहवासाचा लाभ झालेल्या माझ्यासारख्यांना नक्कीच येत असे.

डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने एका द्रष्टा अर्थनीतिकार आणि निष्ठावान देशभक्त काळाच्या पडद्याआड गेला आहे. या तज्ज्ञ डॉक्टराने रुग्णशय्येवर निपचित पडलेल्या आपल्या अर्थव्यवस्थेचे अचूक निदान केले अन् योग्य वेळी नेमके उपचार दिले, म्हणून ती खडखडीत बरी झाली.

आज तिची सुधारलेली तब्येत पाहताना जसा आनंद होतो, तसा हे डॉक्टर नसते तर काय झाले असते? या विचाराने मनात काहूरही उठते. त्यामुळे विसाव्या शतकाच्या अखेरीस रसातळाला जाऊ लागलेल्या या देशाला एकविसाव्या शतकासाठी नवी उभारी देण्यात डॉ. मनमोहन सिंग यांनी दिलेले योगदान येणाऱ्या शतकांचा इतिहासही विसरणार नाही. त्यांना भावपूर्ण आदरांजली..!

■ ■ ■

# पैसे न घेता मतदान हाच लोकशाहीचा नवा धर्म!



भारतीय निवडणुकांमध्ये मतदान विकणे हा प्रकार कधी सुरू झाला, हे नेमकेपणे कोणालाच सांगता येणार नाही. पण, अलीकडच्या काळात मत विकत घेण्याचा उच्चांक आणि लोकशाहीच्या अवमूल्यनाचा नीचांक होऊ लागला आहे. लोकप्रतिनिधी मतदान करतात त्या विधानपरिषद आणि राज्यसभा निवडणुकीत थेट पैसे देण्याचे प्रारूप अवलंबले जात असल्याचे पूर्वी म्हणजे किमान तीन दशकांपासून ऐकण्यात यायचे. त्यातूनच घोडेबाजार हा शब्दप्रयोग जन्माला आला.

डॉ. अमोल अन्नदाते

पण, आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतच नव्हे, तर लोकसभा, विधानसभा निवडणुकीतही मतांसाठी पैसे दिले - घेतले जाणे, हे एव्हाना ओपन सिक्रेट म्हणून रुढ झाले आहे.

अलीकडे झालेल्या निवडणुकीतील तीन ते चार प्रातिनिधिक अनुभव मती गुंग करणारे आणि कुठल्याही विवेकनिष्ठ नागरिकाला काळजी वाटावी असे आहेत.

एका मतदारसंघातील विश्लेषण करत एक मतदार सांगत होता... उमेदवार खूप चांगले होते, निवडून यायला हवे होते; पण त्यांचे पैसे शेवटच्या दिवशी पोहोचलेच नाहीत. दुसऱ्या प्रसंगात, एक पत्रकार मित्र मतदानासाठी गेला आणि तिथे मदतीसाठी बसलेल्या एका उमेदवाराच्या प्रतिनिधीने मतदानाची स्लीप देऊन झाल्यावर खुलेपणाने पैसे देऊ केले. मित्राने ते नाकारल्यावर कार्यकर्त्याने आश्चर्याने विचारले की, तुम्ही पैसे न घेता मतदान करणार?

तिसऱ्या प्रसंगात निवडणूक व्यवस्थापनात सक्रिय असलेल्या एका मित्राने व्हाट्स ॲपवरील मेसेज दाखवत सांगितले, आपण साहित्यात वाचतो आणि आदर्शवादी भाषणात ऐकतो तो शाहू, फुले, आंबेडकरांचा स्वाभिमानी महाराष्ट्र मला निवडणुकीत मतदारांमध्ये कुठेही दिसला नाही. आमच्या कुटुंबात १३ मते आहेत, पण तुमचे पैसे पोहोचले नाहीत, असा मेसेज चाळीस हजार रुपये महिना पेन्शन असलेल्या एका शिक्षित व्यक्तीने पाठवला होता. मतदार आणि उमेदवारांमध्ये होणाऱ्या पैशांच्या थेट आणि मोठ्या रकमेच्या उलाढालीमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

दोन मुख्य उमेदवार असल्यास त्यांच्यामध्ये एका मतासाठी कोण किती रक्कम मोजायला तयार आहे, याची चढाओढ लागते. त्यातही कुठल्या उमेदवाराची पैसे वाटण्याची यंत्रणा किती सक्षम आहे, यावर त्याचे यश ठरू लागले आहे.

प्रचार सभांमध्ये बऱ्याचदा नेते पैसे कोणाकडूनही घ्या, पण मतदान आम्हालाच करा, असे जाहीरपणे सांगतात.

निवडणुकांतील गैरप्रकार इतक्या हीन पातळीवर पोहोचले आहेत. प्रत्येक मताची किंमत मोजल्यामुळे आपण मतदारांना उत्तरदायी असल्याची उमेदवाराची भावना संपून जाते. निवडून आलेल्या उमेदवाराने आपल्या मतांच्या जीवावरच हे पैसे कमावले आहेत किंवा पुन्हा निवडून आला तर तोही कमावणारच आहे, म्हणून त्याने दिलेल्या पैशावर आपला अधिकार आहे, असे मतदार मानू लागले आहेत आणि लोकशाहीसाठी हाच मोठा धोका ठरला आहे.

विशेष म्हणजे, उच्चशिक्षित आणि सधन मतदारही मतदानासाठी पैशाचा मोह बाजूला ठेवू शकलेला नाही. पण, पैसे वा अन्य आमिषाला बळी पडून मतदार लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारण्याचा अधिकार गमावून बसतातच; शिवाय त्यांच्या भ्रष्टाचारालाही लोकमान्यता देतात.

मतदारांना पैसे वाटण्याच्या अनिष्ट प्रकारामुळे निवडणुकीचा खर्च इतका वाढला आहे की, त्यामुळे सर्वसामान्य व्यक्ती निवडणूक लढवण्याचा विचारच करू शकत नाही. तिकीट देताना बहुतांश पक्षही उमेदवाराची खर्च करण्याची क्षमता तपासूनच तिकीट देतात. म्हणून आर्थिक परिस्थिती हा हल्लीच्या राजकारणात येण्याचा पहिला निकष ठरला आहे. म्हणजे राजकारण हा एका अर्थाने भांडवलशाहीचाच दुसरा चेहरा बनू लागला आहे.

मोठे उद्योग समूह राजकीय पक्षांना आर्थिक मदत देऊन स्वतःला हवी ती धोरणे राबवून घेतात, अशी तक्रार केली जायची. आता राजकारण हाच उद्योग होऊन निवडणुका हा कॉर्पोरेट इव्हेंट झाला आहे. ज्या सर्वसामन्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी या निवडणुका होतात, त्यामध्ये त्यांच जागा राहात नसेल, तर ती व्यवस्था त्यांच्या भल्यासाठी उपयोगी पडणार कशी?

एवढे होऊनही मतदार फक्त आणि फक्त पैसे घेऊन आणि त्याला जागून ज्याचे पैसे घेतले त्यालाच प्रामाणिकपणे मतदान करतात का? हाही एक संशोधनाचा विषय बनला आहे. त्यामुळे एखाद्या निवडणुकीत किमान एका तरी मतदारसंघातील सर्वच उमेदवारांनी कुणीही पैसे वाटायचे नाहीत, असे ठरवावे आणि काय जनमत बाहेर येते, ते पाहण्याचा प्रयोग करून बघावा.

दुसऱ्या बाजूने, किमान एका तरी मतदारसंघातील मतदारांनी आपला स्वाभिमान जागवत, आम्हाला तुमचा एक रुपयाही नको, त्याशिवाय कोणाला मतदान करायचे हे ठरवू, असा बाणा दाखवायला हवा. एका गावात भाषणात मी लोकांना एक भावनिक आवाहन केले. आपण देशाला आपली माता मानत असू, तर मत विकणे म्हणजे मातेला विकण्यासारखे आहे. आम्ही पैसे घेऊन मत विकणार नाही, अशी शपथ लोकांना दिली. त्या गावातील सगळ्यांनी निवडणुकीत उमेदवारांचे पैसे नाकारल्याचे मला नंतर कळले. उमेदवारांनीही याबद्दल समाधान व्यक्त केले.

पैसे न घेता मतदान करणे हाच लोकशाहीचा नवा धर्म मानून तो घराघरात पोहोचवण्यासाठी देशव्यापी मोहीम हाती घेण्याची वेळ आली आहे. कारण पैसे न घेणारा स्वाभिमानी मतदारच लोकशाहीचे रक्षण करू शकतो आणि हे व्हायलाच हवे.

■ ■ ■

# मन मैला तन ऊजरा

कबीरांची दृष्टी ईश्वरावर परम प्रेम करणाऱ्या संतांची आहे. ही दृष्टी ईश्वरप्रेमाला बाधक ठरणाऱ्या ढोंगी साधूंच्या वृत्तीतील विचार-विखार सजगपणे उघड करून समाजासमोर मांडते आणि त्या पलीकडं जाऊन सर्व जीवमात्रांतील प्राणतत्त्व एक असल्याचंही साधकांना दाखवते. कबीरांचा विशेष असा आहे की, ते साधूंच्या उक्ती आणि कृतीतील, राहणी आणि विचारसरणीतील आणि दृश्य तना-मनातील भेद अत्यंत तीव्रतेनं आपल्या या दोह्यांतून व्यक्त करतात. अशा वेळी भरपिकातील तणाची कापणी करणाऱ्या कोयत्याची धार त्यांच्या शब्दांना येते.

ढोंगी साधूंच्या दांभिकपणाची, खोटेपणाची, मान मिरवण्याच्या वृत्तीची, समाजात अनर्थ निर्माण करणाऱ्या बुद्धीची चीड त्यांच्या शब्दांतून, प्रतिकांतून आणि कथनाच्या रीतीतून आपल्यापर्यंत पोहोचते. आपण जसे नाहीत तसं जाणीवपूर्वक दाखवण्याच्या वृत्तीचा सखोल अभ्यास करून ती दूर सारल्याशिवाय अध्यात्माच्या वाटेवरून कुठलाही साधक चालू शकत नाही, हे कबीरांचं हिताचं सांगणं आहे. ते म्हणतात...

***मन मैला तन ऊजरा, बगुला कपटी अंग।***
***तासो तो कौवा भला, तन मन एकहि अंग।।***

आपण पाहतो की, बगळ्याचा रंग पांढरा शुभ्र असतो. तळ्यांतल्या एका ओल्या खडकावर निश्चल बसून त्याचं डोळे मिटून चाललेलं ध्यान हे खरं ध्यान नसतं. शांत तळ्यातली एखादी मासळी पाण्याच्या पृष्ठभागावर आली की निमिषार्धात ती चोचीत धरून गिळता यावी, यासाठीच हे त्याचं ध्यानाचं ढोंग असतं.

खऱ्या ध्यानात असं ढोंग नसतं, स्वार्थ साधण्यासाठीचा अभिनय नसतो. बगळा वरून दिसायला पांढरा असला, तरी त्याचा हेतू शुद्ध नसतो. त्याचं मन स्वार्थीपणानं मळलेलं असतं. कबीर म्हणतात, या ढोंगी बगळ्यापेक्षा आत-बाहेरून एकच रंग असलेला कावळा बरा. कारण त्याच्या तना-मनाच्या रंगांत अंतर नसतं. एकाच रंगासारखी त्याची वृत्ती आतून-बाहेरून एकच असते. दोन पक्ष्यांच्या या रंगभेदातून दिसणं आणि असणं यातला फरक कबीर परिणामकारकतेनं व्यक्त करतात!

***तन को जोगी सब करै, मन को करै न कोय।***
***सहजै सब सिधि पाइये, जो मन जोगी होय।।***

कबीर म्हणतात, तथाकथित साधू आपला वेष बदलतात. गळ्यात, मनगटावर रुद्राक्षांच्या माळा घालतात. कपाळावर, दंडावर भस्माचे पट्टे ओढतात. हे या साधूंचं बाह्यदर्शन असतं. ते आपल्या देहाच्या दृश्याकारासाठी स्वतःला क्लेशही करून घेतात. व्रतं, उपवास करतात आणि प्रसंगी कंदमुळं खाऊन राहतात. कमीत कमी सुख-सोयींचा आधार घेऊन देह जगवतात. देहाच्या इच्छा शम-दमानं नियंत्रित करण्यात कधी कधी यश मिळवतात. अशा साधूंना फक्त देहभाव उमजलेला असतो.

पण, मनोगती कळली नाही तर भक्तिभाव उमजत नाही, असं मार्मिक सूचन कबीर करतात. मनोगती कळणाऱ्या साधूंना सर्व सिद्धी प्राप्त होतात, सर्व सुखं लाभतात. पण, त्यासाठी त्यांना एखाद्या योगी पुरूषाची संगती लाभावी लागते. तरच त्यांचं तन आणि मन सहज अनासक्त होऊन जीवन मंगलमय होतं. ढोंगी साधूंच्या जीवनाविषयीची ही निरीक्षणं नोंदवताना, त्यांचे वृत्ती-विशेष कथन करताना साधकानं कोणती काळजी घ्यायची, याबाबत कबीर सांगतात...

***भेष देख मत भूलिये, बूझि लीजिये ज्ञान।***
***बिना कसोटी होत नहि, कंचन की पहचान।।***

आपल्या आसपास कितीतरी ढोंगी साधूंचा, स्वघोषित साक्षात्कारी पुरुषांचा, चमत्कारी बाबांचा, संमोहित करणाऱ्या तथाकथित गुरुंचा आणि इंद्रिय सुखांची क्षणजीवी प्रलोभनं दाखवणाऱ्या संधिसाधूंचा वावर आहे. मन भ्रांतीत हरवलं जाऊ शकण्याच्या या काळात आपण खरं साधुत्व कसं शोधणार?

■ ■ ■

# श्रीमंतांचे चिंताजनक देशांतर

कोणी म्हणेल, श्रीमंतांना जायचे असेल विदेशात तर जाऊ द्यावे. पण, जाताना ते उद्योजकतेचा अनुभव आणि भांडवलही घेऊन जातात. त्यामुळे आपला देश त्या प्रमाणात गरीब राहतो. या बाबतीत सरकारला मात्र फारशी चिंता असल्याचे जाणवत नाही. श्रीमंतही इथल्या परिस्थितीत खुश नसतील, तर मग गरिबांनी काय करावे?

ज्ञानेश्वर मुळे

आपला भारत आत्मनिर्भर व्हावा, अशी इच्छा अगदी शिखरावरच्या नेत्यांपासून गावोगावच्या भाषणांमधून ऐकू येतेय. मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया, इन्क्युबेशन लॅब, इनोव्हेशन सेंटर्स, स्किल इंडिया आणि कौशल्य प्रशिक्षण वगैरे अनेक उपक्रमांतून शासन देशाचा आत्मनिर्भर भारत आणि विकसित भारत यांसाठीचा संकल्प ते सिद्धी हा प्रवास सुकर करत आहे. देश आर्थिक क्षेत्रात वेगाने पुढे जाण्याचा प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांना येणाऱ्या यशाचे आपण स्वागत केले पाहिजे. पण त्याचबरोबर काही चिंताजनक प्रवाह दिसताहेत, त्यांचाही विचार केला पाहिजे. यामधील एक महत्त्वाचा प्रवाह म्हणजे, विदेशात जाऊन तिथेच कायमच्या वास्तव्याचा परवाना (पीआर) किंवा तिथले नागरिकत्व घेण्यासाठी चाललेली भारतीयांची स्पर्धा.

एरवी विदेशात जाणे काही चुकीचे नाही आणि जिथे संधी आहे, तिथे शिक्षण, व्यवसाय, नोकरी, राहणीमान चांगले आहे असे वाटते. तिथे जाण्याची पद्धत खूप जुनी आहे.

इराक किंवा सीरियातील राजकीय उलथापालथीतून आलेल्या असुरक्षिततेमुळे तिथल्या लाखो नागरिकांनी इतर देशांत आश्रय घेतला आहे. मात्र, भारतात कोणत्याही प्रकारची राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक अस्थिरता नसूनही सर्व थरांतील भारतीय मोठ्या संख्येने विदेशात जाऊ लागले आहेत.

भारतातील तीन - चार श्रेणींतील नागरिकांचे देशांतर विचार करायला लावणारे आहे. एका बाजूला आपण झपाट्याने होणाऱ्या आर्थिक प्रगतीचे गौरवगीत गात आहोत, दुसरीकडे उत्तम आर्थिक स्थितीतील भारतीयांनी विदेशात जाण्याचा वेग अविश्वसनीय वाटावा इतका वाढवला आहे.

एकीकडे भारतातील शिक्षणाविषयी आपण सगळेच स्तुतिसुमने उधळतो, दुसरीकडे अमेरिकेसारख्या देशात जाऊन शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांची संख्या दरवर्षी विक्रमी संख्येने वाढत आहे.

तिसरे म्हणजे, भारतात नवनवीन उद्योग आणि नोकरीच्या संधी वाढताहेत, पण त्याच गतीने इतर देशांत अवैधपणे प्रवेश करणाऱ्या भारतीयांची संख्या प्रमाणाबाहेर वाढली आहे. हे तीनही प्रवाह चिंताजनक आहेत. मोठे उद्योजक विदेशात जातात आणि जगभर उद्योगधंद्याचे जाळे तयार करतात. हे कदाचित स्वागतार्ह असेलही; पण आर्थिकदृष्ट्या उत्तम स्थितीतील लोक बाहेरच्या देशांत स्थलांतर करतात, तेव्हा ते आपली संपत्ती आणि देशाला त्याचा होणारा लाभ या दोन्ही गोष्टी घेऊन निघून जातात. इथे या वर्गाचा थोडा विचार करुया. श्रीमंत वर्गाला काय हवे असते? राजकीय स्थिरता, निम्न करप्रणाली, उत्तम शिक्षण व्यवस्था आणि सुख-सुविधांनी युक्त गुणवत्तापूर्ण राहणीमान. उत्तम सांपत्तिक स्थिती असणाऱ्यांना हाय नेटवर्थ इंडिव्हिज्युअल (एचएनआय) म्हटले जाते. एक मिलियन डॉलर (८.५ कोटी रुपये) गुंतवणूक करण्याची क्षमता असलेल्यांना एचएनआय म्हणतात.

भारतातून २०२२ मध्ये ७५०० एचएनआयनी देशांतर केले. सुदैवाने ही संख्या २०२३ मध्ये ५१०० पर्यंत घटली. २०२४ मध्ये ती आणखी घटली असण्याची शक्यता असून, साधारण ४३०० एचएनआयनी देश सोडला असण्याचा अंदाज आहे.

देशांतर करणाऱ्या भारतीयांची संख्या गेल्या दोन वर्षांत कमी होताना दिसते आहे, ही चांगली गोष्ट असली, तरी ४३०० ही संख्याही विचार करण्यासारखी आहे. भारतात साधारणतः ३ लाख २६ हजार ४०० एचएनआय आहेत. अशा लोकांच्या देशांतराच्या प्रमाणात भारताचा क्रमांक चीन, इंग्लंड या दोन देशांबरोबर पहिल्या तीनमध्ये येतो. चीनमधील राजकीय स्थिती, इंग्लंडचे ब्रेक्झिट धोरण तिथल्या लोकांच्या देशांतराला कारणीभूत असावे. पण, भारतातील श्रीमंत लोक देशांतर का करत असावेत?

भारतातील राहणीमान आणि तुलनेने असणारी उच्च करप्रणाली ही कारणे या देशांतरामागे असावीत. संयुक्त अरब अमिरात (युएई) हे भारतीय श्रीमंतांसाठी आकर्षक गंतव्यस्थान ठरले आहे. कारण तिथे आयकर शून्य आहे आणि फक्त पाच टक्के व्हॅट लावला जातो. युएईशिवाय ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, अमेरिका आणि स्वित्झर्लंड हीसुद्धा भारतीयांची आवडती ठिकाणे बनली आहेत.

अशा या देशांतराचा फायदा मुख्यतः ग्रीस, पोतुर्गाल, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया या देशांना होत आहे. एका एचएनआयच्या मते, सिंगापूरमध्ये विमान तिकिटे भारतापेक्षा स्वस्त आहेत.

उदा. दिल्ली - हैदराबाद या १५०० कि. मी. अंतरासाठी ४५०० रुपये लागतात, तर सिंगापूर - बाली या ३००० कि. मी. प्रवासाला ८७०० रुपये लागतात. दुसरे उदाहरण म्हणजे, गोव्यात पोर्तुगीज शैलीचा बंगला घ्यायचा तर पाच कोटी रुपये लागतात, तर पोतुर्गालमध्ये तसाच बंगला तीन ते साडेतीन कोटी रुपयांपर्यंत मिळतो. शिवाय, पोर्तुगालने गोल्डन व्हिसाच्या योजनेद्वारे श्रीमंत व्यक्तींचे स्वागत करण्याचा निर्णय घेतला आहे. कोणी म्हणेल, श्रीमंतांना जायचे असेल विदेशात तर जाऊ द्यावे. पण, जाताना ते आपला उद्योजकतेचा अनुभव आणि भांडवलही घेऊन जातात. त्यामुळे आपला देश त्या प्रमाणात गरीब राहतो.

पण, या बाबतीत सरकारला मात्र फारशी चिंता असल्याचे जाणवत नाही. या विषयावर सरकारकडून ना काही उपाययोजना केली गेली आहे, ना धोरणात्मक भाष्य. श्रीमंतही इथल्या परिस्थितीत खुश नसतील, तर मग गरिबांनी काय करावे?

■ ■ ■



# अग्नी फायर ब्रिगेडच्या शौर्याची ज्वलंत कहाणी

आपल्याकडे फायर ब्रिगेडच्या कामाचे कौतुक झाल्याची उदाहरणे कमीच आहेत. या दलातील जवानांच्या शौयार्ला फारसे महत्त्व दिले जात नाही. आग लागल्याची बातमी होते; पण ती कोणी, कशी आटोक्यात आणली, त्यांनी शौर्याने किती जणांचे प्राण कसे वाचवले, या विषयीच्या बातम्या ब्रेकिंग मानल्या जात नाहीत.

आग कोणाच्या हलगर्जीमुळे लागली, याचा तपास झाला, तरी त्याचा गवगवा होत नाही. शौर्य पदकांच्या बाबतीतही अनेकदा फायर ब्रिगेडच्या जवानांकडे दुय्यमपणे पाहिले जाते. आगीशी निरंतर खेळ सुरू असला, तरी फायर ब्रिगेडच्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळत नाही, त्यांचे कौतुक होत नाही. अशा अनेक ज्वलंत प्रश्नांचा वेध घेणारा अग्नी हा सिनेमा नुकताच प्राइमवर रिलीज झाला आहे.

सिनेमासाठी उत्तम विषय निवडल्यावर पुढची पायरी असते पटकथा लेखनाची. अशा विषयावर पटकथा लिहिताना त्यातील बारकावे प्रेक्षकांना सांगण्यापूर्वी लेखकाला त्याचा अभ्यास करावा लागतो. आवेश न आणता हा अभ्यास दाखवण्यात पटकथा लिहिण्याचे कौशल्य असते.

तांत्रिक बाबींची माहिती प्रेक्षकांपर्यंत पोहोचवताना त्यात थोडा ड्रामाही असावा लागतो, अन्यथा तो सिनेमाऐवजी डॉक्युमेंटरी होण्याचा धोका असतो. पण, हिंदी सिनेमांमध्ये अशा ड्रामेबाजीवर इतका भर दिला जातो, तितका मूळ विषयाचा अभ्यास दुर्लक्षित राहतो आणि तिथेच हे सिनेमे फसतात.

चार घटकाची करमणूक हे सूत्र सिनेमा थिएटरमध्ये चालण्यासाठी वापरले जाते, पण ओटीटीच्या प्रेक्षकांना कंटेन्ट मिळाला नाही, तर ते रिमोटचा वापर करतात.

राहुल ढोलकिया आणि विजय मौर्य यांनी फायर ब्रिगेड कर्मचाऱ्यांचे कार्य समोर आणताना, नायक-खलनायक अशा पद्धतीने मांडणी करून अग्नीची पटकथा सस्पेन्स थ्रिलर केली आहे.

खलनायकाची भूमिका संबंधित कलाकाराने उत्तम केली असली, तरी ते पात्र हिंदी सिनेमाप्रमाणे मासलेवाईक झाले आहे.

स्वतःची बाजू प्रेक्षकांना सांगण्याची संधी खलनायकाला दिली आहे. आग लागली असताना खलनायक स्वतःच, आपण हा गुन्हा का करतो आहे, हे वेळ काढून सांगत राहतो, हा प्रसंग फिल्मी झाला आहे. अशा गोष्टींमुळे अग्नी हा एरवी सर्वसाधारण सिनेमा झाला असता, पण कलाकारांची निवड उत्तमपणे केल्याने तो एकदा तरी बघावा असा झाला आहे. प्रतीक गांधीने साकारलेला फायर ब्रिगेड अधिकारी आणि दिव्येन्दु शर्माचा पोलिस अधिकारी त्या दोन पात्रांमधील हेवेदावे प्रसंग पेरल्यामुळे प्रेक्षणीय ठरले आहेत. अर्थात, या सिनेमाचा बराचसा भाग फायर ब्रिगेडच्या शौर्यापेक्षा फायर ब्रिगेड विरुद्ध पोलिस अशा नाट्याने तापला आहे.

प्रतीक गांधीने स्कॅम या वेब सिरीजमध्ये उत्तम काम केले होते. प्यार का पंचनामा, मिझार्पूर अशा अनेक कलाकृतींमधून दिव्येंदुने लक्षणीय अभिनय केला आहे. सई ताम्हणकरने फायर ब्रिगेड अधिकाऱ्याच्या पत्नीची भूमिका साकारताना केलेला संयत अभिनय आवर्जून बघावा असा आहे.

मोजके संवाद, पण उत्तम रिॲक्शनमधून तिने अभिनयाचे लाजवाब दर्शन घडवले आहे. अग्नी हा मुंबई फायर ब्रिगेड संबंधित असल्यामुळे सिनेमातील संवाद हिंदी-मराठी आहेत. बरेच कलाकारही मराठी आहेत.

जितेंद्र जोशीने न पटणारी भूमिका चांगली साकारली आहे. सखी गोखले, अनंत जोग यांच्या भूमिका उत्तम. संयमी खेरला उत्तम सिनेमांमध्ये जास्त फुटेजच्या भूमिका मिळतात. पण, त्यातील वैविध्य दाखवण्याची संधी तिने इथे वाया घालवल्याचे जाणवते.

राहुल ढोलकियांनी दिग्दर्शन करताना कथेतला ड्रामा पुढे आणला आणि फायर ब्रिगेडचा प्रश्न मागे पडला आहे. परझानियासारख्या दर्जेदार सिनेमाच्या दिग्दर्शकाने रईससारख्या चित्रपटांचा मार्ग स्वीकारावा, हे जरा खटकते.

प्रॉडक्शन डिझाइनमध्ये आणखी चांगले काम व्हायला हवे होते. आगीचे सर्वच प्रसंग व्हीएफएक्स तंत्रज्ञान वापरून दाखवले आहेत. त्यामुळे त्यात एक प्रकारचा कृत्रिमपणा आणि भडकपणा जाणवतो.

पोलिसाच्या रुपातील नायक आगीच्या ज्वाळांतून हेल्मेट आणि सुरक्षा साधनांशिवाय सुखरूप चालतो, पळतो, त्याला किरकोळ खरचटते, पण जराही भाजत नाही!

बऱ्याच वेळा फायर ब्रिगेडचे कर्मचारी, विशेषतः प्रमुख कलाकार डोक्यावर हेल्मेट न घालता खुलेपणाने आगीतून जाता-येताना दाखवले आहेत. अशा गोष्टी या प्रकारच्या कथा विषयासाठी सर्वथा गैर आहेत.

भारतात २०२२ मध्ये पहिल्या महिला फायर ब्रिगेडची नेमणूक केली गेली. पण, ही कथा महिलेशिवाय कशी पुढे सरकणार, असा प्रश्न सिनेमा तयार करणाऱ्यांना पडला असावा. त्यामुळे अग्नीच्या फायर ब्रिगेडमध्ये एक नायिकाही आहे आणि याच टीममध्ये तिचे प्रेम प्रकरण रंगले आहे. म्हणून मग त्या दोघांचे एक गाणे ओघाने आलेच! त्यासाठी जागी बदन में ज्वाला.. किंवा आग हैं लगी हुई.. अशी जुनी गाणी रिमिक्स करून न वापरल्याबद्दल निर्माता-दिग्दर्शकांचे आभारच मानायला हवे!

■ ■ ■



# दोन अफेअर, १० वर्ष रिलेशनशिप; तरीही तब्बू सिंगलच

बॉलिवुड सेलिब्रेटी आपल्या नातेसंबंधांबाबत कधीच स्पष्टपणे बोलत नाहीत. तब्बू आणि नागार्जुनने देखील असचं केलं. मात्र दोघांच्या प्रेमसंबंधांची जोरदार चर्चा झाली. प्रेमसंबंधांमुळे दोघंही चांगलेच चर्चेत आले.

नागार्जुनने आधीच लग्न केलं होतं. मात्र असं असताना देखील दोघ एकमेकांच्या प्रेमात पडले. अनेक वर्ष त्यांनी एकमेकांची साथ दिली. त्यानंतर ते वेगळे झाले. मात्र त्यानंतर अभिनेत्री तब्बून कोणासोबतच लग्न केलं नाही, सिंगल राहणचं तीने पसंत केलं. नागार्जुनच नाही तर नागार्जुनची दुसरी पत्नी अमला आणि तब्बू देखील एकमेकींच्या चांगल्या मैत्रिणी आहेत. नागार्जुन जेव्हा 21 वर्षांचा होता तेव्हापासून तब्बू आणि नागार्जुनची ओळख होती. निन्ने पेल्लाडता या चित्रपटाच्या सेटवर त्यांची पहिल्यांदा ओळख झाली. त्यानंतर हळूहळू ओळखीचं रुपांतर प्रेमात झालं.

तब्बू आणि नागार्जुनमधील मैत्रीबाबत नागार्जुनची दुसरी पत्नी अमलाने टाइम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीमध्ये म्हटलं होतं की, मला पूर्ण विश्वास आहे की, नागार्जुन माझ्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही. माझ्या घरात काय चाललं आहे? याची चिंता दुसऱ्याला करण्याची आवश्यकता नाही.

तब्बू म्हणाली होती की, मी अजय देवगनमुळेच सिंगल राहिले. तीने हे गंमतीनं म्हटलं होतं. पुढे बोलताना ती म्हणाले की मी अजयला अनेक वर्षांपासून ओळखते.

तब्बूचा चुलत भाऊ समीर हा अजय देवगनचा चांगला मित्र आहे. जो पण तब्बूसोबत बोलेल त्या मुलाला अजय देवगन आणि समीर धमक्या देत होते,अशी ही माहिती समोर आली आहे. तब्बू नागार्जुन व्यतिरिक्त संजय कपूरसोबत देखील सीरियस रिलेशनशिपमध्ये होती. मात्र तरी देखील ती सिंगल आहे. तीला जेव्हा तिच्या लग्नाबाबत विचारण्यात आलं तेव्हा तीने अजय देवगनचं नाव घेतलं, मात्र हे ती सर्व गमतीमध्ये बोलत होती. तरी देखील तिच्या या वक्तव्याची चर्चा झाली.

■ ■ ■



# वयाच्या २० व्या वर्षी लग्न.. गौरी खानने खूप दिली साथ

शालिनी पासीने अलीकडेच तिच्या वैयक्तिक आयुष्याबाबत अनेक खुलासे केले आहेत. लवकरच लग्न करणार असल्याचेही तिने सांगितले. शाहरुख खान आणि गौरी खानबद्दल शालिनी म्हणाली, माझे लग्न खूप कमी वयात झाले आणि त्यावेळी गौरीने मला खूप साथ दिली.

शालिनी पासी यांनी मोजो स्टोरीमध्ये बरखा दत्तशी बोलताना सांगितले की, शाहरुख खान आणि गौरी खान तिचे फॅमिली फ्रेंड आहेत. शालिनीचे पती संजय पासी आणि शाहरुख खान शाळेच्या काळापासूनचे मित्र आहेत.

ती म्हणाली, संजय नात्यांमध्ये खूप चांगला आहे, तर मला स्वतःहून जगायला आवडते. मी खूप मूडी आहे. संजय लोकांशी संपर्क करण्यात माहीर आहे, तर मी तशी नाही. मी प्रत्येकासाठी 100% उपलब्ध आहे, परंतु हे सर्व माझ्या मूडवर अवलंबून आहे.


शालिनी पासी पुढे म्हणाल्या, 'शाहरुख खान आणि गौरीच्या बाबतीत असे नाही. ते दिल्लीचे आहेत, ज्यांनी मुंबईत खूप नाव कमावले आहे. तरीही ते दोघेही त्यांच्या सर्व मित्रांच्या संपर्कात आहेत जे खूप चांगले आहे. गौरीने मला कायम साथ दिली आहे. माझे लग्न अगदी लहान वयात झाले आणि गौरी नेहमी तिचे उदाहरण देऊन मला समजावून सांगायची. माझ्यासाठी ही खूप मोठी गोष्ट होती. मला माहिती होते की मी तिच्यावर विश्वास ठेवू शकते.

शालिनी पासी जेव्हापासून नेटफ्लिक्सच्या फॅब्युलस लाइव्हस व्हर्सेस बॉलिवूड वाइव्हजच्या तिसऱ्या सीझनमध्ये पदार्पण करत आहे तेव्हापासून ती चर्चेत आहे. शालिनीने वयाच्या 20 व्या वर्षी बिझनेसमन संजय पासीसोबत लग्न केले होते. वयाच्या 21व्या वर्षी तिने एका मुलाला जन्म दिला. त्यांचा मुलगा आता 27 वर्षांचा आहे. शालिनीने कमी वयात लग्न करण्याचा निर्णय योग्य ठरवला आहे.

■ ■ ■ ■



# जगण्याची शक्यता फक्त ३० टक्के





अभिनेत्री सोनाली बेंद्रेने तिच्या अभिनयाने आणि तिच्या सौंदर्याने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलं. आजही ती अनेकांच्या फेव्हरेट लिस्टमध्ये आहे. सोनालीने नुकताच तिचा ५० वा वाढदिवस साजरा केला. सोनालीने तिच्या आयुष्यातील सर्वात वाईट काळ पाहिला तो म्हणजे तिला झालेलं कॅन्सरचे निदान. याबद्दलचा एक भयानक किस्सा तिने सांगितला होता.

काही वर्षांपूर्वी सोनाली बेंद्रेला कर्करोगाचे निदान झाले. ते दिवस तिच्यासाठी आणि तिच्या कुटुंबासाठी फारच अवघड होते. ती म्हणाली की, जेव्हा हे घडले, तेव्हा मी एक रिॲलिटी शो करत होते. आम्ही दर आठवड्याला शूटिंग करत होतो. मला जाणवत होते की माझ्या आत काहीतरी चुकीचं घडतंय. मी जेव्हा डॉक्टरांकडे गेले तेव्हा आम्हाला कळले की मला कॅन्सर झाला आहे.

सुरुवातीला मला वाटले की फर्स्ट स्टेज असेल पण चाचण्या केल्या असता मला कळले की तो पूर्णपणे माझ्या शरीरात पसरलाय. ही परिस्थिती पाहून माझे डॉक्टर आणि माझ्या नवऱ्याच्या चेहऱ्यावरचा रंगच उडालेला.

२०१८ मध्ये जेव्हा सोनालीच्या कॅन्सरचे निदान झाले तेव्हा डॉक्टरांनी तिची जगण्याची केवळ ३० टक्केच शक्यता दिली होती. त्यावेळी तिच्यासह तिच्या घरच्यांनाही धक्का बसला होता.

सोनालीने पुढे सांगितले की, मला कॅन्सर झाला आहे हे मी स्वीकारण्यास नकार दिला. मी घरी जाऊन झोपले, पण जेव्हा मला जाग आली तेव्हा काहीही बदलले नव्हते. माज्या पतीने ताबडतोब निर्णय घेतला आणि दोन दिवसांतच आम्ही परदेशात गेलो.

मी त्याच्याशी भांडत होते कारण माझा मुलगा रणवीर समर कॅम्पसाठी बाहेर गेला होता. मी त्याला म्हणाले होते जरा थांब, मला थोडा वेळ दे. तेव्हा तो म्हणाला की बाकी गोष्टींकडे लक्ष देणं बंद कर, स्वतःकडे लक्ष दे, कारण तुला जीवंत राहायचं आहे. हे सांगताना सोनाली भावूकही झाली.

सोनाली आता पूर्णपणे बरी झाली आहे.

■ ■

# बुआजींनी का सोडला द कपिल शर्मा शो?

भन्नाट कॉमिक टायमिंग आणि पंचलाइन्समुळे प्रसिद्ध असलेल्या अभिनेत्री उपासना सिंग बऱ्याच काळापासून टीव्ही जगतापासून दूर आहेत. गेल्या काही वर्षांपासून त्या गायबच आहेत. आजही प्रेक्षक त्यांना द कपिल शर्मा शोमध्ये मिस करतात.

कॉमेडी नाइट्स विथ कपिलह्रमध्ये त्याने एक आयकॉनिक भूमिका साकारली होती. पण आता सध्या त्या पंजाबी चित्रपटांमध्ये काम करताना दिसत आहेत. त्यांचं स्वतःचं प्रॉडक्शन हाऊसही उघडले आहे. ज्याद्वारे उपासना यांनी आतापर्यंत इंडस्ट्रीत आपले एक विशेष स्थान निर्माण केले आहे.



उपासना सिंह या नुकत्याच सिद्धार्थ काननच्या पॉडकास्टवर आल्या होत्या. तेथे गप्पा मारताना त्यांनी कपिलच्या शोला अलविदा करण्याचे खरे कारण सांगितले. जेव्हा उपासना यांनी कपिलचा शो सोडला तेव्हा त्यांनी स्वतःला टीव्हीच्या जगापासून दूर केले. शोमध्ये घालवलेल्या त्या वेळेबद्दल उपासना भरभरून बोलल्या. जवळपास अडीच वर्ष आमचा शो हा टॉपला होता, पण माझ्या आयुष्यात एक वेळ अशी आली की माझ्याकडे नवं असं करण्यासारखं काहीच नव्हतं. मी कपिलशी देखील याबद्दल बोलले होते.

आमच्या दोघांचही बॉंड अतिशय चांगले आहे. आमच्यात कधीच कोणताही वाद, किंवा भांडणं झालं नाही, पण लोकांना तसं का वाटलं काही कल्पना नाही. माझा रोल आता काही वेगळा वाटत नाहीये,असं मी कपलिला म्हणाले होते. मी जे काम करत होते, त्यामध्ये मला (काहीच) मजा येत नव्हती. माझ्या भूमिकेकडे थोडं तरी लक्ष द्या, असं मी त्याला बोलले, असं उपासना सिंग यांनी सांगितलं.

माझ्या हातातून सगळ्याच गोष्टी निसटत चालल्या होत्या, कारण कॉन्ट्रॅक्टबद्दल चर्चा सुरू होती. चॅनेलमध्येही सगळं काही आलबेल नव्हतं. त्यामुळे गोष्टी आणखीनच कठीण झाल्या, असं उपासना म्हणाल्या. माझं कॉन्ट्रॅक्ट रपिलसोबत नव्हत, चॅनेलसोबत होतं. ते लोक जेव्हा दुसऱ्या चॅनेलसोबत गेले, तेव्हा मी त्यांच्यासोबत जाऊ शकले नाही. टीममध्येही टेन्शन होतं, मला कम्फर्टेबल वाटत नव्हतं. कृष्णा अभिषेकसोबत मी जेव्हा दुसरं चॅनेल जॉईन केले तेव्हा, कॉन्ट्रॅक्ट संपेपर्यंत मला तिथेच थांबावं लागल्याचे त्यांनी नमूद केलं. उपासना पुढे म्हाल्या की, या काळात मी क्रिएटिव्ह टीमसोबत काही गोष्टींचाही सामना केला. ते माझ्या पंचलाईन कापायचे. प्रेक्षक हसतील तिथेच ते माझ्या ओळी काढतील हे मला माहीत होतं. मला टॉर्चर वाटत होतं, अली असगर लाही सेम इश्यू सहन करावा लागला, क्रिएटिव्ह लेव्हलवर आम्ही समाधानी नव्हतो.

■ ■

# छत्रपती साकारण्यास आतूर

'भारत का वीर पुत्र - महाराणा प्रताप', 'चंद्रगुप्त मौर्य' आणि 'धर्म योद्धा गरूड' सारख्या शोचा भाग असलेला फैजल खानला आता छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारण्याची इच्छा आहे.

फैजल म्हणाला की, शिवाजी महाराजांची व्यक्तिरेखा त्याच्यासाठी खूप खास आहे. हे पूर्ण करणे त्याच्यासाठी अभिमानाची गोष्ट असेल.

फैजलच्या मते, त्याला नेहमीच ऐतिहासिक भूमिका करायला आवडतात. तो म्हणाला, 'मला ऐतिहासिक व्यक्तिरेखा साकारायला आवडतात. मी महाराणा प्रताप आणि चंद्रगुप्तासारख्या भूमिका केल्या आहेत. मला असे वाटते की मी असे शो चांगले समजू शकतो. शिवाजी महाराजांची व्यक्तिरेखा माझ्यासाठी खूप खास असेल. त्यांचे शौर्य आणि दूरदृष्टी आजही आपल्याला प्रेरणा देते.

मला ही संधी मिळाली तर मी मनापासून करेन. ही केवळ भूमिका नसून माझ्यासाठी अभिमानाची बाब असेल. शिवाजी महाराजांची गाथा प्रत्येक भारतीयाच्या हृदयात आहे. त्यांची विचारसरणी समजून घेणे आणि ते पडद्यावर दाखवणे हे माझ्यासाठी आव्हान आणि सन्मान दोन्हीही असेल.

फैजल म्हणाला, 'शिवाजी महाराजांसारखे पात्र हे माज्या करिअरमधील सर्वात मोठे स्वप्न आहे. त्यांच्या कथा आजही आपल्याला शिकवतात की एखाद्याने कठीण काळातही धैर्याने आणि शहाणपणाने वागले पाहिजे. जर मला ही संधी मिळाली तर मी पूर्ण मेहनत आणि प्रामाणिकपणे ती पूर्ण करेन.

तो पुढे म्हणाला, 'हे माझे सर्वात मोठे आणि खरे स्वप्न आहे. शिवाजी महाराजांची भूमिका माझ्या हृदयाच्या खूप जवळ आहे. मी महाराष्ट्रातील आहे, त्यामुळे या व्यक्तिरेखेशी माझे विशेष नाते आहे. शिवाजी महाराजांची व्यक्तिरेखा साकारणे ही केवळ माझ्यासाठीच नाही तर प्रत्येक अभिनेत्यासाठी अभिमानाची बाब असेल.

■ ■

